म. ग्र. स. ठाणे.
विषय भ्र. प्रवास
सं. क्र. ७०६

# गरुडांच्या देशात

अविनाश बिनीवाले



REFBK-0025668

# गरुडांच्या देशात

अविनाश बिनीवाले

REFBK-0025668

प्रकाशिका
सौ. शामला अनंत चिचणीकर
माधुरी प्रकाशन
४४३, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
■
© सौ. अरुंधती बिनीवाले
■
प्रथमावृत्ती
जुलै १९८८
■
मुखपृष्ठ
रविमुकुल
■
मुद्रक
सौ. शामला अनंत चिचणीकर
माधुरी मुद्रण
४४३, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
■
मूल्य : तीस रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८०६
२५६६८
१२।७।८८
शाखा

मॅक्स म्युलर भवनच्या माजी संचालिका
नि माझ्या स्नेही

**फ्राऊ हाप्ऽ**

**Frau Happe**

ह्यांना ही कलाकृति सप्रेम समर्पित !!!

— अविनाश बिनीवाले

# म नो ग त

●

जग पहावं अशी इच्छा लहानपणापासूनच होती. भारतात भ्रमंती करण्याचं भाग्य गेली अनेक वर्ष सातत्यानं लाभलं, अजूनही लाभतंय. भारताच्या तथाकथित सीमा ओलांडून जाण्याचा योगही अनेकदा साधता आला. पण सातासमुद्रांपलिकडचा युरप खंड बघण्याचा योग काही येत नव्हता.

गेल्या पाच-सातशे वर्षांमध्ये ज्या लोकांनी जगभर आपली साम्राज्यं स्थापली, विस्तारली; त्या गोऱ्यांचे स्वतःचे देश कसे आहेत हे बघायचं होतं. औद्योगीकरणाच्या जादूनं जगाचा चेहरा-मोहरा पार बदलून टाकणाऱ्या ह्या युरोपियनांनी आपल्या देशात काय काय बदल केले हे जाणून घ्यायचं होतं. तिथल्या माणसांमध्ये काय परिवर्तन झालं हे समजून घ्यायचं होतं. गेली अनेक शतकं जगभर लूट करणारे हे गोरे युरोपियन नुसतेच लुटारू आहेत की त्यांच्यात आणखीही काही कसब आहे, त्यांची संस्कृती आहे तरी कशी हे प्रत्यक्ष बघण्याचं औत्सुक्य होतं– आणि तशी संधी मला अखेरीस मिळाली ! सुदूर उत्तरेला असलेल्या नॉर्वे-स्वीडन-फिनलंडच्या उत्तरध्रुवीय प्रदेशापासून थेट इटलीपर्यंत आणि ऑस्ट्रियापासून पश्चिमेला इंग्लंडपर्यंत पसरलेल्या पश्चिम युरपातल्या बहुतेक सर्व देशांमधून स्वैर संचार करायला मिळाला !

देश बघायचा म्हणजे लक्झरी टूरिस्ट बसमध्ये बसून "आता उजवीकडे अमुक आहे – आता तुमच्या डावीकडे तमूक आहे," अशी त्या बसमधल्या गाईडची पोपटपंची ऐकून त्याप्रमाणे माना वळवणं आणि केवळ डोळ्यांनी काचेपलिकडची दृश्यं बघणं ही कल्पनाच मला रुचणारी नाही. दगडधोंड्यांच्या इमारती बघण्यासाठी प्रत्यक्ष प्रवास करण्याची आवश्यकताच आज उरलेली नाही त्या गोष्टी आपल्याला वरबसल्या सहजपणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ७०६
मु. पु. २५६६८
१२।७।८९
शाखा (स्थळ प्रत)

दूरचित्रवाणी संचाच्या पडद्यावर बघता येतात. प्रत्यक्ष प्रवास करायचा तो केवळ स्थल-दर्शनासाठी नव्हे; तर त्या स्थळांच्या अवती-भोवती राहणाऱ्या जिवंत माणसांना बघण्यासाठी, त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी, त्यांच्याशी जवळीक निर्माण करण्यासाठी, त्यांना खऱ्या अर्थानं समजून घेण्यासाठी. विद्यार्थीदशेत शिकून घेतलेल्या इंग्लिश, फ्रेंच, जर्मन आणि रशियन ह्या चारही भाषांनी मला युरप–यात्रेत उत्तम साथ दिली. संपूर्ण युरपात भटकताना भाषेची अडचण कधीही आली नाही. सर्व ठिकाणी हिंडताना मला तिथल्या पाट्या वाचता येत होत्या. वर्तमानपत्रातल्या बातम्या कळत होत्या. एवढंच नव्हे तर हव्या त्या व्यक्तीशी संवाद साधून सुख-दुःखाच्या गोष्टी करता येत होत्या. तीन महिन्यांच्या काळात दहा-बारा देशांमधून केवळ संचार केला. एवढंच नव्हे तर मला तिथल्या असंख्य व्यक्तींशी जवळीक साधता आली. युरपशी माझं ऐक्य – भावनात्मक ऐक्य – निर्माण झालं' नातं जुळलं. अशी जवळची नाती निर्माण झाली, बंध तयार झाले तर बंधुत्व–विश्वबंधुत्व निर्माण होणं फार दूर नाही.

माझ्या युरप-यात्रेचा मध्यबिंदू होता जर्मनी. इ० स० १८७१ मध्ये जन्माला आलेला मध्य युरपातला एक अगदी आगळा-वेगळा देश. साहित्य, शास्त्र, तंत्रज्ञान, तत्त्वज्ञान, गायन, वादन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला, स्थापत्य – थोडक्यात म्हणजे विद्येच्या नि कलेच्या सर्वच क्षेत्रांमध्ये महान कार्य करणारी शेकडो प्रतिभावान माणसं ह्या देशात निपजली. जगावर सत्ता गाजवण्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा बाळगणारे माथेफिरूही इथेच होऊन गेले ! आपल्या जन्मापासूनच अग्रेसर असणारा हा विलक्षण देश लागोपाठ झालेल्या दोन विश्वयुद्धांमध्ये बेचिराख होऊनही पुनः वर आला नि आज पुनः एकदा प्रगति-

पथावर फार पुढे गेला आहे. अशी कोणती जादू आहे त्या जर्मन भूमीत ? वरचेवर झालेली युद्धं ह्या देशानं लीलया पचवली. विभाजन, निर्वासितांचे लोंढे, बेकारी अशा अनंत आपत्ति कोसळल्या तरी त्यामुळे दबून न जाता त्यावर मातच केली. देशाचं पुन्हा एकीकरण करण्याचं स्वप्न पाहणारा हा देश कसा आहे, गरुडांच्या ह्या देशातली माणसं कशी आहेत हे सगळं बघण्याची– निवांतपणे बघण्याची संधी मला मिळाली. तिथली काही सर्वसामान्य माणसं दाखवण्याचा हा एक प्रयत्न आहे.

प्रवासवर्णन म्हणजे दगडधोंड्यांच्या इमारतीची वर्णनं– कुठला राजवाडा कोणी कधी बांधला, त्याचा विस्तार किती हेक्टरात आहे, त्या काळी बांधकामाचा खर्च किती आला होता (इ० इ०) असल्या ऐतिहासिक जंत्र्या देण्यापेक्षा त्या परिसरात राहणारी आजची माणसं कोण आहेत, ऐतिहासिक वारशाचा त्यांच्यावर काय परिणाम झालेला आहे, त्यांच्या कल्पना काय आहेत, आशा-आकांक्षा कोणत्या आहेत हे जर वाचायला मिळालं, ऐकायला मिळालं तर ते रंजक होईलच पण त्याला उपयुक्ततेचं मूल्यही असेल. एखाद्यानं हे सर्व जाणून घेण्याचा प्रयत्न केला असेल तर त्याची वर्णनं निश्चितपणे वेगळी असतील. जिवंत असतील. अर्थात् असा प्रयत्न करताना केवळ जिज्ञासा पुरेशी नाही तर त्यासाठी स्थानिक भाषेचे चांगले ज्ञान अत्यावश्यक आहे, आणि पुरेशी सवड. माझ्या सुदैवानं मला ह्या सर्वच गोष्टींची साथ लाभली होती. विविध पार्श्वभूमीवरील प्रातिनिधिक अशी काही जर्मन माणसं, जर्मनीतली माणसं दाखवण्याच्या ह्या वेगळ्या प्रयत्नाचं स्वागत रसिक मराठी वाचक निश्चितपणे करतील असा दृढ विश्वास आहे !

– अविनाश बिनीवाले

अविनाश बिनीवाले / प्रकाशित साहित्य

माता धोराई (नाटक) (१९८३)

जर्मन भाषा परिचय (१९८३)

जय कैलास ! जय मानस !! (कादंबरी) (१९८६)

प्रोफेसर माम्लोक (नाटक) (१९८७)

काकांचे स्वप्न (कादंबरी) (१९८७)

गरूडांच्या देशात (प्रवासवर्णन) (१९८८)

आगामी

जर्मन-मराठी शब्दकोष

मराठी शैलीशब्दकोष

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ शाखा

# " ...झेपावे पश्चिमेकडे "

" दॅटस ऑल ?"

" येस !"

" जस्ट सेव्हन केजी !" असं म्हणत कौन्टरच्या पलिकडे बसलेल्या पांढऱ्याशुभ्र कपडयातल्या सेवकानं माझी बॅग ताब्यात घेतली. मोठमोठं जड-अवजड सामान घेऊन बरीच मंडळी आसपास उभी होती. विमानातून वीस किलो सामान न्यायची सवलत असतानाही माझ्याजवळ फक्त सात किलो सामान आहे हे पाहून तो कर्मचारी चकित झाला होता.

" व्हेअर डू यू वॉन्ट टु सिट ?–स्मोकिंग ऑर नॉन–स्मोकिंग ?"

" ॲट अ विन्डोसीट ! प्रिफरेबली नॉन स्मोकिंग !"

त्या कर्मचाऱ्यानं माझ्या तिकिटावर एक बारीकशी चिठ्ठी चिकटवली नि एक मोठं कार्ड – बोर्डिंग कार्ड – विमानात बसायचा पास–माझ्या हातात दिला. मी कौन्टरपासून दूर झालो.

" चल, आता ते फॉरिन एक्स्चेंजचं काम करून टाकूया !" मामानं सुचवलं. आम्ही फॉरिन एक्स्चेंजच्या एका कौन्टरपाशी गेलो. ऐनवेळी मिळणाऱ्या रुपयांचे डॉइचऽ मार्क घेऊन टाकले. सारी महत्त्वाची कामं आता उरकली होती. इथून आता इमिग्रेशन क्लिअ-

रन्स नि तिथून सरळ आत लाऊंजमध्ये.

मी दूर देशी चाललो होतो म्हणून माझे भाऊ, मित्र, मामा असे सगळेजण मोठ्या कौतुकानं विमानतळापर्यंत पोचवायला आले होते आम्ही सगळे लाऊंजच्या दिशेनं निघालो.

एवढ्यात वाटेत इन्शुरन्सची पाटी पाहून मी सेकंदभर थबकलोच. मोठ्या रकमेचा विमा उतरवला नि विमानाला अपघात झाला तर वारसदाराना भली मोठी रक्कम मिळण्याची शक्यता असते—युरोपला जायचं ठरल्यापासून मी अतिशय आनंदात होतो, त्या आनंदाला सेकंदभर का होईना पण कचकन् ब्रेक लागला होता.

"चला चला ! काही गरज नाही विम्याची !" असं मीच हसतहसत म्हटलं नि आम्ही सगळे पुढे निघालो.

इमिग्रेशनच्या कठड्यापाशी उभा राहून मी सर्वांशी हस्तांदोलन केलं. सुखरूप पोहोचल्याचं पत्र ताबडतोब पाठवण्याचं आश्वासन दिलं नि आतल्या दालनात शिरलो. तिथले सव्यापसव्य उरकून आणखी पलिकडे असलेल्या प्रशस्त लाऊंजमध्ये आलो.

लाऊंजमधल्या आरामशीर खुर्च्यांवर लुफ्टहांजाच्या फ्रांक्फुर्ट् फ्लाइटनं जाणारे प्रवासी पसरले होते.

सुटाबुटातल्या शे-दीडशे प्रवाशांमध्ये पँट नि अर्ध्या बाह्यांचा मॅनिला घातलेला मी तिथे गेल्यावर अक्षरशः प्रत्येकानं माझ्याकडे विचित्रपणे कटाक्ष टाकले. मी एका खुर्चीवर टेकलो.

अजून कितीतरी वेळ काढायचा होता. जर्मनीला जायची इच्छा — फार काळ मनात वाळगलेली इच्छा पूर्ण होण्याची वेळ सेकंदा-सेकंदानं जवळ येत होती. कितीतरी गोष्टी आठवत होत्या, अगदी नुकत्याच घडून गेल्यासारख्या—

...संधी एकदा हुकली की पुन: येत नाही ह्यावर माझा विश्वास नाही पण युरोपला जायची पहिली संधी हुकल्यावर मध्यंतरी वर्षांवर वर्षं लोटली त्यामुळे असं वाटायला लागलं की लोक म्हणतात ते खरंच असेल. भरीप भर म्हणून आजपर्यंत भेटलेल्या झाडून साऱ्या फलज्योतिषांनी मला गांभीर्यानं सांगितलं होतं की तुम्हाला परदेशी जाण्याचा योग नाही, तुमच्या पत्रिकेत नाही नी तुमच्या हातावरही कुठे दिसत नाही ! — पण मी आशा सोडली नव्हती.

पुऱ्या एक तपानंतर पुन: एकदा संधी चालून आली होती. आनंद वाटला तरी आनंदानं उड्या मारण्याचं वय गेलं असं वाटलं. मी विद्यार्थी म्हणून जर्मनीला चाललो नव्हतो तर तिथल्या एका मोठ्या संस्थेत परदेशीयांना जर्मन भाषा शिकवण्याचे जे वर्ग चालतात ते बघायला, तिथे शिकवायला चाललो होतो. सुधारलेल्या, पुढारलेल्या जगात जायची संधी मिळत होती, त्यामुळे तर माझ्यातला भटक्या फारच सुखावला होता. जर्मनीत जाऊन आपल्या विषयातल्या चार गोष्टी सांगायची अपूर्व संधी मला लाभणार होती, भारतीय उपखंडातल्या भ्रमंतीतले वेगवेगळे अनुभव सांगण्याची संधी मिळणार होती, व्यासपीठ

मिळणार होतं. ह्या पूर्वसंचिताच्या आधारानं आणखी नवे अनुभव घ्यायला मिळणार होते !

मी तयारीला लागलो. पारपत्रापासून म्हणजे पासपोर्टपासूनच सुरवात करायची होती. शासकीय सेवा म्हणजे चित्रविचित्र अशा अनंत नियमांनी सेवकाला करकचून बांधून टाकणारी सेवा (?) असते, ह्याचा पुन:प्रत्यय आला – फारच कटू स्वरूपात – कदाचित मी खूप उत्साहात असल्यामुळे असेल, पण अतिशय कटू वाटला.

आदरणीय प्राचार्य, माननीय शिक्षणसंचालक ह्यांचं कार्यालय ह्यानी अत्यंत तत्परतेनं, जातीनं, लक्ष घालून विविध नियमांचा बडगा दाखवला. मी जाऊ नये किंबहुना मला जाताच येऊ नये म्हणून शेवटपर्यंत प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण जगात थोडीफार का होईना, चांगली माणसं असतात. खरं तर जग अशा चांगल्या लोकांमुळेच चालू असतं. आमचं महाविद्यालय किंवा शिक्षणसंचालकांचं कार्यालय तरी ह्याला अपवाद कसं असणार !

पासपोर्ट, व्हिसा, फॉरिन एक्स्चेंज वगैरे गोष्टींबद्दल सामान्यत: भीती असते पण त्यात भयंकर, अवघड असं खरोखरच काही नसतं. ह्या सर्व गोष्टी विनासायास पार पडल्या. कृत्रिम अडचणीही एव्हाना दूर झाल्या होत्या.

जाण्याचा दिवस जवळ आला. सामानाची जमवाजमव केली. माझी एरव्हीची सवय म्हणजे अगदी अत्यावश्यक असे चारदोन कपडे, नकाशे वगैरे वस्तू हॅवरसॅकमध्ये भरायच्या, सॅक पाठीवर अडकवायची नि निघायचं ! पण ह्या वेळी खूप दूर जायचं होतं. तिथे मला लोक एक भारतीय – भारताचा प्रतिनिधी म्हणून ओळखणार होते. माझ्यावर अधिक मोठी जबाबदारी आहे असं दडपण उगाचच येत होतं. अखेरीस झाली एकदाची तयारी ! एका दणकट बॅगेत मोजकेच कपडे, भेटीदाखल देता येतील अशा खूपशा पण छोट्या-छोट्या वस्तू, नकाशे असं सारं मिळून सहा-सात किलोचं वजन भरून मी तयार झालो होतो.

पुणे–मुंबई– सहारचा विमानतळ...आठवणींच्या नि कल्पनांच्या विश्वात डुंबत होतो ...नाना कल्पनांचे खेळ मनात चालू होते...बाहेरून विमानांचे प्रचंड आवाज ऐकू येत होते. विमानांची जा-ये चालूच होती. रात्रीचा, नव्हे पहाटेचा एक वाजत होता.

एवढ्यात, निळ्या गडद-नेव्हीब्ल्यू रंगाच्या लांब कोटातली, जाडजूड, धिप्पाड, गोरीपान स्त्री लाउंजच्या काचेच्या दारातून आत आली. तिच्या डोक्यावरही नेव्हीब्ल्यू रंगाची ऐटदार टोपी होती. आपल्या हातातल्या छोट्याशा पण शक्तिशाली ध्वनिवर्धकावरून तिनं उड्डाणाची वाट पाहत बसलेल्या आम्हा प्रवाशांचं 'लुफ्ट्हांजा' च्या वतीनं प्रथम स्वागत केलं. उतारूंना आवश्यक त्या सूचना देऊन ती सबला स्वागतिका आम्हा प्रवाशांना मिनीबसमधून अतिप्रचंड जम्बो जेटपाशी घेऊन आली.

प्रखर प्रकाशाच्या झोतात आम्ही अजस्र जेटकडे निघालो. शिडीच्या पायऱ्या चढून विमानाच्या प्रवेशद्वारापाशी आलो.

"गुटेन् मोऽर्गेन् !" नेव्हीब्ल्यू रंगाच्या लांब कोटातली एक देखणी, गोरकाय हवाई

सुंदरी स्वागत करीत म्हणाली.

"गुटेन् मोऽर्गेन् !" म्हणून स्मित करीत मी विमानात प्रवेश केला. खिडकीजवळच्या माझ्या आसनावर जाऊन बसलो.

उडायला – आकाशात झेप घ्यायला मी अतीव उत्सुक झालो होतो. मला पंख नव्हते तरीही उडायला – अक्षरश: उडायला सिद्ध झालो होतो. अधीर झालो होतो. पुढ्यातल्या जाळीच्या पिशवीतले हेडफोन काढून कानाला लावले नि अनपेक्षितपणे बेठोफेनच्या पाचव्या सिंफनीतले धीरगंभीर सूर कानावर पडले ! निमिषार्धातच श्रोत्यांना वेगळ्या वातावरणात घेऊन जाण्याचं विलक्षण सामर्थ्य होतं त्या सुरावटीत. एवढ्यात विमानाच्या उड्डाणाची तयारी पूर्ण झाली होती. पट्टे आवळले गेले...वाटेत कुठेही न थांबता, एका दमात ६५६७ किलोमीटरचं उड्डाण करून फ्रांक्फुर्टला उतरणारं आमचं विमान निघालं. बघता बघता आकाशात झेपावलं–

□

# प्रथम तुज पाहता

फ्रांक्फुर्ट्च्या घड्याळात सहाच वाजत होते. तरी सूर्य चांगलाच वर आलेला दिसत होता. गर्द झाडीतून, जंगलातून, लांबरुंद सरळच्या सरळ रस्ते, त्यावरून भरधाव जाणाऱ्या मोटारी मजेशीर दिसत होत्या. एक मोठी नदीही आता दिसायला लागली होती. एवढ्यात बैठकीला असलेले पट्टे बांधण्याची सूचना सांगितली गेली. सर्वांनी आपापले पट्टे आवळून बांधले. विमान हळूहळू खाली येत होते. थोड्याच वेळात विमान सुखरूपपणे एका प्रचंड विमानतळावर उतरले– हाच तो युरोपातील सर्वात मोठा विमानतळ. 'फ्रांक्फुर्ट्'चा. आम्ही ह्याचे वेडेवाकडे बरेच उच्चार करतो पण ह्याचे खरे नाव 'फ्रांक्फुर्ट्' नि नुसतं फ्रांक्फुर्ट् नाही तर 'फ्रांक्फुर्ट् आम माइन' ( Frankfurt am Main ) असं आहे. 'आम माइन' ही काय भानगड आहे ? 'माइन्' नावाची नदी जर्मनीत आहे– ही नदी पुढे 'राइन' नदीला मिळते, तर ह्या माइन नदीच्या काठी वसलेलं ते 'फ्रांक्फुर्ट् आम माईन्.' ह्या खटाटोपाचं कारण असं की जर्मनीत ह्याच नावाचे आणखी एक गाव आहे. एकाच नावाच्या दोन गावांना ओळखण्यासाठी आपणही अशाच काही खुणा' ठरवत असतो. उदा. – आळंदी देवाची, आळंदी चोराची इत्यादी. दुसरं फ्रांक्फुर्ट् 'ओडर ह्या नदीच्या काठावर वसलेलं आहे म्हणून त्याला "फ्रांक्फुर्ट् आन् डेर ओडर्" (Frankfurt an der Oder) म्हणतात–हे गाव बर्लिनच्या पूर्वेला पोलंडच्या सरहद्दीजवळ आहे.

कित्येक देशांबद्दल, गावांबद्दल आपण चित्रविचित्र कल्पना केलेल्या असतात. खरं म्हणजे गैरसमजच असतात. पण ते इतके पक्के असतात की ते खोटे आहेत हे आपल्या लक्षातच येत नाही. आता जर्मनी ह्या देशाचंच बघा– "जर्मन" आणि "जर्मनी" हे इंग्लिश शब्द आपण नेहमी वापरतो. जर्मनी हा देश नी त्या देशातली भाषा किंवा तत्संबंधी जे असेल ते जर्मन, असे ह्या शब्दांचे इंग्लिशमधले मूळ अर्थ. पण आपल्याकडे बरीच मंडळी ते अगदी उलटच्या अर्थाने वापरतात–"आमच्या मन्याला कंपनीतर्फे जर्मनला पाठवणार आहेत म्हणून तो हल्ली जर्मनी शिकतोय!" पण जर्मन आणि जर्मनी हे दोन्ही शब्दच जर्मनीत नाहीत नि जर्मनमध्येही नाहीत असं म्हटलं तर विश्वास नाही ना बसत? पण खरं आहे! जर्मनीचं खरं नाव आहे डॉइचलांट् (Deutschland) आणि तिथल्या भाषेचं नाव आहे डॉइच् (Deutsch). डॉइच् ह्या मूळ शब्दाचा अर्थ जनता– जनतेची भाषा, लोकभाषा म्हणजे डॉइच् आणि ती बोलणाऱ्यांचा देश म्हणजे डॉइच्लांट्. त्या त्या देशांची खरी नावे न वापरता काही वेगळीच नावं वापरण्याची विलक्षण पद्धत युरोपात आहे. डॉइच्लांटला इंग्लिशमध्ये "जर्मनी" म्हणतात, फ्रेंचमध्ये "लालमान्य"! इंग्लिशमध्ये ज्या देशाला स्वीडन् म्हणतात त्याला जर्मनीत "श्वेडेन्" म्हणतात, तर खुद्द त्या देशातले लोक आपल्या देशाला "स्वारिये" म्हणतात! आपल्या देशाला कोणी "इंडिया," "अँद," "इंडिएन्" असं काही म्हणण्यापेक्षा "भारत" म्हटलं तर ते आपल्याला आवडतं. तर मग आपणही इतर देशांना आपल्या कल्पनेप्रमाणे नावं ठेवण्यापेक्षा त्या त्या देशांची अधिकृत नावं वापरली तर हा गोंधळ किती कमी होईल.

फ्रांक्फुर्ट्च्या विशाल विमानतळावरचे कस्टमचे सर्व सोपस्कार उरकून बाहेर पडलो. "ऊबान"नं म्हणजे भुयारी रेल्वेनं गावात यायला निघालो. फ्रांक्फुर्ट्चा विमानतळ गावापासून खूपच दूर आहे. माइन नदीच्या डाव्या तीरावर (नदी ज्या ज्या बाजूनं वाहत असेल त्या प्रवाहाची डावी बाजू म्हणजे डावा तीर नी उजवी बाजू म्हणजे उजवा तीर). फ्रांक्फुर्ट् गावात मुख्य रेल्वे स्टेशन– हाउप्ट्बान्होफ् –उजव्या तीरावर आहे.

विमानतळाच्या बाहेर माहिती-केंद्राजवळच रेल्वेचं कार्यालय आहे. "DB" डॉइचबान् हे पश्चिम जर्मनीच्या रेल्वेचं चिन्ह आहे. इथल्या कार्यालयातून २॥ मार्क देऊन फ्लूक्हाफन् (विमानतळ) ते हाउप्ट्बान्होफ् (मुख्य रेल्वे स्टेशन) असं तिकिट घेतलं.

माझ्याजवळ तसं फारसं सामान नव्हतंच – एक छोटीशी बॅग नि जवळ जवळ रिकामीच असलेली हँडबॅग. विमानतळावर सामान ठेवण्यासाठी क्लोकरूम आहे, पण त्याशिवाय लॉकर्सचीही उत्तम व्यवस्था आहे. लहान नि मोठ्या अशा आकारांचे लॉकर्स असतात. त्यात मावेल तेवढं सामान ठेवता येतं, त्यामुळे क्लोकरूमप्रमाणे नगावर पैसे द्यावे लागत नाहीत. त्यात सामान ठेवायचं, दार बंद करायचं, दाराजवळच किल्ली असते, त्या किल्लीच्या वरच्या बाजूलाच एक फट असते, त्यात एक मार्कचं नाणं टाकून किल्ली फिरवायची–नाणं

टाकलं नाही तर किल्ली फिरतच नाही— किल्ली फिरवून लॉकर बंद करायचा नी किल्ली काढून घेऊन आपल्याजवळ ठेवायची. लॉकर बंद करताच त्यात असलेलं घड्याळ लगेच चालू होतं, त्या घड्याळानुसार २४ तास पूर्ण होण्यापूर्वी किल्लीचा वापर करून आपल्याला सामान काढून घेता येतं. २४ तास उलटून गेल्यावर कुलूप उघडत नाही—त्यासाठी त्यात पुन: १ मार्कचं नाणं टाकावं लागतं-थोडक्यात २४ तासाला १ मार्क हे भाडं. मी माझी बॅग एका लॉकरमध्ये ठेवली. आवश्यक ते कपडे, यूथ हॉस्टेलचं कार्ड, पारपत्र— परदेशात हे सारखंच आपल्याजवळ बाळगावं लागतं—असं सामान हँडबॅगेत घेऊन कपाट बंद करून किल्ली खिशात टाकली आणि जिना उतरून खाली आलो.

आता मात्र खाली, जमिनीच्या खाली आलो होतो. तरीही सर्वत्र लख्ख प्रकाश आणि विलक्षण स्वच्छता होती. गाडीत पाऊल टाकल्यावर अक्षरश: गोंधळलोच. तो डबा चक्क रिकामा होता ! आपल्याला गर्दीची इतकी सवय झालेली असते की त्यामुळे तो रिकामा डबा बघून असं वाटलं की ही गाडी पुढे जाणारी नसावी, म्हणून त्याच पावली पीछे मुड केलं. तेवढ्यात एक माणूस डब्यात शिरताना दिसला. त्याच्याकडे चौकशी केली तेव्हा गाडी मुख्य स्टेशनवर जाणार असल्याचं कळलं. एकाच गावात अनेक स्थानकं असली तर मुख्य स्थानकाला हाउप्ट्बान्होफ् म्हणतात.

ह्या भुयारी गाड्या इतक्या वेगवान असतात की अगदी थोड्या वेळात भल्या मोठ्या शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत घेऊन जातात. प्रचंड गती असूनही गाडीत धडधडाट, खडखडाट मुळीच नसतो. काही मिनिटातच हाउप्ट्बान्होफवरती पोहोचलो. माहितीकेंद्रातून प्रथम गावाचं मानचित्र घेतलं. ते बघितल्यावर लक्षात आलं की आपण गावातच आहोत. रस्ता ओलांडून समोरच्या काइझर रस्त्यानं चालायला लागणं म्हणजे गावातूनच जाणं. गावातील सर्व प्रेक्षणीय स्थळं ह्या मुख्य रेल्वे स्टेशनापासून दूर नव्हती. सहज चालत जाण्याइतक्या अंतरावर होती. पर्यटकांच्या दृष्टीनं ह्या गोष्टीचं महत्त्व फार आहे.

तसं म्हटलं तर ह्यापूर्वीही मी परदेशात गेलो होतो, नेपाळला पण बरेच दिवस राहूनही मला नेपाळमध्ये कधीच परकेपणा वाटला नाही. काल रात्री मुंबईत होतो आणि नंतर काही तासच विमानात घालवल्यानंतर ज्या भूमीला पाय लागले ती भूमी फारच वेगळी होती, हे अक्षरश: पावलोपावली जाणवत होतं. " काय वाटलं (किंवा काय काय वाटलं) हे सांगणं कठीण !" असं म्हणत नाही कारण ते सर्व सांगावं ह्या इच्छेनंच हे लिहायला घेतलं आहे. आल्हाददायक हवा, विलक्षण स्वच्छता, वेगवेगळ्या रंगांची, भिन्न कपड्यातली माणसं, मस्त मोटारी, वाहनांचा तुफान वेग... इतकी वर्षं जे चित्रांतच पाहिलं ते आज प्रत्यक्ष बघत होतो.

१९६१ मध्ये जर्मन शिकायला आरंभ केला तेव्हापासून फ्रांक्फुर्ट् म्हणजे महाकवी

ग्यॅअठऽचं गाव हे डोक्यात पक्कं होतं. त्यामुळे फ्रांक्फुर्ट्बद्दल विशेष आत्मीयता वाटत होती. परदेशातली अनेक चित्रं, फोटो बघून तिथे जावं, ती ठिकाणं बघावीत असं प्रत्येकालाच सामान्यत: वाटतं कमी–अधिक तीव्रतेनं पण माझं स्वप्न मात्र आज स्वप्न राहिलं नव्हतं. पंखाशिवाय उडत–उडत, खऱ्याखुऱ्या परदेशातल्या परक्या वातावरणात मी सदेह येऊन पोहोचलो होतो ! इथल्या परक्या वातावरणात एक गोष्ट मात्र मला फार जवळची वाटत होती, ती म्हणजे जर्मन भाषा ! अगदी पहिल्या दिवशीसुद्धा मला सर्वांचं सर्व बोलणं कळत होतं आणि इतरानाही माझं बोलणं समजत होतं. तिथे मात्र कसलाच दुरावा नव्हता. मला जर्मन शिकविणाऱ्या सर्वच प्राध्यापकांचं मी अत्यंत कृतज्ञतापूर्वक स्मरण केलं ! ! !

रस्ता ओलांडून समोर आलो. एक रस्ता सरळ समोर जात होता. हाच तो काइझर श्ट्रास–सम्राट पथ ! हाउप्ट्बान्होफपासून निघणारा हा रस्ता पुढे सरळ काइझर चौकापर्यंत जातो. मी काइझर चौकाच्या दिशेनं निघालो.

चार–दोन मिनिटंच जेमतेम चाललो असेन नसेन पण तेवढ्यातच एक अगदी भागळीवेगळी गोष्ट दृष्टीस पडली. ह्यापूर्वी कधीही न पाहिलेली–Sex shop's ! रस्त्याच्या दोन्ही बाजूंना एक-आड–एक दुकान तेच होतं ! ह्या देशात सर्व काही "मुक्त" आहे. केवळ लैंगिक वाङ्मयाची नि साहित्याची विक्री करणारी असंख्य दुकानं आहेत ! (त्यातही स्पेशलायझेशन असतं !) ह्या सर्व दुकानांमधून गिऱ्हाईकांची गर्दीही भरपूर ! पहिल्या चार–दोन दुकानांवरून जाताना मलाच जरा बिचकल्यासारखं झालं !

कपड्यांची दुकानं, सेंटची दुकानं, कॅमेऱ्यांची अवाढव्य दुकानं, त्यातून अनेक प्रकारचे अक्षरश: हजारो कॅमेरे आकर्षक पद्धतीनं मांडून ठेवलेले. असं दृश्य आयुष्यात पहिल्यांदाच पाहत होतो ! लहान मुलाप्रमाणे कितीतरी वेळ मी ते दृश्य पाहत राहिलो. वेळेचं भानच विसरलो. तास केव्हाच होऊन गेला होता पण मी हाउप्ट्बान्होफपासून फारसा दूर गेलोच नव्हतो. स्टेशन समोरच दिसत होतं ! आता आणखी काही महिने अशी वैपुल्याची, समृद्धीची दृश्यं आपल्याला बघायला मिळणार आहेतच, तेव्हा आता बस, असा विचार करून मी पुढे चालायला लागलो नि काही वेळातच काइझर चौकात येऊन पोहोचलो.

"धन्यास्तदङ्‌रजसा मलिनी अवन्ती" ह्या कालिदासाच्या ओळी वाचून आनंदानं बेहोश होऊन नाचणारा महान जर्मन कवी ग्यॅअठऽ (Goethe) फ्रांक्फुर्ट्चाच. त्याचं घर पाहणं हा माझा पहिला कार्यक्रम होता. भलं मोठं फ्रांक्फुर्ट् शहर, ते काय एक – दोन दिवसात थोडंच बघून होणार होतं ! पण जे काय बघायचं होतं, त्यात ग्यॉआठऽच्या घराचा क्रम पहिला होता.

हातातल्या नकाशाच्या आधारानं काइझर चौकापासून निघालो. खरं म्हणजे जरा पुढेच आलो होतो, पण फारसं काही बिघडलं नव्हतं. तिथून एका छोट्याशा गल्लीत शिरलो.

घराला घर लागून. दगडी खांबांची नी वेगवेगळ्या प्रकारच्या कमानींची घरं. गल्लीत वर्दळ अशी नव्हतीच क्वचित एखादी गोरी, स्थूल, वयस्क जर्मन स्त्री दृष्टीस पडत होती. कुठे एखादा मुलगा दगडी रस्त्यावरून टॉक्टॉक् बूट वाजवत पळताना दिसत होता.

गल्ल्याबोळ पार करून एका रस्त्याला लागलो नि तेवढ्यात खळ्ळ् असा एखादी काचेची वस्तू पडून फुटल्याचा आवाज झाला! समोरच ग्यॉअठऽचं घर दिसत होतं. तेवढ्यात पुन्हा एकदा खळ्ळ् आवाज झाला! समोरच चांगली चार–पाच मजली भव्य इमारत. फ्रांक्फुर्ट्मध्ये मी पहिल्यांदाच आलो होतो तरी पूर्वी चित्रात पाहिलेलं असल्या-मुळे मी ते घर ताबडतोब ओळखलं.

...दुसऱ्या मजल्यावर काचेच्या सात भव्य खिडक्या होत्या. त्यातली मधली खिडकी उघडी वाटत होती. एक लहान मुलगा, पाच – सहा वर्षांचा असेल; खिडकीपाशी येत होता नी हातातली प्लेट, कप, बशी, मग अशा काचेच्या वस्तू एक एक करत रस्त्यावर टाकत होता! वस्तू खाली पडून आवाज करत फुटली की तो खट्याळ मुलगा आनंदानं टाळ्या वाजवत होता. पुन्हा पुन्हा तो मंजूळ आवाज ऐकण्यासाठी घरातून काचेच्या वस्तू आणून रस्त्यावर टाकत होता!!!

मी डोळे चोळले, छे! मला भास झाला होता! ग्यॉअठऽच्या जीवनातली वाचलेली खरीखुरी घटना मला आता दिसली होती! मी भासच पाहिला होता. पण किती रम्य!

"योहान् वोल्फगाङ् फोन् ग्यॉअठऽ इथेच राहतात का हो?" असं विचारण्यासाठी मी त्या घराला लागून शेजारीच असलेल्या उघड्या दरवाजातून आत शिरलो. योगायोगानं ग्यॉअठऽच्या घरात जायचा सध्याचा रस्ता तोच होता. घराची डागडुजी चालू होती. खिड-क्याना काचा बसवण्याचं काम चालू होतं, जुन्या काचा कोपऱ्यात टाकल्या जात होत्या नि त्या टाकल्या जाणाऱ्या काचांचा खळ्ळ् खळ्ळ् असा आवाज येत होता!

दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या काही दिवसात फ्रांक्फुर्ट् शहरावर जो भयानक बॉम्ब-वर्षाव झाला त्यात ग्यॉअठऽच्या घराची दुर्दशा झाली. युद्धसमाप्तीनंतर हळूहळू स्थिर-स्थावर झाल्यावर महत्त्वाच्या वास्तूंची डागडुजी सुरू झाली. ग्यॉअठऽचं घर बॉम्बिंगमध्ये इतकं पडलं होतं की त्याची दुरुस्ती करणं कठीण होतं. कलाक्षेत्रातल्या नी बांधकामक्षेत्रातल्या तज्ज्ञांचं मत असं पडलं की ह्या घराची दुरुस्ती करण्यापेक्षा उरलेल्या भिंतीही नीटपणे उतरवून मूळच्या आराखड्यानुसार हे राष्ट्रीय स्मारक जसंच्या तसं पुन्हा एकदा बांधून काढावं–तज्ज्ञांचा सल्ला मानला गेला! फरक? मिलिमीटरचा सुध्दा नाही. १८–१९ व्या शतकातल्या वस्तूंनी, फर्निचरनं नवी वास्तू पुन्हा सजली. ग्यॉअठऽचा जन्म ह्याच घरात झाला. तेव्हापासून ते उच्च शिक्षणासाठी लाइप्त्सिशला जाईपर्यंत ग्यॉअठऽ ह्याच घरात राहिला होता. त्या दिवशी आतल्या बाजूनं रंगरंगोटीचं काम असल्यामुळे आतून हिंडता आलं नाही. खालच्या मजल्यावरून जमेल तेवढं बघून घेतलं. १८ वं–१९ वं शतक जणू

फोटोसाठी पोझ देऊन उभं होतं ! मनात आलं की आमच्याकडच्या जुन्या जुन्या वास्तूंचं त्या केवळ जुन्या आहेत म्हणून नव्हे–पण ज्यांचं काही ऐतिहासिक, स्थापत्यशास्त्रीय महत्त्व आहे नि ज्या अजून सुदैवानं सुस्थितीत आहेत, त्यांचं रक्षण करण्याची आमची काही जबाबदारी आहे की नाही ? त्या वास्तूंना नालायक वारसदार लाभले असतील तर आम्ही फक्त हळहळत बसायचं का ? त्या वास्तू जमिनदोस्त बनवल्या जात असताना, तिथे काँक्रिटची जंगलं वाढत असताना आम्ही ते प्रकार बघत रहायचे ? डोळ्यावर कातडं ओढून घ्यायचं ?

ग्यॉअठऽच्या घराचं दर्शन घेऊन पलिकडच्या दुसऱ्या रस्त्यानं पुन्हा एकदा काइझर चौकात आलो.

काइझर चौकापाशी पिवळसर वाळूचे बरेचसे ढीग दिसले. बघतो तर पुढचा रस्ता खणलेला ! नवा रस्ता तयार झाला रे झाला की पाणी, ड्रेनेज, वीज, टेलिफोन अशा कोणत्या ना कोणत्या तरी खात्यानं येऊन तो नवा रस्ता तत्परतेनं खणायला सुरुवात करायची असा आपल्याकडच्यासारखा प्रकार इकडेही आहे की काय अशी शंका आली. पण चौकशी केल्यावर कळलं की भुयारी रेल्वेच्या विस्ताराचं काम चालू आहे. कलकत्त्यात चालू असलेलं भुयारी रेल्वेचं काम नुकतंच बघितलं होतं दोन्ही ठिकाणच्या कामात केवढं अंतर होतं ! यंत्रांच्या वापरांचा भाग सोडला तरी हे काम चालू असतानाही इतर वाहतूक सुरळीत चालू रहावी ह्यासाठी घेतलेली काळजी, केलेली पर्यायी व्यवस्था विलक्षण कौतुकास्पद होती !

"काउफ्होफ्," "काउफ्हालऽ," "कार्लश्टाट्" ह्या चित्रात पाहिलेल्या, कुठेतरी वाचलेल्या मोठमोठ्या पाट्या आता अगदी समोरच प्रत्यक्षात दिसत होत्या.

ह्या आणि अशाच काही बड्या कंपन्यांची प्रचंड दुकानं पश्चिम जर्मनीतल्या जवळजवळ प्रत्येक गावात आहेत. एकेक दुकान म्हणजे चार सहा मजल्यांची जंगी इमारतच असते ! त्यात सरकते जिने असतात, रेस्टारन्ट असतात, हरतऱ्हेच्या वस्तूंची अत्यंत आकर्षक मांडणी असते. सामान्यत: एखाद्या दुकानात शिरलो की, आपल्याला सर्व काही मिळू शकतं.

मी प्रथम जीवनावश्यक (जेवणावश्यकच खरे म्हणजे) वस्तूंच्या विभागात शिरलो. कारण आता भूक लागली होती– दूध, ताक (हो, ताकही मिळतं इथे) लोणी, तूप-चक्क गायीचं कणीदार तूप, चक्का – मलईचा नी बिन मलईचासुद्धा, पावांचे अनंत प्रकार नी आकार, चीजचे असंख्य देशीविदेशी प्रकार, आकार नी रंगही ! भाज्यांचे नि फळांचे स्टॉलही फारच देखणे होते. रंगीबेरंगी, चित्ताकर्षक. जगात उपलब्ध असणारी कोणतीही वस्तू इथे सहज उपलब्ध असते. कितीतरी गोष्टींची गंमत वाटली छोट्याशा कलिंगडाच्या अर्ध्या किंवा पाव फोडी प्लॅस्टिकच्या कागदात गुंडाळून विकायला ठेवलेल्या असतात अशा

फोडी घेणं आपल्याकडे शिष्टसंमत नाही. जर्मनीतल्या अनेक गावांतून, तिथल्या बाजारातून, फळाफुलांच्या खास बाजारातूनही मी हिंडलो, पण आख्खं—न कापलेलं कलिंगड विकायला ठेवलेलं मी कुठेही बघितलं नाही ! कानपूरला असतानाची गोष्ट ! एकदा आम्ही ब्रह्मावर्तला गेलो होतो. भल्या मोठ्या कलिंगडांचे अक्षरशः डोंगर रचून ठेवलेले असतात तिथे. गंगा नदीत मनसोक्त डुंबून आठ आण्याचं एक कलिंगड घेतलं. चांगलं ३५।४० सेंटीमीटर व्यासाचं. काय रंग होता ! काय चव होती ! गंगामैया की कृपा ! आम्हा चौघांना पुरून उरलं ! नि इथे ? चिमुकली कलिंगडं नि त्याच्या इवल्या इवल्या फोडी.

एवढ्यात एका चिमुकल्या फळानं माझं लक्ष वेधून घेतलं "न्यूझीलंडमधील किविफळ" असं त्या फळांच्या कप्प्यावर लिहिलेलं होतं सुमारे १०–१२ सेंटीमीटर लांबीचं, तपकिरी हिरव्या रंगाचं, तोंडल्यासारख्या डिबुक्या आकाराचं फळ, किंमत २ मार्क. (फक्त !) परदेशातला पहिलाच दिवस, एक मार्क म्हणजे ५ रुपये हा हिशेब विमानात बसल्या बसल्या घोकला होता त्यामुळे २ मार्क म्हणजे १० रुपये देऊन हे चिमुकलं फळ घ्यायचं का ? पण घेतलं, धीर करून घेतलं, भारतात जे एवढ्या वर्षांत बघायलाही मिळालं नाही ते प्रत्यक्ष खाण्याची संधी मिळालेली असताना सोडता कामा नये, असा विचार करून घेतलं. किवी महाग होतं ह्यात शंकाच नाही, पण मस्त होतं हेही निर्विवाद ! पुढे काही दिवसानी अमुक मार्क म्हणजे अमुक रुपये असा हिशेब करण्याची (वाईट) सवय कमी झाल्यावर किवी फळांचा, किवी आइस्क्रिमचा आस्वाद बऱ्याचदा घेतला.

ह्या मायानगरीच्या वेगवेगळ्या विभागातून धावत होतो. तिथली समृद्धी पाहून डोळे दिपत होते— सगळंच घ्यावं असं वाटत होतं, पण...ती समृद्धी, श्रीमंती बघूनही शेवटी थकवा आला आणि आता बाहेर पडावं असा विचार केला. एवढ्यात भारतीय चेहेऱ्याचा एक युवक दिसला. मला बघून तोही थांबला. दोघांनी स्मित केलं मग मीच पुढे होऊन त्याच्याशी हस्तांदोलन केलं— माझा परिचय करून दिला, त्यानंही आपलं नाव सांगितलं. रफिक अहमद शाह. त्याच्या हिन्दीवरून तो बंगालमधला असावा असं वाटलं. तो खरोखरच बंगालमधला—पूर्व बंगालमधल्या खुलन्यातला निघाला ! युरोपात हिंडत असताना एक गोष्ट मला नेहमीच तीव्रतेनं जाणवली—अत्यंत सुखद वाटली—भारत, पाक, बांगला देश हे भेद तिथं नाहीत—म्हणजे स्थानिक लोकांच्या दृष्टीनं नाहीत नि आशियाईंच्या दृष्टीनंही नाहीत— मग भारतीय उपखंडात हे भेद आम्ही आणखी किती दिवस शिल्लक ठेवणार आहोत ?

भरल्या रस्त्यावरून, एक चक्कर मारून आम्ही "मॅक्डोनल्ड" मध्ये शिरलो. मॅक्डोनल्ड कंपनीची रेस्टारन्ट जर्मनीतच नव्हे तर युरोपभर आहेत. स्वयंसेवा हे इथलं वैशिष्ठ्य. कौन्टरपाशी जाऊन आपल्याला काय हवं ते सांगायचं, तिथल्यातिथेच त्याचे पैसे द्यायचे, तोपर्यंत तिथला तत्पर सेवक एका ट्रेमध्ये आपण सांगितलेले पदार्थ घालून ते आपल्या.

समोर ठेवतो. ट्रे घेऊन आपण एखाद्या टेबलापाशी जाऊन बसावं किंवा पदार्थ आपल्या पिशवीत ठेवून ट्रे कोपऱ्यात ठेवून सरळ बाहेर पडावं, रस्त्यातून फिरत फिरत त्या गरमागरम, रुचकर पदार्थांचा आस्वाद घ्यावा—स्वयंसेवा असल्यामुळे पदार्थांची प्रत उत्तम असूनही किंमत खूप कमी असते. तथाकथित सेवा आली की किंमत चढलीच !

बिअरचे कागदी ग्लास नि बटाटयाच्या तळलेल्या फोडींची कागदी प्लेट ट्रेमध्ये घेऊन आम्ही एका छोटयाशा टेबलापाशी येऊन बसलो. बऱ्याच वेळानं बिअर संपली, पण गप्पा संपल्या नव्हत्या !

रिकामे ग्लास नि प्लेट कोपऱ्यात ठेवलेल्या कचऱ्याच्या डब्यात टाकून, ट्रे टेबलावर ठेवून आम्ही बाहेर पडलो.

रफिकची ड्यूटी सकाळीच संपलेली असल्यामुळे माझ्याबरोबर भटकायला तो मोकळा आहे हे कळल्यावर मला फारच आनंद झाला.

ग्यॉअठऽच्या घरावरून निघालो ते पलिकडच्या बेर्लीनर श्ट्रासऽवरून ऱ्यॉमेर ह्या प्रसिद्ध, ऐतिहासिक चौकात आलो. तांबूस रंगाच्या घडीव दगडांनी बांधून काढलेला विशाल चौक. त्याच्या आसपासचे रस्तेही असेच घडीव दगडांचे—नक्षीकाम केलेले. युरोपात, विशेषत: जर्मनीत घडीव दगडांचे रस्ते हे मोठंच वैशिष्ठ्च आहे. प्रत्येक गावाच्या मध्यातले (जुन्या गावातले) रस्ते असेच असतात नि ते फक्त पादचाऱ्यांसाठीच असतात—पाय मारून चालवली जाणारी दुचाकी अर्थात् ह्या रस्त्यांवरून जाऊ शकते पण इतर वाहनं मात्र चुकूनही नाही. माझ्या वास्तव्यात चुकूनही एखादं वाहन पादचारी विभागातल्या रस्त्यांवर दिसलं नाही—अगदी पोलिसांची गाडीसुद्धा नाही !

तुळशीवृंदावनाच्या चिरेबंदी चौकात जसं प्रसन्न वाटतं तसं वाटत होतं ! ठिकठिकाणी रंगीबेरंगी फुलझाडं लावलेली होती. चौकाच्या एका बाजूला पाउलस्किर्शऽ – पाउलचं चर्च. एका बाजूला राट्हाऊस् म्हणजे टाउन हॉल. पलिकडच्या बाजूला मोठा प्रशस्त प्राचीन—रोमन काळातला चौक. म्हणूनच ह्याला ऱ्यॉमेर म्हणतात. ऱ्यॉमेरच्या पलीकडे इथलं प्रसिद्ध डोम् म्हणजे कॅथेड्रल, (चर्च आणि कॅथेड्रल ही दोन्ही तशी प्रार्थनामंदिरंच. चॅपल म्हणजे खाजगी प्रार्थनामंदिर, चर्च किर्शऽ म्हणजे सर्वांसाठी असणारं प्रार्थनामंदिर नि कॅथेड्रल—डोम् म्हणजे ज्या प्रार्थनामंदिराचा मुख्य अधिकारी विशिष्ट दर्जाचा असतो—बिशप असतो ते.) लाल दगडाची अजस्र इमारत—डोम ! काय महत्व होतं ह्या डोमचं ! अनेक शतकं जर्मन राजांचा राज्यारोहण समारंभ ह्या डोममध्ये होत असे !

आम्ही डोममध्ये शिरलो तेव्हा तिथल्या ओर्गेलवर अत्यंत आकर्षक सुरावट वाजवली जात होती. तिथलं शांत वातावरण त्यामुळे अधिकच प्रसन्न—गंभीर वाटत होतं. चर्चमधलं संगीत नेहमीच उदात्त बनवतं अति उंच वास्तूत घुमणारे त्याच उंचीचे सूर ऐकणाऱ्यावर विलक्षण परिणाम घडवतात. उजव्या बाजूच्या विस्तारित भागातल्या वरच्या मजल्या-

वरती ओर्गेल वाजत होता. ओर्गेलच्या भक्तीनं मी एका बाकावर टेकलो, रफिकही माझ्या शेजारी बसला. नंतरच्या वास्तव्यात न्युअॅर्नबेर्क्ला नि ग्यॉटिङ्न्ला असताना ओर्गेल ऐकण्यासाठी मी दर रविवारी प्रार्थनामंदिरात जात असे. ओर्गेल वादनाचे कॉन्सर्टसुद्धा इकडे होतात. ल्युबेक्ला एक ओर्गेल कॉन्सर्ट ऐकायला मिळाला होता. इतकं मस्त वाटतं की तासन् तास ऐकत रहावं...

डोममधून बाहेर पडून पाउलस किर्शऽमध्ये डोकावलो. तिथून न्यॅमेरच्या टाऊन हॉल-मध्ये गेलो. हॉलचं वरचं दालन बघायला तिकिट आहे. तिकिटं काढून आम्ही वर गेलो.

युद्धकाळात ह्या वास्तूचीही दुर्दशा झाली होती, पण फ्रांक्फुर्टच्या सूज्ञ नागरिकांनी प्रेमानं, जिद्दीनं नि कठोर परिश्रमानं ती पुनः पूर्वस्थितीत आणली. युद्धाच्या बारीक-सारीक खुणाही कुठे शिल्लक ठेवल्या नव्हत्या ! वरच्या दालनातल्या भिंतींवर " कार्ल डेअर ग्रोसऽ " ह्या जर्मनीच्या राष्ट्रपित्यापासून – पहिल्या सम्राटापासून ते १९१८ मध्ये युद्धात झालेल्या पराभवानंतर स्पेनमध्ये निघून गेलेल्या विल्हेल्मपर्यंतच्या सर्व राजांची मोठ्या आकारातली चित्रं क्रमानं लावलेली आहेत. राजांची नि सम्राटांची मालिका म्हणजे इतिहास. इतिहासातलं एक एक पान, पण दालन इतकं सुंदर सजवलेलं आहे की ती बघताना केव्हाही कंटाळा येत नाही.

तमाम जर्मन सम्राटांचा निरोप घेऊन आम्ही खाली आलो–वर्तमान काळात ! आई-स्क्रिमचे २/४ गोळे घेऊन खात–खातच तिथून अक्षरशः चार पावलांवरच असलेल्या माइन नदीच्या काठावर आलो.

विमानातून अतिशय सुंदर वाटणारी माईन नदी जवळून मात्र बघवत नव्हती ! फारच अस्वच्छ ! युरोपातल्या सर्वच नद्यांच्या वाट्याला अलिकडे हे दुर्दैव आहे–घरं, रस्ते, कार्या-लयं, कारखाने ह्यांच्या विलक्षण स्वच्छतेचं " रहस्य " ह्या नद्यांमध्येच आहे का ?

हे दिवस जर्मनीतल्या उन्हाळ्याचे. अंगावर खूप कमी कपडे ठेवून लोक हिंडत होते. लोक तलावांवर पोहायला जातात. पण नदीत कोणी डुंबत असल्याचं दृश्य दिसलं नाही–कुठेच नाही. आपल्याकडे मात्र अंग धुण्यासाठी असो किंवा पापं धुण्यासाठी असो; पण लोक नदीत यथेच्छ डुंबतात आणि आपल्याकडच्या नद्याही त्या मानानं अजून खूपच निर्मल आहेत–गंगा आहेत !

संध्याकाळ होत आली होती. ४ ४।। वाजले असतील असं वाटलं. घड्याळ बघितलं–बापरे ! ७।। वाजून गेले होते ! ७।। वाजून गेले तरी सूर्य अजून खूपच वरती होता. आल्टऽ मारिएनब्युकऽ हा माइन नदीवरचा इथला जुना पूल ओलांडून फ्रांकेन्श्टाइनर प्लाट्स जवळच्या युगेन्ट्हाइम्मध्ये-यूथ हॉस्टेलवर आम्ही चाललो होतो.

यूथ हॉस्टेलचं कार्ड, पासपोर्ट वगैरे देऊन रात्रीच्या राहण्याची सोय केली. हॉस्टेल-मध्ये अनेक स्वयंचलित यंत्रं सेवेला हजर होती. त्यातल्या एका यंत्रात पैसे टाकून गरमा-

गरम कोकोचे पेले घेऊन मी नी रफिक गच्चीवर येऊन बसलो. मस्त वाटत होतं, कारण बऱ्याच पायपिटीनंतर बसलो होतो.

रस्त्याच्या उजव्या बाजूनं सुसाट पळणारी वाहनं बघायला गंमत वाटत होती–सगळीच वाहनं रॉंगसाईड चालल्यासारखी वाटत होती ! आपल्याकडे वाहनं रस्त्याच्या डाव्या बाजूनं चालतात तर युरोपात–इंग्लंड सोडून–उजवीकडून जातात.

"दोन महिन्यांपूर्वी ही झाडं म्हणजे नुसते खराटे होती !" रस्त्यावर दुतर्फा असलेल्या उंच उंच पर्णविपुल झाडांकडे बोट दाखवत रफिक म्हणाला.

थोड्या वेळानं तळघरातल्या जेवणघरात जाऊन आम्ही गरमागरम भोजनाचा समाचार घतला– सूप, शेवया, मटण, पाव, पुडिंग. मग वर येऊन यंत्रात पैसे टाकून कॉफी घेतली नि पुन: गच्चीवर येऊन बसलो. नऊ वाजत होते–रात्रीचे म्हणत नाही, कारण अजून सूर्यास्त व्हायचाच होता !

खरं म्हणजे खूप दमलो होतो पण बाहेर चक्क उजेड आहे. भटकण्याची जबरदस्त इच्छा आहे, खूप खूप बघायचं आहे, अनुभवायचं आहे...झोप काय, नंतर केव्हाही घेता येईल अशा विचारानं उठलो. एक चक्कर मारायची होती. तसा वेळ खूप असला तरी ११ वाजेपर्यंत परतणं आवश्यक होतं कारण यूगेन्ट्हाइम्चे दरवाजे ११ ला बंद होणार होते–मी नी रफिक पुन: बाहेर पडलो.

हवेत आता किंचित गारवा जाणवत होता. रस्त्यावरची वर्दळ बरीच कमी झाली होती. रस्ता ओलांडून आम्ही नदीच्या काठावर आलो. तिथे मात्र फुललेली संध्याकाळ अजून मावळलेली नसल्याचं पाहून आश्चर्य वाटलं ! अनेक ठिकाणी आता खुर्च्या दिसत होत्या नि लोक बिअरचा आस्वाद घेत निवांतपणे गप्पा मारत बसले होते.

रफिकला आता परत जाणं भाग होतं, कारण त्याला सकाळी ३/३॥ ला उठून ४॥ वाजता कामावर हजर व्हायचं होतं. काइझर चौकापर्यंत जाऊन मी त्याचा निरोप घेतला– पुन: भेटण्याचं ठरवून. आयुष्यात आज पहिल्यांदाच आम्ही एकमेकांना बघितलं, पण निरोप घेताना असं वाटलं की आपल्या बालपणापासून असलेल्या मित्राचाच निरोप घेतोय ! रफिक...फ्रांक्फुर्ट्हून मुंबईला परत यायला निघालो तेव्हा मात्र आमची भेट होऊ शकली नाही–अजूनही त्याचं दु:ख होतं !

रफिकचा निरोप घेऊन मी पुन: नदीवर आलो. बिअरचा टिन फोडून घुटके घेत चाललो होतो. काठावरच्या तरुण-तरुणींची संख्या मुळीच कमी झाली नव्हती. केरकचरा टाकण्यासाठी ठिकठिकाणी ठेवलेले डबे मात्र गच्च भरले होते. गप्पा थंडावल्यासारख्या वाटत होत्या. घोळक्यांचं रूपांतर आता जोड्यांमध्ये झालं होतं. एकमेकांवरचं आपापलं प्रेम सर्वजण आता उत्कटतेनं प्रकट करत होते. मुक्त प्रणयाची ही दृश्यं अपरिचित होती. पण त्यात कुठेही बीभत्सता नव्हती.

नदीतून छोटचा छोटचा नावा चालवणाऱ्या उत्साही, रगेल तरुण मंडळींच्या शर्यती चालू होत्या. अकरा वाजायला आले तरी काळचा-पांढऱ्या बदकांचा जलविहार काठा-काठानं चालू होता. नदीकाठची मऊ मुलायम हिरवळ, रंगीबेरंगी फुलझाडं, हिरवेगार उंच वृक्ष—जे जे दिसेल ते ते डोळे भरून पाहत होतो, साठवून ठेवत होतो.

अकरा वाजायला आले होते, अकरापर्यंत परतणं आवश्यक होतं. घाटाच्या पायऱ्या चढून झपाझप वरती आलो. घाईघाईनं रस्ता ओलांडून युगेंट्हाइम्‌च्या दारात पाऊल टाकलं तोच समोरच्या चर्चच्या मनोऱ्यावरच्या घड्याळात अकराचे टोले पडायला सुरवात झाली होती.

# न्युअॅर्नबेर्क् ट्रायल

फ्रांक्फुर्ट् आम माइन् (Frankfurt am Main) ते न्युअॅर्नबेर्क् (Nurnberg) हा विमानाचा प्रवास फक्त एका तासाचाच होता. नेहमीप्रमाणे मी खिडकीजवळची जागा पटकावली होती. विमानात बसताना नुसती खिडकी—कुठलीतरी खिडकी—पकडण्यात अर्थ नसतो. कारण ती खिडकी विमानाच्या पंखावरती असली म्हणजे मग संपलंच ! तसं झालं तर हलणाऱ्या पंखाशिवाय फारसं काहीच दिसत नाही. हवेत उडत असूनसुद्धा विहंगमावलोकन साधता येत नाही. माझ्या खिडकीतून मात्र व्यवस्थित दिसण्याची सोय होती.

ठरलेल्या वेळी विमानाची घरघर सुरू झाली. पट्टे आवळण्याची सूचना सांगितली गेली. एव्हाना आमचं विमान जमिनीवरून पळायला लागलं होतं, विमानाला धोका उत्पन्न झाल्यास काय काय करावं, धोक्याच्या वेळी बाहेर पडण्याचे दरवाजे कुठे कुठे आहेत, इत्यादी गोष्टी सांगितल्या जात होत्या, दाखवल्या जात होत्या. आता आमचं विमान आकाशात झेपावलं. आकाशात झेपावत असताना नवख्या प्रवाशाच्या पोटात कसंतरी होतं, गोळा येतो पण मी मात्र आज दुसरंच उड्डाण असूनही सराईताप्रमाणें खुर्ची सरळ ठेवून बसलो होतो. खिडकीच्या तावदानाला कपाळ नि नाक टेकवून लहान मुलाप्रमाणे बाहेर बघत होतो. " खिडकीची काच वरती सरकवून, मान बाहेर काढून खाली बघण्याची सोय

असती तर किती मज्जा आली असती !"

माइन् (Main) नदी आता मागे पडली होती, घरांचे पुंजके विरळ होत होत आता हिरव्यागार झाडीचं अतिविस्तृत जंगलात रूपांतर झालं होतं. ह्या पर्णविपुल दाट जंगलात मधूनच एखादा रेल्वेमार्ग दिसायचा. त्यावर चाललेली चारपाचच डब्यांची आगगाडी खेळण्यातल्या आगगाडीसारखीच तुरुतुरु चाललेली, पण आऊटोबान् (Autobahn) मात्र चांगले ठसठशीत दिसत होते; वरचेवर दिसत होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या भयानक संहारानंतर १९३३ ते १९४५ ह्या काळ्या युगाच्या, हिटलरशाहीच्या साऱ्या खाणाखुणाही पुसून टाकण्याचे, विसरण्याचे प्रयत्न अन्य जगतातच नव्हे तर खुद्द डॉइच्लान्ट (जर्मनी) मध्येही चालू असले तरी त्या हिटलरशाहीच्या काळात बांधलेले आऊटोबान् मात्र सुस्थितीत आहे, नव्हे त्यांच्यात दरवर्षी वाढ होत आहे. नी ती कल्पना साऱ्या जगानंच मान्य केलेली आहे. आऊटो म्हणजे रस्ता, मार्ग. आऊटोबान् म्हणजे केवळ मोटारींसाठी, वेगवान स्वयंचलित वाहनांसाठी असलेला खास मार्ग. 'भावी काळात आपल्या लष्करी हालचाली अत्यंत द्रुतगतीनं करता याव्यात म्हणजे युरोप पादाक्रांत करणं अवघड नाही, अशा कल्पनेतून आऊटोबान्च्या विस्ताराच्या कामाना आरंभ झाला. त्या काळात जर्मनीत विलक्षण बेकारी माजली होती. देशभर अशा आऊटोबान्चं जाळं निर्माण करण्याचं राक्षसी काम सुरू झालं नि बेकारीचा भस्मासूर बघता बघता खाक झाला. एका दगडात दोन पक्षी !

न्युअॅर्नबेर्क्ला जाणारा आऊटोबान् कितीतरी वेळ दिसत होता. आऊटोबान्, हिटलर, युद्ध, विनाश, त्यानंतरचे ते गाजलेले खटले न्युअॅर्नबेर्क्चे खटले – त्याच न्युअॅर्नबेर्क्ला मी चाललो होतो. त्यामुळे ह्या साऱ्या स्मृती जागृत झाल्या होत्या. एकाएकी उदास वाटायला लागलं. उगाचच. कितीतरी वर्षं लोटली त्याला !

विचारांच्या तंद्रीत मागे टेकून बसलो होतो. खुर्ची पुनः सरळ केली नी खाली बघायला लागलो. हिरव्या रंगाच्या अनेक छटांची जंगलं संपतच नव्हती. हिरवा रंग–खरंच वेगळा, मन प्रसन्न करणारा, टवटवीत, क्षणापूर्वीची अस्वस्थता उडून गेली. ही जर्मन माणसं विलक्षणच. एखाद्या गोष्टीच्या मागे लागली की त्याची पाठ सोडीत नाहीत. ही विस्तीर्ण जंगलं म्हणजे त्याचंच एक उदाहरण आहे ! गरजेपोटी झाडं तोडावीच लागतात. पण त्यासाठी वृक्षांची लागवड हवी. माळरानावरही बुद्धीच्या, प्रयत्नांच्या नि चिकाटीच्या साहाय्यानं अमाप जंगलसंपत्ती उत्पन्न करता येते हे जर्मनांनी फार पूर्वीच ओळखलं. झाडं तोडणं, जंगलं लावणं, जोपासणं ह्याचा पद्धतशीर अभ्यास करून त्यानी त्याचं एक शास्त्रच बनवून टाकलं. तेही अलिकडे नव्हे तर काही शतकांपूर्वी. आम्ही मात्र अलिकडे जंगलांच्या जागी माळरानं नि वाळवंट करण्याच्या उद्योगात झपाट्यानं प्रगती करत आहोत ! झाडं गुपचूप तोडणं, शास्त्रीय ज्ञानाचा दुरुपयोग करून झाडं मारणं ह्या नी असल्या कला

आपल्याकडे खूपच विकसित झाल्या आहेत ! नी त्याचबरोबर किंवा त्यामुळ दरवर्षी त्याच (त्याच) खड्डयात वृक्षारोपणाचा कार्यक्रमही रूढ झाला आहे !

खालची दिसणारी निसर्गशोभा बघण्यात मी दंग होतो. एवढ्यात हवाईसुंदरीच्या आवाजानं मी तंद्रीतून जागा झालो. तिच्यासमोरच्या ट्रॉलीत वरच्या बाजूला बरेचसे फळांच्या रसाचे डबे होते. खालच्या बाजूला वर्तमानपत्रांचे गठ्ठे. अननसाच्या रसाचा टीन माझ्या हातात देत ती मला म्हणाली,

" सॉरी ! आइ डऊन्ट हॅव अनि इंङ्लिश न्यूज पेपर ! फ्रांक्फुर्ट् ते न्युअॅर्नबेर्क् हे देशांतर्गत उड्डाण होतं नि संपूर्ण विमानात एकच काळा आदमी होता. तो म्हणजे मीच. त्यामुळे हवाईसुंदरीजवळ फक्त जर्मन वृत्तपत्रंच होती. मी झटकन म्हटलं,

" इश् कान् आबर डॉईच लेझन् !" ( पण मला जर्मन वाचता येतं ना ! ) माझ्या वाक्यानं तिला सुखद धक्का बसल्याचं तिच्या स्मितावरून स्पष्ट दिसत होतं.

माझ्या शेजारचे दोघं जर्मन पति-पत्नीही स्मित करत माझ्याकडं कौतुकानं बघत होते.

" ओह ! झी श्प्रेशन् डॉइच् !"(वा ऽ तुम्हाला जर्मन येतं तर ! ) गठ्ठ्यातलं एक वर्तमानपत्र बाहेर काढून घेत हवाईसुंदरी म्हणाली, " म्यॉश्टेन झीडीझऽत्साइटुङ् लेझेन् ? " (हे वर्तमानपत्र वाचणार का तुम्ही ?)

" फ्रांक्फुर्टर आल्गेमाइन् " हे जाडजूड वर्तमानपत्र मी हातात घेतलं. इकडची रोजची वर्तमानपत्रं ३०/४० पानांची असतात नि रविवारच्या आवृत्ती तर ७०/८० पानांच्या असतात !

दूरवरच्या जंगलात आता घरांचा पुंजका दिसायला लागला होता. बघता बघता आम्ही त्याच्या अगदी जवळ आलो, एवढ्यात घोषणा झाली.

" आपण आता न्युअॅर्नबेर्क्ला पोहोचलो असून थोड्याच वेळात विमानतळावर उतरत आहोत. सर्वांनी सरळ बसा, आपापले पट्टे आवळा, सिगरेट विझवा. " इत्यादी. पट्टे अडकवल्याचा खट्खट् आवाज येत होता. काही मिनिटातच आमचं विमान सुखरूपपणे उतरलं.

फ्रांक्फुर्ट्चा विमानतळ अजस्रच. तिथून न्युअॅर्नबेर्क्ला आल्यावर इथला विमानतळ अगदिच सुनासुना वाटत होता. विमानांची वर्दळ अशी नव्हतीच. फ्रांक्फुर्ट्च्या विमानतळावर विमान थांबलं की बोगद्यासारखा एक प्रशस्त मार्गच विमानाच्या दरवाज्याला येऊन चिकटतो. पायऱ्यांची चढउतार न करताच प्रवासी एकदम इमिग्रेशनच्या कौन्टरपाशी जाऊन पोहोचतो. पण इथे मात्र आमचं विमान थांबल्यावर थोड्याच मिनिटात पुढच्या, मागच्या दाराजवळ जिने लागले. प्रवासी मंडळी आपापल्या हातातल्या सामानासह उतरायला लागली. नंतरच्या दोनतीन महिन्यात मी १०–१२ उड्डाणांचा अनुभव घेतला. तासा दीड तासाच्या उड्डाणाच्या वेळी बऱ्याचदा आसनक्रमांक दिलेले नसतात. प्रवासी

जाताना जरा धावपळ करतात पण गोंधळ नसतो. उतरताना तर जर्मन मंडळी फार शिस्तीनं उतरतात. मधल्या गँगवेमध्ये कधीही गर्दी करत नाहीत. त्यामुळे ढकलाढकली, बॅगांचे धक्के, हाताच्या कोपराच्या धक्क्यानं बसलेल्या एखाद्या (बिचाऱ्या) प्रवाश्याची टोपी किंवा चष्मा खाली पाडणं, असले प्रकार कधी घडत नाहीत, कधी दिसले नाहीत. फ्रांक्फुर्टहून मुंबईला परत येताना लुफ्टहांजा (Lufthansa) च्या विमानात खूपसे भारतीय होते. प्रत्येकाला त्याचा आसन क्रमांक दिलेला होता. आसनांवर क्रमांक होते, तरीही विमान सुरू व्हायची वेळ झाली तरी निम्मे प्रवासी इकडून तिकडून चिंताग्रस्त होऊन फिरत होते. मुंबईत उतरताना झालेला गोंधळ तर एखाद्या एस्. टी. स्टँडवर शोभण्यासारखाच होता !

मंडळी शिस्तीनं उतरत होती. दरवाजाजवळ मघाचीच हवाईसुंदरी निरोप द्यायला उभी होती. मान किंचित वाकवून प्रत्येक प्रवाशाला सस्मित "आउफ् वीऊरझेएन !" (पुन्हा भेटूया !) असं म्हणत होती. रांगेतून मी आलो तेव्हा मलाही "आउफ वीउरझेएन" म्हणत तिनं हात पुढे केला. मी हस्तांदोलन करून आउफ वीउरझेएन म्हणून निरोप घेऊन जिना उतरू लागलो.

जिन्यापासून विमानतळावरची मुख्य इमारत दूर नव्हती. आमचं हे उड्डाण देशांतर्गत असल्यानं इमिग्रेशन, कस्टम ह्याचा तसा त्रास नव्हता. सारे प्रवासी आपापल्या सामानाचीच वाट पाहत होते. थोड्याच वेळात भिंतीलगत बसवलेला चक्राकार पट्टा फिरायला लागला आणि त्या सरकत्या पट्ट्यावरून बॅगा वगैरे सामान यायला लागलं. आपली बॅग आली की पट्ट्यावरून झटकन उचलून घेऊन ती अंगच्या चाकांवर उभी करायची आणि ढकलत किंवा ओढत घेऊन जायची. हमाल ही संस्था इथे संपुष्टात आली आहे. (नसतात असं मात्र नाही.) दोन-चार मिनिटातच माझी बॅग येताना दिसली. ती उचलून हिरव्या दरवाज्यातून बाहेर पडलो. आपल्या बॅगेलासुद्धा चाके असती तर किती बरं झालं असतं असं वाटलं. इथल्या जमिनीच नव्हे तर रस्तेसुद्धा इतके सपाट, गुळगुळीत असतात की मोठ्या बॅगासुद्धा अगदी सहजतेने इकडून तिकडे न्याव्यात.

हिरव्या दरवाज्यातून बाहेर पडून प्रथम माहितीकेंद्र गाठलं. समोरच होतं. तिथून गावाच मानचित्र मिळविलं. विमानतळावरून गावात जाणारी बस, यूथ हॉस्टेल इत्यादी चौकशा केल्या.

"फ्लूक्हाफेन् (विमानतळ) ते हाउप्ट्बान्होफ (मुख्य रेल्वेस्टेशन) पर्यंत जाणारी बस बाहेरच्या स्टॉपवर मिळेल. ती बरोबर सहा वाजता सुटेल. स्टेशनवर माहितीकेंद्र आहे तिथे तुम्ही यूथ हॉस्टेलची चौकशी करा." अशी माहिती कळली. विमानतळाच्या मुख्य इमारतीतून बाहेर आलो. जवळच हाल्टऽश्टेल (Haltestelle) स्टॉप अशी पाटी होती. तिथे जाऊन उभा राहिलो.

माझ्याबरोबर विमानातून आलेली मंडळी भराभर मोटारीतून जात होती. विमानतळासमोर शे-दोनशे मोटारी दिसत होत्या. मी तिथे पाच-सात मिनिटेच उभा होतो. पण तेवढ्या वेळात पन्नास-साठ मोटारी गावाच्या दिशेने भरधाव सुटलेल्या दिसल्या. टॅक्स्याही होत्या. पण मला बससाठी थांबणं भाग होतं. बस सहा वाजता होती. म्हणजे फक्त पाच मिनिटांचा अवधी होता आणि बसचा पत्ता नव्हता, असं मनात म्हणत होतो एवढ्यात एक प्रचंड धूड कसलाही धडधडाट, खडखडाट न करता माझ्यासमोर येऊन उभं राहिलं. तीच होती बस.

बसचा बंद दरवाजा आपोआप उघडला. स्टॉपवर मी एकटाच उभा होतो. दरवाजा उघडल्यामुळे आत मोठ्या आवाजात लावलेलं पॉप संगीत ऐकू येत होतं.

लांब केसाच्या ड्रायव्हरमहाशयांनी बसल्याबसल्याच सिगरेट पेटवली. कंडक्टरसारखा कोणी प्राणी दिसत नव्हता. दरवाज्यापाशी येऊन मी विचारलं, "हाउप्ट्बानहोफ्ला जाणारी बस हीच ना?"

"हो" माझ्याकडे न बघता तोंडात सिगारेट ठेवूनच ड्रायव्हरमहाशय उद्गारले,

"बस सहा वाजताच निघणार ना?"

"हो."

"बसचं तिकीट कुठे काढायचं?"

"इथे."

"किती?"

"तीन मार्क!"

मी बॅग घेऊन आत शिरलो. पाच मार्कची नोट ड्रायव्हरकडे दिली. त्यानं यंत्राचं एक बटण दाबलं. समोरच्या छोट्या ट्रेत दोन मार्कचं एक नाणं पडलं. मी दिलेल्यातले उरलेले दोन मार्क आणि तिकीट, घेऊन ड्रायव्हरच्याच मागच्या लाल मखमली गुबगुबीत प्रशस्त सीटवर जाऊन बसलो.

सहा वाजायला एक मिनिट अवकाश होता नि बसमध्ये मी एकटाच. मी अस्वस्थपणे इकडे तिकडे बघत होतो. कोणी येत आहे का म्हणून वळून वळून मागे बघत होतो. पण ड्रायव्हर निश्चित होता. माझ्या मनात शंका आली की ह्या स्वारीची बहुतेक निघण्याची तयारी नसावी. कारण विझत्या सिगरेटवरती त्यानं आता पुढची सिगरेट पेटवली होती. आता ही बस भरणार कधी नि निघणार कधी, अशी काळजी वाटायला लागली. मागे एकदा बीरगंजला आम्ही १०-१५ प्रवासी काठमांडूला जाणाऱ्या बसमध्ये जाऊन बसलो. पहाटे ५।। वाजता- "बस अभी चलेगी" असं म्हणून ड्रायव्हर क्लीनर बेपत्ता झाले. नंतर प्रवाशांच्या छोट्या छोट्या गटाला घेऊन आले. प्रत्येक वेळी "बस अब चलेगीही" म्हणत होते. प्रत्येकाचा नाइलाज होता. त्यामुळे चरफडत सर्वच प्रवासी बसून होते. अखे-

रीस बस जेव्हा खच्चून भरली, उभे रहाणारेही १०–१२ यात्री मिळाले तेव्हा कुठे आमची बस प्रत्यक्षात निघाली. त्या वेळी ११॥ वाजले होते ! मी इकडे तिकडे बघत होतो. पण ड्रायव्हरचं लक्ष फक्त घड्याळावर होतं. ठीक ६ वाजले नि त्याने एक कळ दाबली. फक्त फट् खट् असा आवाज झाला. दरवाजा लागला गेला नी ठीक ६ वाजता, ठरल्याप्रमाणे ठरलेल्या वेळी बस निघाली ! वक्तकी पाबंदी !

न्युअॅर्नबेर्क्‌ला पोहोचल्यापासूनच हवा ढगाळ होती. पण आता पाऊसच सुरू झाला होता. आमची बस (किंवा माझी बस म्हटलं तरी चालेल. कारण मी एकटाच प्रवासी होतो !) वाटेत कोणत्याही स्टॉपवर थांबली नाही. वाटेत कोणी उतरणारा नव्हताच. पण चढणाराही नव्हता. गावाच्या अगदी जवळ येईपर्यंत एखादा पादचारी दिसलासुद्धा नाही. बस विमानतळावरून निघाली ती थेट हाउप्ट्‌बान्‌होफ्‌समोर येऊन थांबली. मी बॅग घेऊन खाली उतरलो.

पाऊस चांगलाच होता, भिजण्याइतपत. म्हणून प्रथम हाउप्ट्‌बान्‌होफ्‌च्या आश्रयाला गेलो. निवाऱ्याला उभा राहून समोरचं ओलेतं दृश्य न्याहळत होतो.

प्रशस्त चौक, मध्यावर ट्रॅमचा स्टॉप. डाव्या बाजूला सुरेखशी तटबंदी, घाटदार बुरुज. पावसानं न्हाऊन निघाल्यामुळे तटबंदी फारच आकर्षक दिसत होती. तो बहुतेक जुन्या शहराचा भाग असावा. तटबंदीच्या बाजूला, पलिकडे जुन्या वळणाच्या बऱ्याच इमारती होत्या. पण जुनाटपणा कुठेच नव्हता. एक काळा तुकतुकीत सरळ रस्ता शहरात घुसत होता, त्याच्या वळणावर उतरत्या छपराची काळ्या दगडाची भव्य इमारत लक्ष खेचून घेत होती. तिच्या लालचुटूक कौलांवरून नजर हलत नव्हती.

हाउप्ट्‌बान्‌होफ्‌जवळ पादचाऱ्यांची वर्दळ खूपच होती. पाऊस असल्यामुळे बरीच मंडळी रेनकोट घालून चालली होती. पिवळ्या रंगाचे रेनकोट फारच लोकप्रिय असावेत, बहुतेकांच्या अंगावर पिवळे रेनकोटच होते. आपल्याकडे पायघोळ रेनकोट वापरण्याची पद्धत आहे, इकडे मात्र सर्वांचे रेनकोट गुडघ्यापर्यंतच होते.

विमानातून बघत असताना न्युअॅर्नबेर्क् साधंसुधं हिरवं वाटत होतं. पण जमिनीवर उतरून बघितलं तेव्हा ते खूपच रंगीबेरंगी दिसलं. इथल्या मोहक रंगामुळे नि आकर्षक रेषांमुळेच आल्ब्रेश्ट ड्यूरर प्रतिभावान चित्रकार बनला असावा !

खूप वेळ चाललेल्या पावसामुळे हवेत चांगलाच गारठा आला होता. शहराचं कौतुक करता करता स्वतःच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्याची निकड निर्माण झाली होती. न्युअॅर्नबेर्क्‌मधल्या वास्तव्यात मी "हान्स् ब्राऊन" ह्यांच्या घरी रहाणार होतो, पण मी ठरलेल्या दिवसाच्या एक दिवस अगोदर आलो होतो. त्यामुळे आज, "अन्यत्र" कुठेतरी सोय करून घ्यायला हवी होती. यूथ हॉस्टेलमध्ये जायचा विचार करत होतो. (यूथ हॉस्टेल–यूगेंटहेर्बेर्गड्ऽ ही संस्था मुळात जर्मनीतलीच. रिशार्ट शिर्मान् ह्या प्रेमळ, कल्पक

शिक्षकानं भटकणाऱ्यांना खात्रीशीर, विश्वासार्ह निवारा मिळावा म्हणून १९०९ मध्ये पहिलं यूथ हॉस्टेल सुरू केलं. आज जगभर त्याचा प्रसार झालेला आहे. आपल्याकडे "युवजन चारण संस्था" ह्या नावानं ही संस्था १९४९ मध्ये सुरू झाली. संस्थेची कोल्हापूर शाखा मे १९८१ मध्ये मीच सुरू केली.)

हाउप्ट्बान्होफ्च्या मुख्य इमारतीतच माहिती-केंद्र होतं. प्रथम तिथे गेलो. तिथल्या सार्वजनिक फोनवरून यूथ हॉस्टेलला फोन करायचा प्रयत्न केला, पण बराच वेळ फोनच लागेना तेव्हा कौन्टरपाशी गेलो. बऱ्याच वेळानं त्या सद्गृहस्थानं माझ्याकडे लक्ष दिलं! आपल्या हातातलं काम झाल्याशिवाय समोरच्या माणसाकडे पद्धतशीर दुर्लक्ष करण्याची जर्मन-पद्धत विलक्षणच आहे! आपण त्यांच्या समोरच उभे असतो, त्यांचं लक्ष वेधण्यासाठी काऊंटरवर बोटांनी किंवा पेनानं टकटक केली, शुक्शुक् असा आवाज केला तरी कौंटरपलिकडचा माणूस मूक-बधीर माणसाप्रमाणे मख्ख बसून असतो!

"गुटेन् आबेन्ट्!" मी म्हटलं.

"गुटेन् आबेन्ट्!" समोरचे उंचेपुरे पण अगदी किरकोळ अंगाचे गृहस्थ उत्तरले. माझा चेहरा न्याहाळून विचारलं, "व्हेअर डू यू कम् फ्रॉम्?"

"आउस् इंडिएन्– भारतातून" त्यांच्या इंग्लिश प्रश्नांना मी जर्मनमधून उत्तरं देत होतो! कामाशी काडिचाही संबंध नसलेल्या आमच्या इंग्लिश-जर्मन गप्पा चालू होत्या. शेवटी मीच म्हटलं की मला जर्मन येतंय नी ते तुम्हाला व्यवस्थित कळतंय. मग तुम्ही इंग्लिशमध्ये कशाला बोलता? जर्मनमध्ये बोला!" म्युअॅलर महाशयांनी लगेच आपला गिअर बदलला नी ते जर्मनमध्ये बोलू लागले–

"मी हल्ली इंग्लिश शिकतोय. म्हटलं की इंग्लिशचा सराव करावा, म्हणून इंग्लिशमध्ये बोलत होतो."

"–मीही जर्मनचा सराव करण्यासाठीच दुरून भारतातून आलोय!" मी हसलो. म्युअॅलरनं पण ओढून ताणून चेहऱ्यावर स्मित दर्शवलं, "मी तुमची निराशा केली ना?"

"कसचं कसचं! तुमच्यासारखा कोणी परदेशी भेटला तरच इंग्लिश बोलायला मिळतं. एरव्ही म्हणजे..."

"बरं, माझं काम..."

"बोला!"

"मला यूथ हॉस्टेलवर जायचंय-रात्री मुक्कामाला. पण तिथला फोनच लागत नाहीये. तुम्ही मला मदत करू शकाल का? तिकडे कसं जायचं तेवढं सांगा!"

"यूथ हॉस्टेल तर आज फुल्ल आहे!"

"मी जाऊन बघतो ना!"

"उगाच खेप पडेल, दोन किलोमीटर दूर आहे! पाऊस पडतोय! मी मघाशीच

फोन केला होता तिकडे. अजिबात जागा नाही तिथे." असं म्हणत त्यांनी हॉटेलांची एक जाडजूड यादी माझ्यासमोर टाकली. "घ्या ! हॉटेलातच रहा तुम्ही !" प्रेमळपणे आग्रह करत म्युअॅलर म्हणाले.

इकडची हॉटेलं महागडी असतात हे मला ठाऊक होतं. त्यापेक्षा पेन्सिओनमध्ये राहिल्यास बरं, तिथे ह्या हॉटेलच्या जेमतेम १/४ आकार पडतो, तोच मला परवडण्यासारखा होता. हे सर्व माहीत असल्यामुळे मी विचारलं.

"हॉटेल नको मला, जवळपास पेन्सिओन नाहीत का इथे ?" हॉटेलची यादी न बघताच त्यांच्याकडे सारत मी म्हटलं,

"हो ऽऽऽ आहेत की !" लांबलचक जांभई देत त्यांनी हाताशीच असलेली दुसरी यादी माझ्यासमोर टाकली.

पेन्सिओन म्हणजे काही कुटुंबातून एखादी खोली—बेड—त्यांच्या सोयीप्रमाणे रिकामी ठवलेली असते नि हॉटेलच्या मानानं खूपच कमी आकारात तिथे राहण्याची सोय होऊ शकते. पेइंगगेस्ट म्हणता येईल. बहुतेक पेन्सिओनचे दर सारखेच होते. वीस-पंचवीस मार्कच्या आसपास. तेव्हा मी म्हटलं,

"दर तर सारखेच आहेत, तेव्हा स्टेशनपासून सगळचात जवळ जे ठिकाण असेल तिथे सोय होते का ते पहा !"

"ओखे !" म्हणत म्युअॅलरनं माझ्यासमोरची यादी आपल्या पुढचात ठेवून फोनाफोनी सुरू केली. काही मिनिटातच माझ्यासाठी ब्राइटऽ गासऽ ह्या गल्लीतली एक खोली निश्चित केली. एका दिवसाला (नव्हे रात्रीला – हॉटेल संस्कृतीत रात्रींचे हिशेब असतात !) वीस मार्क द्यायचे होते, म्हणजे सुमारे शंभर रुपये. (बापरे !)

म्युअॅलर महाशयांच्या सेवेबद्दल त्यांना दोन मार्क देऊन (रीतसर) ब्राइटऽगासऽचा पत्ता घेऊन त्यांचा निरोप घेऊन मी निघालो.

(न्युअॅर्नबेर्कचं यूथ हॉस्टेल इथल्या ऐतिहासिक किल्ल्यावर आहे. दुसऱ्या दिवशी फिरत फिरत तिकडे गेलो होतो, तेव्हा सहज चौकशी केली की, "काय हो, काल हॉस्टेलमध्ये अजिबात जागा नव्हती ?" तेव्हा मोठचा आश्चर्यानं माझ्याकडे बघत तो म्हणाला, "कोण म्हणालं ? डॉर्मेटरीत चिक्कार जागा होती की ! आमच्याकडे २२० बेडची सोय आहे !" म्हणजे म्युअॅलर महाशयांनी काल मला चांगलंच बनवलं होतं ! माहिती-केंद्रावर चुकीची माहिती देण्याचे प्रकार युरोपातल्या देशातही घडतात हे माझ्या नंतरच्या भ्रमंतीत लक्षात आलं. फरक एवढाच की आपल्याकडे नेहमीच तसं घडतं तर तिकडे क्वचित !)

म्युअॅलरचा निरोप घेऊन हाउप्ट्बान्होफ्च्या बाहेर पडलो. रस्त्यावर वाहतूक बरीच होती. म्हणून भुयारी मार्गानं रस्ता ओलांडणं आवश्यक होतं. सरकत्या जिन्यावर उभं राहून विनाश्रम खाली आलो. जमिनीखालच्या ह्या प्रशस्त चौकात झगमगाट होता.

वर्दळ खूपच होती पण चिखल, घाण, कागदाचे कपटे, सिगरेटची थोटकं अजिबात कुठे दिसत नव्हती. गिटार नि व्हायोलिन वाजवीत उभी असलेली दोनचार माणसं दिसली. त्यांच्यासमोर त्यांनी उताण्या टोप्या ठेवलेल्या होत्या, त्यात काही नाणी दिसत होती. संगीत हा बहुतेक त्यांचा पोटापाण्याचा व्यवसाय असावा !

भुयारी चौकात दुतर्फा दुकानं होती, स्वच्छतागृहं होती आणि ह्या सगळ्या गडबडीतही तुफानी स्केटिंग करणारी बरीच मुलं होती. त्या मुलांच्यात मुलगा-मुलगी असा भेद मुळीच दिसत नव्हता. सरकत्या जिन्यावरून वर आलो तो थेट जुन्या गावाच्या तटापाशीच. तटाशेजारच्या छोट्याशा जागेत उंचच उंच उडणारं कारंजं – एकदम मध्ययुगात गेल्यासारखं वाटलं.

मला जायचं होतं ती गल्ली – गासऽ (Gasse म्हणज गल्ली ! – किती जवळचा शब्द आहे.) ब्राइटऽ गासऽ इथून फार दूर नव्हती. त्यापुढच्या चौकात घडीव दगडांचा आकर्षक रस्ता सुरू झाला. म्हणजे आता इथून पादचारी पथ सुरू झाला. आता ह्या रस्त्यावरून वाहनं येणार नव्हती, त्यामुळे मी अधिकच रमत-गमत चालू लागलो.

...शहरांच्या जुन्या भागातून लहान-लहान गल्ल्या, असंख्य बोळ असणारच. त्या भागातली घरं पाडून जुनं शहर नवं करण्याचे उरफाटे उद्योग आपल्याकडे चालतात. (त्यालाच टाउन प्लॅनिंग – नगररचना – म्हणतात आपल्याकडे !) अशा वेडगळपणामुळे शहराचा जुना, वैशिष्ठ्यपूर्ण भाग तर विनाकारण नष्ट होतोच, शिवाय वाढत्या शहराच्या गरजांइतके मोठे रस्ते त्या जुन्या भागात होऊच शकत नाहीत ! पिढ्यान्‌पिढ्या राहणाऱ्या नागरिकांची घरं पाडून त्यांना निर्वासित करायचं...नि कशासाठी ? तर रस्तारुंदीसाठी ! चार मोटारींची सोय व्हावी म्हणून ? हा अधिकार आपल्याला कोणी दिला ? रोमा, पारी, व्हेनेत्सिआ अशी अनेक जुनी शहरं बघितली, त्यांचं आधुनिकीकरण कसं केलं हे बघितलं. गल्लीबोळातली घरं पाडून आधुनिकीकरण होत नाही ! अशा जुन्या भागात आधुनिक वाहनांना बंदी करावी, बस ! (वाहनांना बंदी म्हणजे फेरीवाल्यांना मोकळं रान नव्हे !!!)...

पादचारी भागातल्या प्रशस्त रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना बाक ठेवलेले होते. काही ठिकाणी रस्त्याच्या मध्यातूनही बाकांची ओळ होती. सारे बाक सुस्थितीत होते. दुतर्फा झाडी. त्यातल्या मोठ्या वृक्षांना आकर्षक पार बांधलेले होते. मोठ्या पारांच्या भोवताली गोलाकार बाक किंवा खुर्च्या ठेवलेल्या होत्या. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना छानछान घरं नि प्रत्येक खिडकीत, सज्जात ठेवलेल्या अनंतरंगी फुलांनी बहरलेल्या कुंड्या. बऱ्याचदा आपल्याकडच्या उद्यानांमधूनही इतकं सुंदर दृश्य दिसत नाही. फेरीवाल्यांनी कुठेही आपलं दुकान थाटलेलं नसतं !

आसपासच्या इमारतींमधून बरीच उपाहारगृहं. तिथे गरम हॉटडॉगपासून मुलायम

आईस्क्रिमपर्यंत सर्व काही मिळतं.

...कोल्हापुरात संपूर्ण महाद्वार रस्ता, ताराबाई रस्त्याचा काही भाग नि जेलरस्ता, नि पुण्यात फुटका बुरूज ते शनिपार हा बाजीराव रस्त्याचा भाग नि लकडीपूल ते सिटी-पोस्ट हा लक्ष्मीपथाचा भाग पादचारी विभाग केला, वाहनांची वाहतूक बंद केली, फेरी-वाल्यांना हटवलं, रस्त्यावर सुरेख बाक मांडले, झाडं लावली, फुलझाडं लावली तर... कल्पना करून बघा ! कसं छान वाटेल...

हाउप्ट्बान्होफ्वरून जी भलीमोठी आकर्षक इमारत दिसत होती तिथपर्यंत मी येऊन पोहोचलो होतो. तिथल्या कोपऱ्यावर फळांचे छोटे-छोटे स्टॉल होते. पुष्परचनेप्रमाणे फळांच्या दुकानातूनही फळांच्या आकर्षक रचना करून ठेवलेल्या असतात. फळांच्या कप्प्या-वर केवळ किंमतच नव्हे तर नावागावाचाही उल्लेख असतो. "ग्रीसमधील जरदाळू" फारच छान, रसरशीत दिसत होते, तोंडाला पाणी सुटण्याइतके–घेतले, अप्रतिम होते !

भाज्या, फळं असल्या वस्तू घेण्याचा आपल्याकडचा खाक्या वेगळा. कोल्हापुरात अजु-नही आम्ही भेंडी घेताना प्रत्येक भेंडी मोडून पाहतो नि मगच तागडीत टाकतो ! पण इकडचं तंत्र अगदीच वेगळं ! गिऱ्हाइकानं भाज्यांना किंवा फळांना स्पर्शसुद्धा करायचा नसतो ! बहुतेक ठिकाणी माल अशा प्रकारे ठेवलेला असतो की गिऱ्हाइकाचा हातच तिथपर्यंत पोहोचणार नाही. एखाद्या नवख्या गिऱ्हाइकाकडून चूक होणार अशी शंका जरी आली तरी ती विक्रेती झटकन म्हणते, "बिटऽ निश्ट बऱ्यूरेन् ! हात नका लावू, हात नका लावू !"

पिवळे–सोनेरी जरदाळू खातखात मी बॅग एकदा उजव्या हातात, एकदा डाव्या हातात असं करत करत ब्राइटऽ गासऽ मध्ये येऊन पोहोचलो.

इथे प्रत्येक रस्त्याच्या दोन्ही बाजूंना रस्त्याच्या नावाची पाटी असते. (त्यावर कोणीही कसलीही जाहिरात वगैरे चिकटवलेली नसते ! तसं करणं हा इथे मोठा गुन्हा आहे.) रस्त्यावर केवळ नावाचीच पाटी असते असं नव्हे तर प्रत्येक इमारतीवर घरांक असतो. रस्त्याच्या एका बाजूला सम आकडे नि विरुद्ध बाजूला विषम आकडे.

पावसाची रिपरिप चालूच होती. काळ्या ढगांमुळे चांगलंच अंधारून आलं होतं. माझ्याजवळ रेनकोट नसल्यामुळे मी रस्त्याच्या कडेकडेनं, दुकानांच्या छपरांची छत्री धरून चाललो होतो मन रिझवायला दुकानांच्या मोठमोठ्या खिडक्या होत्या. दुकानं बंद असली तरी आतल्या झगमगाटात मालानं खच्चून भरलेली दुकानं बघत रहावं अशी होती. घरांक वाचत मी पुढे पुढे जात होतो. १३,१५,१७...मी नादात चाललो होतो, एवढ्यात....

"आप पाकिस्तानी हैं ?" मी चमकून समोर बघितलं. एक तरुण माझ्यासमोर उभा होता. कपाळावरचे पावसाचे थेंब बोटांनी निपटून टाकत तो माझ्याकडे बघत होता, त्याच्या उच्चारावरून, रूपावरून तो भारतीय उपखंडातलाच, उत्तरेकडचाच असला पाहिजे

हे लक्षात येत होतं. पण त्याच्या प्रश्नाचं उत्तर काय? मी कोण आहे? पाकिस्तान म्हणजे तरी काय? पंजाब, सिंध, बलुचिस्तान–आमचेच की ते! परका देश, संध्याकाळची वेळ, मी एकटा नि ते चौघं. आम्ही पाचजण भाषेच्या दृष्टीनं तर एकच होतो की! तरी पण त्याच्या प्रश्नाचं उत्तर काय? पण झट्‌कन सापडलं.

"मैं बम्बई से आया हूँ।" मी म्हटलं.

"तो आप हिन्दुस्थानी हैं।" त्यांच्यातला एकजण म्हणाला. पण ज्यानं मुळात प्रश्न विचारला होता तोच माझ्या मदतीला धावून आला.

"क्या फर्क है जो हिन्दुस्तान पाकिस्तान में! हम एक ही हैं!!!" असं म्हणत त्यानं माझ्याशी हस्तांदोलन केलं. त्याच्या वाक्यानं नि कृतीनं माझ्या मनावरचं दडपण एकदम दूर झालं. आपलीच माणसं फार वर्षांनी भेटल्याचा आनंद झाला!

"आप का शुभनाम?" मी विचारलं.

"अय्यूब!" त्यानं स्वतःचं नाव सांगितलं, इतरांचाही परिचय करून दिला.

"कहीं आप पंजाब के तो नहीं?" मी विचारलं.

"बिल्कुल! आप भी तो वही कहीं के लगते हैं..."

"जी!"

"...हम पंजाब के हैं– सियालकोटके और ये दोनो पिशावरके." मागच्या दोघांकडे बोट दाखवत अय्युब म्हणाला, "आप कभी आए थे लाहोर वगैराह?"

"नहीं! इन्शाल्ला कभी मौका मिले तो जरूर आऊँगा।"

"खैर, लगता है कि आप अभी अभी आए हैं यहाँ।" अय्यूबनं विचारलं.

"जी!"

"तो कहाँ जाएँगे? चलिए हमारे साथ!"

"शुक्रिया! मैं अब एक पेन्सिओन में जा रहा हूँ, और कलसे मुझे एक फॅमिली में रहना है..."

"कोई बात नहीं! अगर कोई दिक्कत हो तो हमसे कहना! हिचकिचाना नही!" असं म्हणत अय्यूबनं आपला फोननंबर, पत्ता माझ्याकडे दिला.

माझ्या हातातला जरदाळूचा पुडा मी त्या सर्वांसमोर धरला, सर्वांनी खळखळ न करता जरदाळू घेतले.

"यहाँ के खुबानी उतने अच्छे नहीं होते, जितने कि हमारे यहाँ के होते हैं।" एक पिशावरवाला म्हणाला.

"हमारे यहाँ की हर चीज अच्छी है जी!" अय्यूब.

"लेकिन अब तो हमें यहीं की रोटी खाणी एना जी!" दुसरा सियालकोटवाला.

"अच्छा भाईसाब, किसी भी चीज की कमी हो तो हमसे कहना!" अय्यूब म्हणाला.

आम्ही एकमेकांचा निरोप घेऊन विरुद्ध दिशेनं चालू लागलो.

न्यूअॅर्नबेर्क्मधल्या माझ्या नंतरच्या वास्तव्यात अय्यूब मला बरेचदा भेटला. माझं लक्ष नसलं तर जवळ येऊन खांद्यावर हात ठेवत असे. गेली दोन वर्षं तो इथे होता. न्यूअॅर्नबेर्क्-जवळच्या एर्लङिन् गावातल्या एका कारखान्यात तो नोकरीला होता. दिवसभर सपाटून काम करावं लागतं, अंगमेहनतीचं. चार-दोन वर्षांनी गाठीला काही लाख रुपये बांधून सियालकोटला परत जायचं अशा जिद्दीनं काम करत असतो बेटा!

एकदा हाउप्ट्बान्होफ् शेजारच्या मुख्य पोस्ट ऑफिसात गेलो होतो. पत्रावर लावण्या-साठी लागणारी तिकिटं यंत्रात पैसे टाकून मिळतात पण ती साधी असतात. विशेष रंगीत तिकिटं मात्र खास कौन्टरवर जाऊन रांगेत उभं राहूनच घ्यावी लागतात. मी रांगेत उभा होतो. तिकिटं घेऊन खिडकीपासून दूर झालो तेव्हा लक्षात आलं की अय्यूब माझी वाट पाहत समोरच उभा होता.

"नमस्ते अय्यूब भय्ये!"

"नमस्तेजी अविनाशजी! भाई, आप तो अच्छी जर्मन बोल लेते हैं..."

"जी!"

"अच्छा आप मेरा एक काम करोगे?"

"क्यों नहीं!" मी तत्क्षणी म्हटलं. प्रत्येक वेळी मोठ्या भावाच्या नात्यानं "मुझसे कहिए" म्हणणाऱ्या अय्यूबचं आज माझ्याकडे काय काम निघालं हे काही मला समजेना. "क्या करना है?"

"मुझे एक मनिऑर्डर भेजना है–जरा यह फारम भर दीजिए!" अय्यूबनं एक फॉर्म माझ्यासमोर धरला. मनिऑर्डरचे सारे सव्यापसव्य करून ते काम आम्ही हातावेगळे केले.

"यही एक कमी है हमारी भाईसाब! हमने आजतक जर्मन नही सीखी।" हे म्हणताना अय्यूबच्या चेहऱ्यावर थोडीशी निराशा दिसत होती. "सीखने का वैसे मोका ही नहीं मिलता–जरूरत भी नहीं होती..."

"अच्छा?"

"जी! फॅक्ट्री में तो मशिनसे काम होता है। शाम को तो हम सारे पंजाबी इकट्ठा घूम लेते हैं जी!..."

"हं हं!"

"शाम का खाना तो हम खुद बना लेते हैं, कमरेपर. जर्मन की जरूरत ही नही होती!" अय्यूब हसण्याचा प्रयत्न करत होता.

"अच्छा?" मी आश्चर्यानं अय्यूबकडे रोखून बघत म्हटलं.

"हां, वैसे सच कहना हो तो जर्मन आनीही चाहिए. यहाँ रहना हो तो!" अय्यूबला आपल्या चुकीचा पश्चात्ताप होत असावा.

अय्यूब नि त्याचे मित्र गेले. मागे वळून आम्ही पुन्हा एकमेकांकडे बघून हात उंचावले मी पुढे जात होतो. १९, २१! २१ घरांकाच्या दारापाशी थांबलो.

बेल दाबली. थोड्याच वेळात मला बेलचा पुन्हा आवाज ऐकू आला. मी पुन्हा बेल दाबली. "या या! कोम्ऽग्लाइश!" (होय, होय, आलेच) जिन्यावर पावलं वाजत होती. दार उघडलं. पन्नाशीची, उंच, सडसडीत, लहान केसाची, जाड चष्म्यातली, शर्ट-पँट घातलेली बाई समोर उभी होती. तिच्या बोलण्यावरून, आविर्भावावरून, तीच हाऊस्फ्रास–मालकीण – होती.

"गुटेन् आबेन्ट्, हेर बिनीवाल्ऽ!" म्हणून हसतमुखाने माझ्याशी हस्तांदोलन करून तिनं माझं स्वागत केलं.

"चला, वरची खोली तुमच्यासाठी तयार ठेवली आहे. छोटीच आहे. पण छान आहे. शांत आहे." बाई आपल्या घोगऱ्या आवाजात खोलीचं वर्णन मिठ्ठासपणानं करत होत्या.

एक मजला झाला, दुसरा झाला, तिसरा संपला...आता मात्र माझी बॅग मला भलतीच जड वाटत होती अखेरीस चौथा मजला आला. मोठा जिना आता संपला होता. नी आणखी वर जाण्यासाठी एक छोटीशी शिडी दिसत होती. छतालगतच्या खोलीत जाण्यासाठी. "अजून वर जायचंय?" मनातला सारा वैताग लपवून मी हसत हसत विचारलं.

"नाईन् हेर बिनीबाल्ऽ, झालंच, ही बघा तुमची खोली आलीच. तशी जरा उंचावर आहे पण म्हणूनच छान आहे!"

खोली छोटीच होती पण सोयींनी युक्त. पलंग, टेबलखुर्ची, आरामखुर्ची, बेसीन, गार गरम पाण्याची सोय. सामान ठेवून बूट काढले नि चक्क आडवा झालो.

गारठा चांगलाच होता. चहाची तलफ आली पण सोय म्हणून कॉफीवर समाधान मानायचं ठरवलं. गरम पाणी होतंच जवळ, कॉफीसाखरेच्या पुड्या होत्या. बिन दुधाची कॉफी झटकन तयार झाली. प्यायल्यावर बरं वाटलं. पण आता थंडी जास्तच वाटायला लागली. प्रथम खिडकी बंद केली. स्वेटर घातला. असं बसून भागणार नव्हतं. पोटपूजा करणं आवश्यक होतं पुन: बूट चढवले नी निघालो खाली उतरायला.

"जाऊन येतो जरा." मालकीणबाईना सांगितलं. बिअरचे घुटके घेत दूरदर्शनचे कार्यक्रम बघण्यात त्या दंग होत्या. त्यांचे यजमान शेजारच्याच छोट्याशा स्वयंपाकघरात रात्रीच्या जेवणाची तयारी करत होते. उकळत असलेल्या सूपचा मस्त वास घरभर दरवळला होता. मी जिना उतरायला लागलो तेव्हा त्यांनी हाक मारली नी म्हणाल्या,

"बेल एकदाच वाजवा. मग तुम्हाला बेल ऐकू येईल तेव्हा दरवाजा ढकला, दार उघडलेलं असेल." आता माझ्या लक्षात आलं की मघाशी बेल कुठली वाजली होती ते– बाहेरच्या माणसानं बेल दाबली नी जर दरवाजा उघडायचा असेल तर घरातूनच एक बेल दाबली जाते. बाहेरच्या माणसाला ती ऐकू येते आणि त्याच वेळी दरवाजाचं कुलूप निघालेलं असतं–अशी व्यवस्था युरोपात सर्वत्रच आढळते. बेल वाजवल्यावर दार उघडण्यासाठी दरवाज्यापर्यंत जाण्याची गरजच नसते.

पोटपूजा आटपून परतलो. रोख पैसे देऊन मालकिणबाईंकडून बिअरची बाटली घेतली. थोडा वेळ त्यांच्याशी गप्पा मारल्या. बाई भयंकर बडबडी नि गडबडी. मी, माझा नवरा, माझं पेन्सिओन हेच त्यांचे प्रिय विषय. मी सहजतेनं–भारतीय पद्धतीनं त्यांना विचारलं,

"तुम्हाला मुलंबाळं?"

"आहेत की ! आता ती मोठी झाली आहेत. असतात आपापल्या घरी...अहो, सूप झालं की नाही अजून ?" माझ्याकडे नि माझ्या प्रश्नाकडे पद्धतशीर दुर्लक्ष करून बाईंनी आता यजमानांचा समाचार घ्यायला सुरुवात केली होती तर !

दूरदर्शनवरचे समाचारही आता संपले होते. बाईंना आणि त्यांच्या (बिचाऱ्या) यजमानांना "गूटऽनाश्ट ! शुभ रजनी" म्हणून आणखी तीन जिने चढून माझ्या खोलीत गेलो.

दमलो होतो, आता उद्या पहाटेपर्यंत खाली जायचं नाही असा निश्चय करून बिअरची बाटली उघडली.

पाऊस थांबलेला होता. नऊ वाजून गेले होते. चांदण्या दिसतात का हे बघण्यासाठी खिडकी उघडली. निळ्याभोर आकाशात अजून थोडेफार ढग होते, पण चांदण्या दिसण्याइतपत अंधार अजून दाटला नव्हता.

□

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७०६

# घरोबा

ब्रा इटऽ गासऽ मधल्या पेन्सिओनचा निरोप घेण्याची तशी घाई नव्हती पण सामान आवरून मालकीणबाईंच्या खोलीत आणून ठेवलं नि खोली रिकामी केली. " सामान संध्याकाळी घेऊन जाईन." असं सांगून बाहेर पडलो.

भारत सोडल्यापासून समाधान देणारा चहा मिळालाच नव्हता, त्यामुळे चहाचे प्रयोग करण्यापेक्षा तात्पुरता सोडलेलाच बरा असा विचार केला.

खांद्याला भगवी राजस्थानी शबनम अडकवून निघालो होतो. कोपऱ्यावरच्या उपहार-गृहात जाऊन ग्लासभर गरम दूध प्यायलं. मला चहाची इतकी सवय होती की, असं वाटत होतं की, चहाशिवाय आपला दिवसच सुरू व्हायचा नाही, पण आपलं शरीर खरं म्हणजे इतकं लवचिक असतं की, वाट्टेल त्या परिस्थितीशी ते तात्काळ जुळवून घेतं ! आपणच उगाच त्याचे चोचले करत असतो.

पावसाची रिपरिप पुन्हा सुरू झाली होती. गावाच्या मुख्य भागातून फेरफटका मारला. कार्लश्टाट, काऊफ्होफ्, हेर्टी ही मोठमोठी दुकानं इथेही होतीच. तरीही न्यूअॅर्नबेर्कचं वेगळे-पण जाणवत होतं गावाच्या मध्यातून वाहणारी पेगनिट्ल्स् नदी, (Pegnitz) नदी कसली खरं म्हणजे ओढाच तो, पण तिचा इतका कलापूर्ण उपयोग करून घेतला आहे की, त्याचं कौतुक करावं तेवढं थोडंच. नदीवर बांधलेल्या इमारती तर अत्यंत आकर्षक. इमारतींच्या

खाली बांधल्या आहेत कमानी, त्या कमानीतून नदी वाहत असते नि वरती घर ! अक्षरशः नदीवर ! नदीत अधेमधे जी छोटीशी बेटं आहेत त्यावर निवांतपणे बसता येण्यासाठी बाक ठेवलेले, त्या वातावरणाला साजेसे. मातकट रंगाच्या नदीत काळ्या-पांढऱ्या बदकांचे थवे विहार करत होते. खिळवून ठेवणारं दृश्य होतं !

मार्कट्प्लाट्त्सचा प्रशस्त चौक म्हणजे मंडई. भाज्या, फळं, फुलं ह्यांची रेलचेल होती. जगभरची फळं नि युरोपभरची फुलं जर्मनीतल्या एखाद्या लहानशा गावातही सहज मिळतात. एखादी वस्तू घेताना कोणत्याही कारणानं का असेना, पण देशी की परदेशी असा विचार करण्याची सवय आपल्याला असते, पण इथल्या लोकांना असला विचार कधी शिवतही नाही. एका स्टॉलवर छोट्या छोट्या कुंड्यांतून कॅक्टस्चे अनेक प्रकार उपलब्ध होते. किंमतही कमी. जर्मनांच्या दृष्टीनं एक मार्क म्हणजे काहीच नाही.

भाज्यांच्या एका स्टॉलवर भोपळी मिरच्यासारख्या, पण पिवळ्या लाल रंगाच्या मिरच्या दिसत होत्या. मेणाच्या असाव्यात असं वाटण्याइतपत तुकतुकीत. आपल्याकडच्या हिरव्या मिरच्या नंतर लाल होतात पण सामान्यतः आपण लाल झालेली भोपळी मिरची खात नाही. उत्सुकतेमुळे मी चौकशी केली.

" ह्या सगळ्या मिरच्या एकाच प्रकारच्या ?"

" नाही. वेगवेगळ्या प्रकारच्या पण मिरच्याच !"

"–आणि असल्या हिरव्या, पण असतात ना ?"

" हो असतात ... ह्या लाल आहेत. त्या कच्च्या असतात तेव्हा हिरव्या असतात." विक्रेती म्हणाली.

" तसल्या आहेत ?"

" नाही ! हिरव्या कच्च्या असतात. त्या नाही खात. ह्या घ्या ना ! छान आहेत. स्पेनमधल्या आहेत." विक्रेती म्हणाली.

मिरच्यांचा भाव सफरचंदापेक्षा अधिक होता ! पिवळ्या, नवख्या रंगाच्या दोन घेतल्या. एरवी त्याज्य मानल्या असत्या त्या तांबड्याही दोन घेतल्या. घ्याव्या की नाही, अशी शंका आली पण विचार केला की, इथली सारी माणसं ह्या खातात तेव्हा आपल्याला खायला, निदान खाऊन बघायला मुळीच हरकत नाही. त्याही घेतल्या आणि काय गंमत. अत्यंत चवदार होत्या. गोड, साखरेसारख्या गोड होत्या ! पुढे अनेकदा मी तांबड्या पिकलेल्या मिरच्या घेतल्या. नेहेमीच त्या गोड असायच्या. आपण त्या पिकून गोड होईपर्यंत का थांबत नाही ?

भाज्यांबाबत, फळांबाबत बऱ्याचदा आपले रुढ (गैर)समजही महत्त्वाचे ठरतात ! पिकलेल्या भोपळी मिरच्या, पिकलेली तोंडली, कारली आपण खात नाही, पण आश्चर्य म्हणजे युरोपातल्या बाजारात ह्या भाज्या पिकल्यानंतरच विकतात !

मंडईत गर्दी चिक्कार होती, पण गोंधळ, गोंगाट, अव्यवस्था, घाण कुठेही नव्हती. आशियायी मंडळी साफसफाईचं काम चोख बजावीत होती ! मग ह्या आशियायी लोकांचे स्वतःचे देश अस्वच्छ का ? हा विचार फारच अस्वस्थ करणारा होता.

गल्ल्या, बोळ, वेडेवाकडे रस्ते हे प्रकार युरोपात सर्वत्रच आहेत. जुन्या गावांमधून ही गोष्ट अगदी स्वाभाविकच आहे, पण ते पाडून नाहीसे करण्याची गरज नसते. गल्ल्या, बोळांमुळे सौंदर्यात बाधा येत नाही. अडचणही होत नाही. उलट त्यामुळे शहराचं वेगळेपण रहातं. गावाचं मानचित्र सहज उपलब्ध होतं. त्याच आधारानं नवखा माणूसही जुन्या शहरातून सहजतेनं हिंडू फिरू शकतो.

न्युअॅर्नबेर्क्च्या किल्ल्यापासून मी आता दूर नव्हतो, पण मला अधिक आकर्षण होतं ते आलब्रेश्ट् डचुरर् ह्याच्या घराचं. आलब्रेश्ट् डचुरर् हा न्युअॅर्नबेर्क्चा एक महान सुपुत्र, अत्यंत प्रभावी चित्रकार (इ. स. १४७१–१५२८ लिओनार्दोदाविंचीचा समकालीन) ज्या घरात त्याचा जन्म झाला, तो राहिला, ते घर किल्ल्याजवळच आहे. न्युअॅर्नबेर्क्ला मी पहिल्यांदाच आलो होतो, पण मानचित्रावरून कुठे काय आहे ते मला स्पष्ट कळत होतं.

न्युअॅर्नबेर्क्मधे अभ्यासक्रमाच्या काळात मी हान्स् ब्राऊन ह्यांच्या घरी राहणार होतो. तेव्हा आता प्रथम त्यांच्या घरी फोन करून बघावा असं ठरवलं.

मार्कट्प्लाटत्स्जवळच्या सार्वजनिक टेलिफोन बूथवर गेलो. जर्मनीतले फोन अत्यंत आधुनिक. कोणत्याही सार्वजनिक फोनवरून परदेशातही सहज फोन करता येतो. स्थानिक फोनसाठी वेळेचे बंधन नाही. इंग्लंडात स्थानिक फोन अतिशय महाग. पौंड दोन पौंडाची नाणी केव्हा यंत्रात जाऊन बसतात कळत नाही ! खिसा अक्षरशः हलका होतो, पण जर्मनीत फक्त २० प्फेनिशमध्येही गप्पा मारता येतात ! अनेक ठिकाणी आता डायल ऐवजी बटणं आली आहेत. त्यामुळे सरावलेल्या हातांना नंबर झटकन् दाबता येतो. स्वीडनमधल्या डायल मात्र चांगल्या घोटाळ्याच्या वाटतात. आपल्याकडे जिथे एकाचा आकडा असतो तिथे त्यांचं शून्य असतं आणि शेवटी नऊ ! जर्मनीतली दूरध्वनी व्यवस्था चोख नी आधुनिक तांत्रिक अडचणींमुळे फोन न लागणं, मध्येच बंद होणं, दुसऱ्याच कोणाचा तरी आवाज ऐकू येणं असले प्रकार कधीही अनुभवावे लागले नाहीत.

युरोपातल्या टपालखात्याचं आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे पोस्टात गेल्यावर त्या देशातल्या सर्व गावांच्या डिरेक्टऱ्या तिथे सुस्थितीत उपलब्ध असतात. चौकशीच्या नंबरावर फोन केल्यास युरोपातल्या कोणत्याही राष्ट्रातल्या एखाद्या व्यक्तीचा नंबर मिळू शकतो. आपल्याकडच्या पोस्टात सांगलीची डिरेक्टरीसुद्धा सहजपणे मिळू शकत नाही ! आमचा देश मोठा खरा पण शेजारच्या गावातला फोन नंबरही आम्हाला सहजपणे मिळत नाही !

रिसीव्हर उचलला, यंत्रात पैसे टाकले. दहा–दहा प्फेनिशची दोन पितळी नाणी नी ती ताबडतोब बाहेर पडली नी समोरच्या पाटीवर लाल रंगातली अक्षरं दिसू लागली,

Bitte Zahlen ! बिटऽ त्सालेन् ! पैसे टाका ! आपल्याकडच्या यंत्रात आपण हॅलो असा आवाज पलिकडून ऐकल्यानंतर पैसे टाकतो, इथे मात्र अगोदर पैसे टाकून मग नंबर फिरवायचा असतो–मी पुन: पैसे टाकले नि ते पुन: बाहेर पडले ! मग एकदम लक्षात आलं–कुठे तरी वाचलं होतं की हल्ली इथल्या इलेक्ट्रॉनिक यंत्रात जुनी झिजलेली नाणी टाकली तर ती चालत नाहीत, नाण्यांच्या वजनातला काही मिलिग्रॅमचा फरकही खपत नाही ह्या यंत्रांना ! मग जवळची दोन कोरी करकरीत नाणी काढून यंत्रात टाकली नि ती चपखल बसली–फोन लागला ! (इथल्या बँकांमधून नेहमी कोऱ्या नोटा नि कोरी नाणीच मिळतात, डिपार्टमेंटल स्टोअरच्या यंत्रातून गिऱ्हाईकांना मिळणारी नाणी नेहमी कोरी करकरीतच असतात–)–पलिकडून आवाज आला–

"गूटेन् टाक् ! मी फ्राऊ ब्राऊन बोलात्येय् !"

"गूटेन् टाक् ! मी अविनाश बिनीवाले बोलतोय..." मी माझी ओळख सांगितली.

"या या हेर बिनीवालऽ–आमच्याकडे रहायला येणार आहात तेच ना ?"

"हो, तोच मी ! कालच आलोय इथे !"

"मग घरी या ना !–लौकरच या, कारण दुपारी मी बाहेर जाणार आहे."

"ठीक आहे, तासाभरात येतो !" मी म्हटलं. गावातून त्यांच्या घरी कसं जायचं हे ब्राऊनबाईंनी मला समजावून सांगितलं. मी फोन खाली ठेवून बूथमधून बाहेर आलो.

ब्राइटऽ गासऽमध्ये जाऊन बॅग घेतली. प्रथम ऊबाननं म्हणजे भुयारी रेल्वेनं आणि नंतर ट्रामनं जाऊन मी पेटेर्सकिर्शऽपाशी उतरलो. हार्स डर्फॉर्फरर रस्त्यावरचं ब्राऊन यांचं घर शोधून काढायला मुळीच त्रास झाला नाही. बाहेर घरांक पाहून मी बेल दाबली. काही सेकंदातच ब्राऊनबाईंनी स्वत: बाहेर येऊन दार उघडलं, हस्तांदोलन करत माझं स्वागत करून मला घरात घेऊन गेल्या.

"विलकोमेन् हेर बिनीवालऽ–चला आपल्या घरात जाऊ या !"

चारच पायऱ्या चढून आम्ही घरात शिरलो. उंबरठ्यापासून घरभर गालिचे अंथरलेले होते. मी कौतुकानं बघत होतो. घरात शिरल्या शिरल्याच मोठा पॅसेज. डाव्या बाजूला स्नानगृह. पुढे डाव्या बाजूलाच स्वयंपाकघर. त्याच्या समोर पाहुण्यांची खोली–म्हणजे आता माझी !

"या ! ही तुमची खोली !" ब्राऊनबाई म्हणाल्या.

आम्ही आत गेलो. मी माझी बॅग, शबनम वगैरे सामानसुमान कोपऱ्यात ठेवलं.

"खोली तशी फार मोठी नाही पण तुम्हाला आवडेल !" बाई म्हणाल्या. साधारणत: ३ × ५ मीटर आकाराची. स्वच्छ, भरपूर प्रकाश होता. दारापाशीच मोठं लाकडी कपाट, समोरच्या बाजूला एका कोपऱ्यात टेबल, खुर्ची, आरामखुर्ची नी एका कोपऱ्यात पलंग, त्यावर चांगली फूटभर उंचीची गादी नि तसंच गुबगुबीत पांघरूण–घडी करून

ठवलेलं, आणि मोठी उशी.

" सध्या थंडी आहे का ?" त्या जाडजूड पांघरूणाकडे पाहत मी विचारलं.

" छे छे ! " हसत हसत बाई म्हणाल्या, " ते पांघरूण पिसांचं आहे म्हणून खूप जाड दिसतंय. त्याला उब छान आहे. पण जड मात्र नाही हं ! "

" हा गालीचा छान आहे ! " खोलीभर पसरलेल्या आकाशी–निळ्या रंगाच्या गालीच्या-कडे बघत मी म्हटलं.

" हो, पण तसा साधाच आहे, खरं म्हणजे आम्हाला इराणी गालीचाच घ्यायचा होता, पण त्यावेळी जमलंच नाही." मध्यमवर्गीय जर्मनांना इराणी गालिचे परवडत नाहीत तर ! बिचाऱ्यांना साध्या–सिंथेटिक गालिच्यांवर समाधान मानावं लागतं !–मला हसूच आलं, गंमत वाटली.

पॅसेजच्या दुसऱ्या बाजूला कोपऱ्यात फोन होता नि पलिकडे प्रशस्त दिवाणखाना, दिवाणखान्याच्या एका भिंतीला भल्या मोठ्या लाकडी कपाटानं मागे घातलं होतं. त्यातल्या एका कप्प्याला काचेचं दार होतं नि त्यात विविध रंगांच्या द्रव्यांच्या वेगवेगळ्या आकर्षक आकाराच्या बाटल्या दिसत होत्या–हान्ससाहेबांचा मिनिबार होता तो !

समोरच्या कोपऱ्यात भला मोठा टी. व्ही. त्यावरची Siemens झीमेन्स् ही ठसठशीत अक्षरं मी मोठ्यानं वाचली–झीमेन्स !

" हो, हे झीमेन्समध्येच आहेत ! " ब्राऊनबाई म्हणाल्या.

दिवाणखान्याची एक भिंत काचेचीच होती. छतापासून जमिनीपर्यंत पूर्ण काचेची दारं होती. त्याच्या पलिकडे ऐसपैस सज्जा.

दिवाणखान्याच्या भिंतीलगत मऊ–लेदरचे रेक्झिनचे सोफा. मध्यभागी लंबवर्तुळाकार मोठं टेबल. नवनवीन अनेक कृत्रिम प्रकार येत असले तरी शुद्ध लाकडी टेबल नि त्यावर नितळ पारदर्शक पांढरी काच, ह्यालाच इथे प्रतिष्ठा आहे. दिवाणखान्याची जमीन किर-मजी रंगाच्या गालिच्यानं सुशोभित झालेली होती.

दिवाणखान्याच्या पलिकडचं दार बाईंनी उघडलं. आत प्रशस्त खोली होती–दोन मोठे बेड, त्यांच्या उशाशी छोटी छोटी टेबलं, ऐसपैस आरामखुर्च्या, भिंतीलगत दोन मोठी कपाटं–लाकडीच.

" हा इथला गालिचा मात्र इराणी दिसतोय हं ! " बेडरूममधल्या विशिष्ट लाल रंगाच्या चित्रमय गालिच्याकडे बघत मी म्हटलं.

" अरे वा ! तुम्ही बरोबर ओळखलंत की ! इराणीच आहे तो ! " ब्राउनबाई म्हणाल्या.

" भारतातले कश्मिरी गालिचेपण छान असतात–लोकरीचे नि रेशमी." मी म्हटलं.

" कश्मिरी ?"

" कश्मीर भारतातलं एक राज्य आहे–हिमालयाच्या परिसरात..."

"असं...असं–हिमालयात !" कश्मीर हा शब्द बाईंनी बहुतेक पहिल्यांदाच ऐकलेला असावा असं त्यांच्या बोलण्यावरून वाटत होतं. मी चार वाक्यं बोललो तरी त्यांनी फारसं औत्सुक्य दाखवलं नाही–कदाचित त्यांना बाहेर जायची घाई असावी. कोण जाणे नक्की काय ते–पण नंतरच्या काळात मी अनेक ठिकाणी अनेक व्यक्तींचा अनुभव घेतल्यावर तीव्रतेनं जाणवलं की सर्वसामान्य जर्मन माणसं फारसं औत्सुक्य दाखवत नाहीत–आमच्याकडे सर्व काही आहे, आम्हाला आणखी काही जाणून घेण्याची आवश्यकताच नाही, अशा तऱ्हेची वृत्ती जाणवते. (फ्रान्समध्ये मात्र वेगळा अनुभव आला.)

"इथे जवळच आमची बाग आहे..."

"अच्छा !" मी उत्साहानं ऐकू लागलो.

"आज दुपारी आम्ही तिकडे जाणार आहोत–"

"आणखी कोण येणार आहे ?" आता ह्यांची स्वतःची बाग कशी आहे ते बघायला मिळणार ह्याचा आनंद झाला मला–उगाचच !

"आणखी कोणी नाही, आम्ही दोघंच."

"अच्छा !" माझा उत्साह निमिषार्धात मावळला.

"आम्ही संध्याकाळी परत येऊ."

"ठीक आहे"

"ही तुमची किल्ली !" एक मोठी किल्ली माझ्या हातात देत बाई म्हणाल्या.

"माझी ?" न समजून मी विचारलं.

"हो. आता ही तुमच्याजवळ ठेवा. ह्या किल्लीनं बाहेरचा दरवाजा उघडतो आणि आपल्या फ्लॅटचा दरवाजाही."

"दोन्ही दरवाजे एकाच किल्लीनं उघडतात ?" मी आश्चर्यानं विचारलं.

"हो ! किल्ली तुमच्याजवळ असली म्हणजे बरं ! तुम्हाला केव्हाही कुठेही जाता येईल, येता येईल. प्रत्येक वेळी बेल दाबण्याची गरज नाही. नाही का अगदी घरच्यासारखं ?"

"हो ना !" मी संमती दर्शवली. किल्ली हातात घेताना–ताब्यात घेताना मला फारच अवघड वाटलं. किल्ली सांभाळणं हा प्रकारच मला फार त्रासदायक वाटतो–माझ्या घराच्या किल्ल्याही मी कधी जवळ ठेवत नाही–पण आता इलाजच नव्हता ! घेतली ! (आणि न हरवता संभाळली !)

"चला, स्वयंपाकघर दाखवते तुम्हाला !" आम्ही स्वयंपाकघरात गेलो. एव्हाना मी फ्राऊ ब्राउनना ओमा–आजो म्हणायला लागलो होतो. "हे घर तुमचंच आहे. अगदी घरच्यासारखे राहा इथे !" ओमाच्या ह्या वाक्यानं मला खूप बरं वाटलं.

"हा पहा, इथे केक असतो." डीप फ्रीझवरचा मोठा, गोल डबा उघडून दाखवत ओमा म्हणाली, "पाव ह्या डब्यात असतात." दुसरा एक मोठा डबा दाखवून ओमानं

फ्रीज उघडला, " ह्यात चीज दूध, फळांचे रस–बरंच काय काय आहे." ओमानं फ्रीजचा दरवाजा बंद केला, " तुम्हाला भूक लागेल तेव्हा इथे येऊन काय हवं ते घ्या ! खा ! घर तुमचंच आहे !"

मी संकोचानं गप्पच्च होतो.

" हे इथे नळ आहेत, डावीकडचा गरम पाण्याचा, नी उजवीकडचा गार पाण्याचा..."

" हे पाणी चांगलं आहे ?" मी पाण्यावरच्या प्रेमानं विचारलं.

" हो, का ?" ओमा कुतूहलानं माझ्याकडे बघत होती.

" नाही, म्हणजे प्यायला चालतं ?"

" प्यायला ?" पाणी पिण्याची कल्पनाही ओमाला कशीचीच वाटल्याचं दिसत होतं तिच्या चेहऱ्यावरून–" आम्ही पीत नाही पण प्यायला हरकत नाही !" ओमानं पाण्याची तारिफ केली– " तसं चांगलंच आहे !"

" वाऽ ! " मी जवळचाच एक ग्लास घेऊन गार पाण्याचा नळ सोडला. प्रचंड वेगानं धार पडत होती. ग्लासात असंख्य बुडबुडे येऊन पाणी दुधाळ रंगाचं असल्यासारखं वाटत होतं. ग्लास भरला. बुडबुडे हळूहळू कमी होऊन पाणी पारदर्शक होत होतं. मी गटागटा पाणी पिऊ लागलो. " जलानन्द " झाल्याप्रमाणे पाणी पीत होतो– गेले दोन दिवस बिअर, चहा, कॉफी, ज्यूस काय काय तरी प्यायलं, पण पाणी मिळालं नव्हतं ! – तृप्ततेनं रिकामा ग्लास खाली ठेवला तेव्हा ओमा माझ्याकडे विचित्र नजरेनं बघत होती ! – मी ग्लास धुऊ लागलो.

" राहू दे राहू दे !" ओमा तत्परतेनं म्हणाली,

" धुतो ना ! मी घरचाच आहे की नाही !"

ओमाला निरुत्तर करून मी ग्लास धुवून जागेवर ठेवला.

पटकन माझ्या खोलीत जाऊन चहाचा पुडा काढून आणला नि ओमाच्या हातावर ठेवला.

" ओह ! चहा !" पुड्याचा वास घेत ओमा आनंदानं म्हणाली– नि पुडा टेबलावर ठेवून दिला ! मला खरं म्हणजे चहाची तलफ आली होती म्हणून मी एवढ्या तत्परतेनं चहाचा पुडा आणून दिला, पण मला हवा असलेला परिणाम साधता आला नव्हता !

" आता तुम्ही जरा विश्रांती घ्या, दमला असाल !" असं मला सांगून ओमा तिच्या तयारिला गेली.

चहाची आठवण काढत मी थोडंफार सामान बॅगेतून काढून लावून ठेवलं. खोलीत एकट्यानं बसून राहणं म्हणजे वैताग– मी दिवाणखान्यात येऊन बसलो.

दूरदर्शनवरच्या तीनही चॅनलच्या दिवसभराच्या कार्यक्रमांची सविस्तर माहिती देणारं सचित्र साप्ताहिक टेबलावर होतं–आजचे कार्यक्रम काय आहेत ते पाहावं म्हणून ते हातात

घेतलं. "इर्गेन्ट्वो इन् बेर्लीन्" (असंच कुठेतरी–बेर्लीनमध्ये) हा चित्रपट थोड्याच वेळात सुरू होणार होता. मी टी. व्ही. सुरू केला.

"बरं, मी जाऊन येते," दिवाणखान्यात येत ओमा म्हणाली, "संध्याकाळी आठपर्यंत परत येऊ आम्ही."

"ठीक आहे !"

"किल्ली तुमच्याजवळ आहेच आणि हो, संध्याकाळी तुम्ही आमच्याबरोबर इथेच जेवायचं, बरं का ! आउफ् वीडर झेएन् !" दरवाजा लागल्याचा आवाज झाला–ओमा गेली.

"घरच्यासारखे रहा ! घर तुमचंच आहे !" असे उद्‌गार ओमा नि ओपा वरचेवर काढत असत पण त्यांच्या बागेत मात्र ते मला एकदाही घेऊन गेले नाहीत ! एकदोनदा मी बागेबद्दल औत्सुक्य दाखवलं. तिकडे जाण्याची इच्छा दर्शवली पण त्याचा काहीही परिणाम झाला नाही ! मानवी संबंधात इकडे जो तुटकपणा आला आहे त्याचाच हा परिणाम असावा.

"इर्गेन्ट्वो इन बेर्लीन्" हा चित्रपट थोड्याच वेळात सुरू झाला. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या पर्वात बेर्लीन शहराची दुरावस्था, दैन्यावस्था झाली होती. बॉम्ब-वर्षावात घर न् घर पडलं होतं. युद्ध संपलं होतं पण रस्त्यावर दगडविटांचे ढिगारे, खड्डे, खाचखळगे ! संकटं येतात तीं एकदमच हे बेर्लीनबाबतही खरं होतं. एस्टलांन्ट, लिटाउएन्, ओस्ट् प्रॉहसेन्, पोमेर्न ह्या रशियनव्याप्त प्रदेशातल्या जर्मन नागरिकांचे लोंढेच्या लोंढे निर्वासित म्हणून धडकत होते–जीव बचावण्यासाठी ही निराधार मंडळी उदास, भकास बेर्लीनच्या आश्रयाला येत होती. जगणंच अवघड झालं होतं. हिवाळा तर जवळ येऊन ठेपलेला ! – ही होती त्या चित्रपटाची पार्श्वभूमी.

पाच ते बारा-तेरा ह्या वयोगटातली मुलं हीच ह्या चित्रपटातली मुख्य पात्रं. (चौदा-पंधरा वयाची मुलं युद्धाच्या शेवटच्या काळात बंदुकी घेऊन लढायला गेली होती. आणि त्या सर्वांना वीरगती प्राप्त झाली होती !) खरं म्हणजे ही सारी शाळकरी मुलं, पण शाळाच कुठे होत्या ठिकाणावर ! दिवसभर ह्या ढिगाऱ्यांमधून हिंडणारी, खेळणारी, उनाडणारी, भांडणारी, आरडाओरडा करणारी, खळखळून हसणारी मुलं–बेर्लीनमधल्या जिवंतपणाचं हेच एकमेव लक्षण होतं !

खेळता–खेळता एका पडक्या घराच्या उंच भिंतीवर चढलेल्या मुलाचा पडून मृत्यू ओढवतो. ह्या ढिगाऱ्यांमुळे, ह्या पडझड झालेल्या घरांमुळेच आपल्या मित्राचा मृत्यू झाला हे त्याच्याच वयाच्या मुलांना जाणवतं. त्या लहानग्या मुलाच्या अपघाती मृत्यूनं मोठी माणसं डोक्याला हात लावून बसली आहेत नि इकडे चिमुकली मुलं ढिगारे साफ करायला सुरुवात करतात ! दुःखात चूर होऊन निष्क्रिय बनलेल्या मोठ्यांचे डोळे उघडतात–तीही

कामाला लागतात—आपल्या शहराच्या सफाईला, पुनर्निर्माणाला लागतात— आणि बघता बघता बेर्लीनचं रूप पालटतं !

अप्रतीम चित्रपट होता. बेर्लीनला जाण्याचं माझं औत्सुक्य त्यामुळे आणखी वाढलं, केव्हा एकदा बेर्लीनला जातो असं झालं !

संध्याकाळी ओमा नि ओपा घरी आले. दुपारी मी आलो तेव्हा ओपा घरात नव्हते—ते आता प्रथमच भेटत होते.

ओमानं बिअरच्या दोन बाटल्या आणून टेबलावर ठेवल्या. एक बाटली उघडून ओपांपुढे ठेवली.

"बिअर पिणार ?" ओमानं विचारलं.

"हो !" मी लगेच म्हटलं. इकडच्या सर्वच व्यवहारात फार स्पष्टता असते. नको म्हटलं तर "घ्या ना !" "थोडी तरी घ्या !" "अजिबात नाही घेणार ?" असा आग्रह कोणीही करीत नाही— हे मला वाचून माहीत होतं, पण आता त्याचं आचरण आवश्यक होतं !—आपल्याकडे म्हणजे चहाचा कप हातात आणून दिला तरी यजमानानं "घ्या ना !" म्हणेपर्यंत आपण पीत नाही—ही आपली संस्कृती. अर्थात् आपण तीच जपली पाहिजे !—ओमानं दुसरी बाटली उघडून माझ्या समोर ठेवली— माझ्या मनात आलं की दुपारी मी चहाची अपेक्षा बाळगली पण तोंड उघडून स्पष्टपणे जर सांगितलं असतं की मला चहा पाहिजे तर मिळालाही असता ! इकडच्या पद्धतीत फक्त सूचित करून नाही पुरत, स्पष्ट सांगावं लागतं.

"प्रोस्ट !" म्हणून मी नी ओपांनी आपापली बाटली बसल्या जागेवरूनच उंचावली नि बिअरचे घोट घेऊ लागलो.

माझ्या नि ओपांच्या गप्पा चालू होत्या, इकडच्या—तिकडच्या. तोपर्यंत ओमानं जेवणाची तयारी केली. लाकडाच्या प्लेट. खरं म्हणजे लाकडी फळीचे गोल तुकडेच प्लेटसारखे मांडले. अवतीभवती काट्या-चमच्यांची रांगोळी. डावीकडे सुरी, उजवीकडे काटा, समोर चमचा. टेबलाच्या मध्यभागी बुरूडाच्या टोपलीत पावाचे दोनचार प्रकार. एका प्लेटमध्ये केळ्याच्या घडासारखे जाडजूड लालसर रंगाचे चार-पाच सॉसेजेस्, एका मोठ्या पसरट वाडग्यात पिवळे लोणी, त्यावर छोटीशी, छानदार सुरी—अर्थात् लोणीकापी ! दुसऱ्या एका वाडग्यात सैलसर चीज, पावावर पसरता येण्यासारखं. जर्मनीतलं संध्याकाळचं जेवण असं साधंच असतं—काल्ट (Kalt—थंड) ताजे शिजवलेले गरम पदार्थ संध्याकाळच्या जेवणात नसतात. जर्मनीतली ही जुनीच पद्धत आहे. वेळही लौकरचीच असते. अगदी संध्याकाळ झाल्याझाल्याच.

आपल्या जेवणाखाणाच्या वेळांचा आपल्या कार्यक्षमतेवर खूपच परिणाम होत असला पाहिजे. काय खातो ह्यापेक्षा केव्हा काय खातो हे महत्त्वाचं असतं. संध्याकाळी लौकर जेवल्या- मुळे सकाळी न्याहरीच्या वेळी सडकून भूक लागते. ( त्यामुळे त्याला, ब्रेकफास्ट हे नाव शोभतं.) पुढच्या दोन-तीन महिन्याच्या काळात सकाळी ७ पूर्वी केलेल्या न्याहरीवर दुपारी एक-दोन वाजेपर्यंत काम होत असे. शेवटी शेवटी भूक लागते, पण आपण सतत अॅलर्ट राहतो. दुपारचं जेवण भारतीय पद्धतीचं, पोटभर नसतं. त्यामुळे वामकुक्षीची गरज नसते, त्यात मिळालेल्या कॅलरींवर संध्याकाळपर्यंत आपण ताजेतवाने राहतो. संध्याकाळचे जेवण लौक- रच. अशा प्रकारे माणूस दिवसभर ताजातवाना जागृत राहून भरपूर काम करू शकतो. वामकुक्षीची, अधल्यामधल्या विश्रांतीची आवश्यकता नसते नि सवडही नसते. जर्मनांची उद्योगी प्रवृत्ती होण्यात ह्या भोजनपद्धतीचा फार मोठा नि महत्त्वाचा भाग असणार. (त्यात कदाचित वाईन नि बिअरचाही वाटा असणं शक्य आहे ! )

जेवण काय बघता बघता झालं. आवराआवर करण्यात मी ओमाला मदत करू लागलो. लोणी, चीज वगैरे पदार्थ फ्रीजमध्ये नेऊन ठेवले. तोपर्यंत ओमानं लाकडी प्लेटी आणल्या. त्यावरून कोरडं फडकं फिरवलं–झाल्या स्वच्छ ! लगेच जागेवर ठेवून दिल्या. काटे-चमचे, सुऱ्या सिंकमध्ये ठेवल्या. गरम पाण्याचा नळ सोडून साबणानं सगळी साफसफाई सुरू झाली– स्वयंपाकघरात गरम पाण्याचा नळ सतत हाताशी असेल तर साफसफाई, भांडी घासणं असली कामं इतकी सोयीची होतात की त्याचा त्रास असा वाटतच नाही. आपणही ही सोय भारतात केली तर स्वच्छता करणं, राखणं फार सोपं होईल. नी सोपेपणानं खूप स्वच्छता येईल. ओमा भांडी धूत होती. मी ती टॉवेलनं पुसून कोरडी करत होतो. पाच मिनिटात काम संपलं ! स्वयंपाकघरात दोनचार ठिकाणी सफाईसाठी कागदाचे रोल लाव- लेले होते. त्यातल्या एकातून मोठासा कागद घेऊन त्यानं स्टेनलेसस्टीलचा ओटा, सिंक पुसून स्वच्छ कोरडं करून तो बोळा कचऱ्याच्या बादलीत टाकून दिला– घंटोंका काम मिनटो में !

"चला झाली कामं. आता आपण बाहेर जाऊन बसूया !" ओमा म्हणाली.

मी बाहेर येऊन बसलो. टी. व्ही चालूच होता.

ओमा आली. एका हातात दुधानं भरलेला पेला नि दुसऱ्या हातात कपबशी–छोटासाच कप होता कॉफीचा. दुधाचा पेला ओपांसमोर ठेवला.

"मी कॉफी पिणार. तुम्ही काय पिणार ?" ओमानं विचारलं.

"दूध चालेल."

ओमा लगेच माझ्यासाठी पेल्यातून दूध घेऊन आली, थंडगार.

टी. व्ही. चालूच होता. कोणतासा चित्रपट चालू झाला. आमच्या गप्पाही चालूच होत्या. हल्ली आपल्याकडे रेडिओची जशी परिस्थिती असते तशी इकडे टी. व्ही. ची. रेडिओ

(बिच्चारा) चालू असतो नि त्याच्या आवाजात घरात सर्वांचे कार्यक्रम चालू असतात. वाचन, गप्पा, स्वयंपाक, अभ्यासही ! तसाच इथे टी. व्ही.

ओपांचं वय ७०. पण अजून पहाटे ४ वाजता उठून स्वत: कॉफी करून पितात नि पाच वाजता आपल्या मित्सुबिशी मोटारीतून कामाला जातात. झीमेन्सच्या एका कारखान्यात. दुसऱ्या महायुद्धात पश्चिम आघाडीवर होतो, केवळ योगायोगानंच जिवंत राहिलो; म्हणाले. ओमाचीही साठी उलटलेली, तरीही ओमा आठवड्यातून चार दिवस एका स्टोअरमध्ये कामाला जाते.

ओमा–ओपांना चार अपत्ये– दोन मुली, दोन मुलगे. सारे आपापल्या घरी. एक मुलगी इथे न्युअॅर्न्बेर्कलाच असते. "तिनं दुसरं लग्न केल्यापासून तिच्या पहिल्या मुलाचे फारच हाल व्हायला लागले. हातात दप्तर, गळ्यात घराची किल्ली, ना धड स्वच्छता, ना धड खाणंपिणं. माझ्याच्यानं हे बघवेना. शेवटी एक दिवस त्याला परस्पर शाळेतूनच घेऊन आले. तेव्हापासून गेली पाच वर्षं तो इथेच आहे. आता तो इथेच राहाणार आहे." ओमा सांगू लागली.

"केवढा आहे ?" मी.

"बारा वर्षांचा, सहावीत आहे. इआन त्याचं नाव."

"इआन कुठे आहे ?" मी.

"उद्या सुट्टी आहे ना, म्हणून आज तो शाळेतून परस्पर त्याच्या आईवडिलांकडे गेला आहे. तसे चांगले आहेत त्याचे दुसरे वडील. आता सोमवारी शाळा सुटल्यावर तो इकडे येईल."

"तुमचं लग्न झालं आहे ?" ओपा.

"हो, आम्हाला तीन मुली आहेत." मी.

"तीन ?" ओमा आश्चर्यानं म्हणाली.

"हल्ली आमच्याकडे फार तर एखादं मूल असतं प्रत्येक कुटुंबात. तुमच्या देशात एकेकाला फार मुलं असतात." ओपा तिरस्कारानं म्हणाले.

"तुमच्याकडे एकेकाची अनेक लग्नं होतात. त्यातून बऱ्याच कटकटी उद्‌भवतात. मुलं होणार तरी केव्हा ? आदर्श जर्मन कुटुंब म्हणजे नवरा–बायको नि कुत्रं !" मी म्हटलं. पण माझं म्हणणं ओपांना आवडलं नसावं. कारण ते काही बोलले नाहीत, पण ओमा मात्र लगेच म्हणाली,

"खरंच आहे ? हल्ली प्रत्येकाची २–३ लग्नं तरी होतातच. आमच्या काळी नव्हतं असं !" ओमांचं हे वाक्य मला फारच आवडलं !

ओमांची साठी उलटली होती. तिला तिच्या वेळच्या तिच्या तरुणपणाची, अखंड जर्मनी आठवत असणार. आताची जर्मनी ही खंडित झालेली नि कुटुंबसंस्था उध्वस्त व्हायला

लागलेली. मुलांमुळे ही सारी दुःखं अनुभवावी लागली होती. इआन तिच्याकडेच होता, आणि म्हणून ती त्याच्यावर प्रेम करत होती. खूप, खूप प्रेम करत होती. पण त्याला आई-वडिलांचं प्रेम मिळत नाही, ह्याचं दुःख तिला होतं. ओमा–ओपांच्या दोन्ही पुत्रांची दोन दोन लग्नं झाली होती हेही बोलण्याच्या ओघात येऊन गेलं.

" तुम्ही कधी भारतात आला होतात ?" विषय बदलण्यासाठी मी म्हटलं.

" भारतात ? कशाला ते मरायला ?" ओपांचं हे वाक्य अनपेक्षित होतं. त्यावर काय बोलावं असा विचार मी करत होतो तेवढ्यात, ओपांनीच पुढे बोलायला सुरुवात केली, " एवढासा तुमचा देश नि खाणारी ही भरमसाट तोंडं !" ओपांची स्पष्टोक्ती चालूच होती, " साऱ्या जगात भीक मागायची सवय लागली आहे तुम्हाला. तुमच्याकडे एक गोष्ट होते– मुलं !"

ह्यातल्या प्रत्येक वाक्यागणिक भारतीयांचा पारा चढावा, पण माझा चढला नाही. कारण हे वक्तव्य करणाऱ्या माणसाचं भारताबद्दल प्रचंड अज्ञान होतं आणि स्वतःच्या श्रेष्ठतेबद्दलचा प्रचंड गंड !

ओपांचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न माझ्यापरीनं मी केला. पुढच्या आठ–पंधरा दिवसात सतत करत होतो. वर्षानुवर्षं बसलेली ही अज्ञानाची पुटं अर्थात अशी आठ–पंधरा दिवसात निघणं शक्य नव्हतं. भारताविरुद्ध विषारी अपप्रचार करणाऱ्या यंत्रणा इतक्या प्रभावी आहेत की त्यामुळे त्यांचा प्रभाव साहजिकच दिसून येतो. भारताविरुद्धच्या प्रचाराला बऱ्याचदा खुद्द भारतीयही अजाणतेपणानं मदत करत असतात !

मी स्वतः एकदा टी. व्ही. वर माहितीपट बघितला. भारत म्हणजे झोपडपट्ट्यांचा देश, भिकाऱ्यांचा देश, रोगराई, दारिद्र्य, उपासमार म्हणजे भारत; हेच त्या माहितीपटावरून दिसत होते. " तुमच्या देशात गरिबी फार, मग लोक कपडे घालतात ? एवढी माणसं अन्नपाण्यावाचून मरतात, मग तुम्ही सक्तीनं कुटुंबनियोजन का करत नाही ? जगभर अन्नधान्याची भीक मागण्यापेक्षा देशभर मोकाट फिरणाऱ्या गाईबैलांना मारून का खात नाही ? तुमची अन्नधान्याची समस्या मिटेल ! मोकाट गाईबैलांना देव मानता नी माणसांना अन्नावाचून मारता ही कसली तुमची संस्कृती ? हा कसला तुमचा धर्म ? तुमच्याकडे इतक्या अडचणी असताना त्यासाठी काही करण्याऐवजी तुम्ही त्या बिचाऱ्या पाकिस्तानावर नि बांगला देशावर उठसूट युद्ध का लादता ? आमच्या मदतीवर तुम्ही किती वर्षं जगणार ?" असले नि असल्या प्रकारचे सुन्न करणारे प्रश्न युरोपात सर्वत्रच विचारले जातात. (अशा प्रश्नांना काय उत्तरे द्यायची ह्याचा विचार परदेशी जाऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक भारतीयानं करून ठेवावा, नव्हे–चांगली तयारी करून जावं ! )

" युरोप तसा मोठा आहे, पण ओमा, भारतही काही लहान नाही. जर्मनीत जशी लेन्डर आहेत तशी आमच्याकडे राज्ये आहेत. मी महाराष्ट्रात राहाणारा. महाराष्ट्र हे

काही भारतातील सर्वात मोठं राज्य नाही. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी. मुंबई माहित असेल तुम्हाला !" मी म्हटलं.

"हो, ऐकून माहीत आहे." ओपा.

"टी व्ही. वर पाहूनही माहीत आहे." ओमा म्हणाली.

"मुंबईहून एखादा माणूस पूर्वेकडे जायला निघाला– सरळ सरळ पूर्वेकडे गेला ९०० किलोमीटर तरी तो महाराष्ट्र राज्यातच असेल ! तसेच दक्षिणेकडे ! आणि अशी २२ राज्ये आहे भारतात !"

"बावीस ? एवढाली ?" ओमानं विचारलं.

"हो; बावीस ! आणि काही राज्यं तर महाराष्ट्रापेक्षाही मोठी आहेत." आता मात्र ओमा, ओपा विचारात पडलेले दिसले, प्रथमच ! त्यांच्या भारताबद्दलच्या कल्पनेला प्रथमच धक्का बसलेला दिसत होता.

मी सांगितलेली माहिती शंभर टक्के खरी नव्हती. पण त्या प्रसंगी अशाच स्पष्टीकरणाची आवश्यकता होती. माझ्या त्या स्पष्टीकरणानं बरंच काम झालं ! (पुढच्या दोन–चार महिन्यात भारताच्या आकारमानाबद्दल प्रश्न विचारला गेला की मी हेच उदाहरण देत असे, त्याचा परिणाम आश्चर्यकारक असे ! )

"नऊशे किलोमीटर ?" ओमा अजून त्याच विचारात होत्या.

"हो, नऊशे किलोमीटर. इथे न्युअॅर्न्बेर्कहून आपण पूर्वेकडे नऊशे किलोमीटर गेलो तर वाटेत झेकोस्लोव्हाकिया नी पोलंड हे दोन देश ओलांडून आपण रशियाच्या युक्रेन राज्यात जाऊन पोहोचू !" मी म्हटलं.

"तसं असेल तर भारत देश मोठा असला पाहिजे !" कसं का होईना पण ओपांच्या तोंडून हे कंडिशनल वाक्य ऐकून बरं वाटलं.

"आमचा देश मोठा असल्यामुळे आमच्या अडचणीही मोठ्या आहेत. मधल्या काळात इंग्लिश लोकांनी आमच्या देशातून प्रचंड लूट केली..."

"इंग्लिश माणसं म्हणजे..." ओपांनी वाक्य अर्धवट सोडलं पण त्यांच्यातला जर्मनपणा जागा झाला होता. इंग्रजांवरचा राग सहजपणे जाणवत होता.

"इंग्रजांशी झगडून स्वातंत्र्य मिळविण्यात आमची दोन शतकं गेली. तरीही आज आम्ही स्वतःच्या पायावर खंबीरपणानं उभे आहोत. भारत म्हणजे जगातला सर्वात मोठा लोकशाही असलेला देश आहे."

काही वेळ पुनः शांतता पसरली.

"बरं, आता मी झोपायला जातो." आता ओपांनीच विषय बदलला, "उद्या सकाळी न्याहारीनंतर आपण गावात जाऊया चक्कर मारायला. तुमची व्याख्यानं होणार आहेत

ती जागा पण दाखवेन...सो...गूटऽनाय्ट!" गुड् नाइट म्हणून ओपा आपल्या खोलीत गेले.

"तुम्ही टी.व्ही बघा हं! तुम्ही लगेच झोपलंच पाहिजे असं नाही!" मी उठण्याच्या तयारीत आहे हे पाहून ओमा म्हणाली, "हे तुमचंच घर आहे! उद्या सुट्टीच आहे, किती वाजता उठवू?"

"साडेपाचपर्यंत!"

"छे! इतक्या लौकर काय करणार उठून? सावकाश उठा!"

"साडेसहाला?"

"ठीक आहे! दिव्याचं बटण इथे आहे. गूट ऽ नाय्ट!"

"गूट ऽ नाय्ट ओमा!"

ओमा झोपायला गेली. मीही समाचार संपल्यावर टी.व्ही. बंद केला, दिवे बंद केले नि माझ्या खोलीत येऊन गुबगुबीत गादीवर पडून पिसांचं पांघरूण अंगावर ओढून घेऊन एक नवं पुस्तक चाळू लागलो.

# पार्टी

न्युअॅर्न्बेर्क्ला आल्यापासून आज पहिल्यांदाच दुपार जरा मोकळी मिळाली होती दुपार तशी अगदी मोकळी नव्हती, कारण न्युअॅर्न्बेर्क् गावाच्या ओबरव्यर्गर्माइस्टरनं म्हणजे नगराध्यक्षांनी आम्हा सर्वांना आज संध्याकाळी खास मेजवानीचं आमंत्रण दिलेलं होतं.

सकाळी सात वाजल्यापासून दुपारी दोनपर्यंतचा दिवस रोजच्याप्रमाणेच खूप गडबडीत गेला. दुपारचं सेशन नसल्यामुळे मी घरी आलो. आज रात्री यायला खूपच उशीर होणार होता ह्या अंदाजानं थोडा वेळ चक्क पडलो ! जर्मनीत आल्यापासून जास्तीत जास्त वेळ बघण्यात, बोलण्यात घालवत होतो. रात्री दहा-साडेदहापर्यंत उजेड असायचा. त्यामुळे ह्या गोष्टी करायला भरपूर वाव होता. एरव्ही दुपारी असा मोकळा वेळ नसायचाच आणि मिळालाच असता तरी तो असा झोपण्यात घालवला नसता. पण आज मात्र तासभर वामकुक्षी झाली.

संध्याकाळी भराभर सर्व आवरून 'पेटर्स किर्शऽ' जवळच्या प्रार्थना मंदिराजवळ-चर्चजवळ आलो. इथल्या सर्वच शहरातून सार्वजनिक वाहनांचा वापर करणाऱ्यांसाठी एक छान सोय असते. ट्रॅम, बस, ऊबान् (भुयारी रेल्वे) अशा सार्वजनिक वाहतुकीच्या सर्व वाहनांसाठी एकच तिकीट चालतं. प्रत्येक वेळी वेगवेगळं तिकीट काढण्याची गरज नसते,

पाच तिकिटांची एक पट्टी एकदम विकत घेता येते. यंत्रात पैसे टाकून तिकीट मिळतं. ट्रॅम, बस, ऊबान ह्यात जियून आपण आत चढतो तिथे दारापाशीच एक छोटंसं यंत्र असतं, त्यात आपलं तिकिट घालायचं म्हणजे त्यावर तारीख, वेळेचा शिक्का उठतो आणि त्या वेळेपासून एक तासभर ते तिकिट चालू शकतं. म्हणजे तुम्हाला जिथे जायचं असेल तिथे जाण्यासाठी तुम्हाला प्रथम ट्रॅम, मग ऊबान नि नंतर बस वापरून जायचं असेल तर त्या एकाच तिकिटावर सर्व प्रवास करता येतो ! आणि तुमच्या इच्छित स्थळी जाऊन तुम्ही एक तासाच्या आत परत निघू शकलात तर त्याच तिकिटावर तुम्हाला परतीचा प्रवासही करता येतो ! टिङ्, टिङ्, टिङ्, टिङ् असा मधुर घंटानाद करत ट्रॅम जात असतात. अगदी वेगात ! आम्ही मात्र आमच्याकडची मुंबईची ट्रॅम कारण नसताना मोडीत काढली !

न्युअॅर्न्बेर्क्मध्ये मी 'ब्राडन्' कुटुंबात राहत होतो. त्यांचं घर हार्सडर्यॉर्फर रस्त्यावर पेटेर्सकिर्शऽजवळच होतं. घरातून बाहेर पडून मी समोरच्याच ट्रॅमच्या स्टॉपवर उभा राहिलो.

पाचच मिनिटात–ठरलेल्या वेळी ट्रॅम आली. नेहमीप्रमाणे जवळजवळ रिकामी ! रिकामी वाहनं बघण्याची आता बरीच सवय झाली होती ! (एकदा तर मला इतकं आश्चर्य वाटलं. जर्मनीत माझी भ्रमंती चालू होती तेव्हाची गोष्ट. सात डब्यांच्या रेल्वेगाडीनं मी प्रवास करत होतो. सेकंड क्लासच्या पाच डब्यात मिळून चार प्रवासी होते, फर्स्ट क्लासच्या दोन डब्यात मिळून मी एकटा प्रवासी नी दोन कर्मचारी. एक होता तो गार्ड–कम्–टीसी नी दुसरा म्हणजे इंजिन ड्रायव्हर !) तिकिट पंच करून मागच्या गोलाकार भागात येऊन उभा राहिलो, इथून बाहेर बघायला मजा येते. हाउप्ट्बान्होफ्च्या पुढचा मोठा चौक म्हणजे "आम् प्लेएर !" ह्या चौकात येऊन ट्रॅम थांबली. दरवाजे आपोआप उघडले गेले. मी खाली उतरलो.

केवळ ह्या चौकातच नव्हे तर ह्या संपूर्ण परिसरातच सर्वात उंच असलेली १५ मजली इमारत म्हणजे 'फेरवाल्टुङ्ज्होख्हाउस्' ह्या उंच इमारतीच्या १५ व्या मजल्यावर नगराध्यक्षांचं कार्यालय आहे, त्यावरती गच्ची. त्या गच्चीवरतीच आमच्या आजच्या खान्याचा कार्यक्रम आयोजित केलेला होता.

इमारतीच्या उत्तुंगतेमुळे शोधण्यात वेळ गेला नाही. पण वरती जाण्याचा दरवाजा सापडायला मात्र वेळ लागला. एवढ्यात फ्राउ लिंडा भेटल्या. त्या मूळच्या ऑस्ट्रियातल्या. पण आता कॅनडात स्थायिक झालेल्या. इथल्या कार्यक्रमासाठी माझ्याप्रमाणेच आलेल्या, आणि आत्ताही माझ्याप्रमाणेच दरवाज्याच्या शोधात असलेल्या ! आम्ही दोघांनी मिळून पुन: एकदा दरवाज्याचा शोध घेतला. ह्या इमारतीत खालच्या बाजूला असलेली दुकानं केव्हाच बंद झाली होती. रस्त्यावरून भरधाव जाणारी वाहनं असंख्य होती. पण कोणाला काही विचारावं म्हटलं तर एखादासुद्धा पादचारी दृष्टिपथात नव्हता !

सात वाजायला अवघी दहा मिनिटं कमी होती. आम्हाला तर सात वाजेपर्यंत पोहोचायला हवं होतं. उशीरा जाऊन कसं चालेल ? पण आम्हाला तर दरवाजाच सापडत नव्हता ! एवढ्यात समोरचा अपारदर्शक काचेचा मोठाथोरला भाग दरवाज्याप्रमाणे उघडला नि आतून एक व्यक्ती बाहेर पडली ! गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी म्हणता म्हणता शेवटी "तिळा दार उघड !" म्हणावं नि आपल्या समोरचा दरवाजा एकदम उघडला जावा तसंच झालं ! वरती जायचा दरवाजा तोच असल्याचं त्या माणसानं सांगितलं नी आम्ही आनंदानं आत शिरलो. लिफ्टनं वरती गेलो. सात वाजायला पाच मिनिटं कमी असताना आम्ही १६ व्या मजल्यावरच्या गच्चीत पोहोचलो !

गच्चीवर खूप उंचीचं तंबूसारखं छप्पर होतं. चारही बाजूंनी पांढऱ्या पारदर्शक काचेच्या भल्यामोठ्या खिडक्या. सर्व बाजूंना दूरदूरपर्यंत पसरलेल्या न्युअॅर्न्बेर्क् शहराचं विहंगम दृश्य डोळे भरून बघायला मिळत होतं. उत्तरेकडे शहराच्या जुन्या भागातली लालचुटुक रंगांची कौलारू घरं लक्ष वेधून घेत होती. त्यांच्या पार्श्वभूमीवरची टेकडी. टेकडीवरचा न्युअॅर्न्बेर्क्चा प्रसिद्ध किल्ला नि किल्ल्याच्या मागे दूरवर दिसणाऱ्या निळ्या-निळ्या डोंगरांच्या साजिऱ्या रांगा. सारीच दृश्यं विलक्षण मोहक...आज एका वेगळ्या उंचीवरून न्युअॅर्न्बेर्क् बघायला मिळत होतं—

त्या थाटाच्या पार्टीला इतक्या ऐन वेळेवर येऊन पोहोचणारे आम्ही दोघंच होतो. मी नि फ्राऊ लिंडा. आमची बाकीची मित्रमंडळी केव्हाच स्थानापन्न झाली होती. पश्चिमेकडच्या टेबलापाशी बऱ्याच जागा रिकाम्या होत्या. आम्ही तिकडे जाऊन बसलो. सात वाजत होते, ऊन चांगलंच भाजत होतं, सूर्यास्त व्हायला अजून काही तास अवकाश होता.

ठीक सात वाजता ओबरब्युर्गरमाइस्टर महोदयांनी म्हणजे नगराध्यक्षांनी गच्चीवर प्रवेश केला. सर्वांना अभिवादन करत त्यांच्यासाठी मध्यभागी ठेवलेल्या विशाल खुर्चीवर धिप्पाड देहाचे नगराध्यक्ष स्थानापन्न झाले. ६॥ फूट उंच, रुंद खांदे नि ह्या उंचीरुंदीला शोभेल असा धिप्पाड, भरदार देह. न्युअॅर्न्बेर्क्सारख्या मोठ्या शहराला शोभून दिसतील असेच मोठे नगराध्यक्ष !

नगराध्यक्ष स्थानापन्न होताच सेवेस हजर असलेल्या काळ्या पांढऱ्या फ्रॉकच्या गणवेशातल्या पाच-सहा सेविकांनी अक्षरशः चार-पाच मिनिटातच सर्वांच्या समोरचे उभट आकाराचे आकर्षक पेले पांढऱ्या वाईननं भरले. एका वेळी हातात दोन-दोन, तीन-तीन बाटल्या घेऊन त्या पेले भरत होत्या. काठोकाठ; पण एकही पेला भरून वाहवला नाही, वाईनचा थेंबही टेबलावर सांडला नाही की कोणाच्या अंगावर पडला नाही !

सर्वांच्या समोरचे पेले भरून झाल्यावर नगराध्यक्ष उठून उभे राहिले. वाइस्वाईननं भरलेला पेला हातात घेऊन उंचावला.

"इथे जमलेल्या आमच्या न्युअॅर्न्बेर्क्च्या पाहुण्यांसाठी !"

–असं म्हणून त्यांनी पेला आपल्या ओठाला लावला, झटक्यात रिकामा करून पटकन खाली बसले !

आम्ही सर्वांनी आपापले पेले उंचावले नि ओठाला लावले. आहाहा ! त्या फ्रेंकिशऽ वाइस्‌वाईनची मजा काही और होती. मधुर चव ! आगळा स्वाद !

आपल्याला रंगांचं काय आकर्षण असतं कोण जाणे ! विचित्रच ! जर्मनीत येऊन मला चांगले आठ दिवस झाले होते. न्युअॅर्‌न्बेर्‌क्‌ला आल्यावर मी बऱ्याचदा वाईन प्यायली पण पारदर्शक–वाईस्‌वाईन नव्हे तर मस्त दिसणारी रोट्‌वाईन–लाल रंगाची वाईन–वाईस्‌वाईनचा पेला रिकामा करून खाली ठेवताना वाटलं की छे ! इतके दिवस असली पारदर्शक पांढरी वाईन न पिण्यात आपण फार मोठी चूक केली होती. अर्थात नंतरच्या वास्तव्यात मी ही चूक जाणीवपूर्वक सुधारली, रोज सुधारली !

रिकामा पेला खाली ठेवल्या ठेवल्या लगेच भरला गेला !

खान्याचा थाट भव्य होता. टेबलांवर पांढऱ्याशुभ्र चादरी पसरलेल्या होत्या. सुंदर, सोनेरी नक्षीच्या वेगवेगळ्या आकाराच्या प्लेट मांडलेल्या होत्या. मुख्य–मोठ्या प्लेटच्या भोवती मुठीवर सुंदर नक्षीकाम असलेले चकचकीत काटे, त्याच प्रकारची नक्षी असलेल्या मुठीच्या सुऱ्या आणि चमचे पद्धतशीरपणे मांडून ठेवलेले होते. जणू काटे, चमचे, सुऱ्या ह्यांची नाविन्यपूर्ण रांगोळीच प्लेटभोवती काढली होती ! दर चार प्लेटच्या मध्यावर एक रक्षापात्र, सिगरेट, काड्यापेटी. एका छोट्याशा, पितळ्याच्या चकचकीत स्टॅंडवर आजच्या खान्याचा छापिल कार्यक्रम ! आजच्या खान्यात कोणकोणते पदार्थ, कोणत्या क्रमानं आहेत हे सांगणारं आकर्षक कार्ड लावलेलं–जंगी काम होतं तर ! प्लेटच्या उजव्या बाजूला उंच आकाराचा पेला, त्यात गुलाबी रंगाचे नॅपकिन इतक्या आकर्षक पद्धतीनं घडी करून खोचले होते की त्याकडे बघून वाटत होतं– पाकळ्या–पाकळ्यांची कमळंच पेल्यातून उमलली आहेत !

आमच्या समोर दोन इटालियन शिक्षिका–पोरगल्या शिक्षिका बसल्या होत्या. व्हेरोनाची आंगेला नि मिलानोची एलोइझ्‌ऽ. लिंडा मूळची ऑस्ट्रियातल्या झाल्त्स्‌बुर्कची. आमच्या टेबलावर तसा परका–युरोपबाहेरचा मीच एकटा. आंगेलाला नि एलोइझ्‌ऽला एखाद्या भारतीय माणसाबरोबर बोलण्याची संधी आयुष्यात पहिल्यांदाच मिळत होती– माझ्या बरोबर ! आपल्या इटालियन इंटोनेशनमध्ये त्या जर्मन बोलायच्या मजेशीर अनेक तऱ्हांनी बोलली जाणारी इंग्लिश आपल्याला भारतात ऐकायला मिळते पण वेगवेगळ्या भाषिकांकडून बोलली जाणारी जर्मन ऐकायची संधी मला पहिल्यांदाच मिळत होती. एखाद्याचं जर्मन ऐकून त्याची मातृभाषा इटालियन की फ्रेंच की इंग्लिश का अमेरिकन हे ओळखण्याचा छंदच लागला होता मला. भारतातून गेलेल्या माणसाला सुरवातीला युरोपिअनांच्या कातडीच्या, केसांच्या किंवा डोळ्यांच्या रंगावरून त्यांच्यातले भेद झटकन ओळ-

खता यत नाहीत–पण पुढे सरावानं तेही जमतं !

आमच्या गप्पा केव्हाच चालू झाल्या होत्या. आता त्या रंगात येत होत्या. भारताबद्दल नाना प्रकारचे प्रश्न विचारले जात होते. भारताचा दूत म्हणून मीही सर्व प्रश्नांना उत्तरं देत होतो. आमची प्रश्नोत्तरं चालू असतानाच पहिली डिश् आली.

गरमगरम सूपचे मोठे वाडगे मधल्या प्लेटमध्ये ठेवले जात होते. फिक्कट भगव्या रंगाचं भाज्यांचं सूप–रंग पाहूनच मन खुश झालं ! डिश समोर आली की शेजारी-पाजारी न बघता त्या डिशवर तुटून पडायचं ही युरोपिअन पद्धत ! सगळ्या टेबलांवर फटाफट बांबूच्या सुबक, कलापूर्ण परड्या ठेवल्या गेल्या. त्यात पावांचे बरेच प्रकार ठेवलेले होते.

आमच्या गप्पांना एकदम ब्रेक लागला होता ! पेल्यातली गुलाबी कमळं आता नॅपकिन बनून मांडीवर पसरली गेली. श्वार्त्सब्रोट हा पावाचा प्रकार माझ्या अत्यंत आवडीचा. रंगानं काळा पण चवदार. श्वार्त्सब्रोटचा तुकडा घेऊन त्यावर लोणी लावून मीही समोरच्या सूपचा समाचार घ्यायला सुरवात केली होती. सूप संपत आल्यावर आता एकेकाच्या तोंडाची कुलपं उघडायला लागली होती !

"तुम्ही भारतीय लोक गाय का खात नाही ?" जर्मनीत आल्यापासून गेल्या आठ–दहा दिवसात हा प्रश्न मला अनेकांनी विचारला होता. "आणि तुम्हाला धान्य नि भाजीपाला पुरतो ?...मांस न खाण्यासारखं त्यात वाईट काय असतं ?" आंगेलानं एका दमात सगळे प्रश्न विचारून टाकले होते नि माझ्याकडे पाहत ती वाईनचा पेला रिता करण्याच्या उद्योगाला लागली होती !

"कोण म्हणतं की भारतात मांस खात नाहीत ? गायसुद्धा खातात ! पण सगळे नाही खात. गायच काय पण तुम्हाला कल्पनाही येणार नाही असे प्राणी आमच्याकडे खाल्ले जातात !..."

"उदाहरणार्थ ?"

"हत्ती ! असम भागात हत्तीसुद्धा खातात, पण सगळेच लोक हत्ती खातात असं नाही. मांसालाच काय पण, अंड्यालासुद्धा न शिवणारे लोक भारतात आहेत. लाखांनी..." वाइस्-वाईनचा पेला मी ओठाशी नेला.

जादूतल्या खेळाप्रमाणे वाईनचे पेले भरले जात होते. रिकामा पेला टेबलावर ठेवायचा अवकाश की आसपास उभी असलेली चुटचुणीत साकी तो काठोकाठ भरत असे. आमच्या गप्पा अखंडपणे चालू होत्या.

भारतीय लोक नी त्यांचा आहार ह्यात इटालियन पोरींना भलताच रस होता न्युअॅर्न्-बेर्क्‌ला नी नंतर बेर्लीनला आम्ही बरोबर होतो तोपर्यंत आमचा प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम नित्यनियमानं होत असे.

सूपचे रिकामे वाडगे भराभर उचलले गेले नि आता मुख्य डिश आली. मोठ्या प्लेट-

मध्ये विटकरी लालसर रंगाचा पदार्थं होता. मेन्युकार्ड आमच्यासमोरच होतं. पण इतका वेळ ते बारकाईनं बघितलं नव्हतं. कारण बऱ्याचदा असं होतं की माझ्यासारख्या नवाख्याला त्यातले केवळ शब्द वाचून काहीच बोध होत नसतो, म्हणूनच मी तिकडे लक्ष दिलं नव्हतं. पण हा अगदीच वेगळा दिसणारा पदार्थ प्लेटमध्ये बघून वाटलं की ह्याला काय म्हणतात ते निदान बघावं तरी, म्हणून कार्डावर नजर टाकली. बापरे ! त्यावर लिहिलं होतं ससा ! "ससा, ससा, दिसतो कसा– कापूस पिंजून ठेवलाय जसा." पण ससा ससा लागतो कसा ? मला तर समोरच्या प्लेटमध्ये पांढराशुभ्र ससाच दिसत होता नि आपण हात लावला रे लावला की भित्री भागूबाई टुणकन उडी मारून पळून जाणार !

"ए, अरे बघत काय बसला आहेस ?" लिडाबाईंनी मला तंद्रीतून जागं केलं. एव्हाना मोठ्या वाडग्यातून बीटची कोशिंबीर आणून ठेवलेली होती. "मस्त आहे !" एक मोठा तुकडा तोंडात ढकलत लिडाबाई बोलत होत्या. "सशाबरोबर बिटाची कोशिंबीर छान लागते." सर्वांनी ती कोशिंबीर वाढून घेतली होती, मीही घेतली. पांढऱ्याशुभ्र प्लेटमध्ये लाल पदार्थं– दिसायला तरी छान दिसत होते. काटासुरी सरसावून मीही एक तुकडा तोंडात टाकला. वाहवा ! मस्त ! अप्रतिम ! ससा, ससा, लागतो कसा याचे उत्तर मला सापडलं. मऊ लुसलुशीत, चवदार, गोडसर. बिटाच्या कोशिंबिरीबरोबर तर त्याची चव अधिक खुलत होती. काही मिनिटं अगदी एकचित्तानं खात होतो. "छान ! मस्त !" असं म्हणण्यातही वेळ घालवायला तयार नव्हतो ! वाईनचा भरलेला पेला तर तसाच होता.

"वाईन नाही आवडत तुला ?" आंगेलाच्या प्रश्नानं मी जागा झालो. प्रश्न लक्षात आला होता तिचा.

"नाही कशी ! खूप आवडते ! असं म्हणत मी पेला हातात घेतला. आंगेलानंही तिचा पेला हातात धरला. माझ्या पेल्यावर टेकवला. रिकामे पेले खाली ठेवत होतो. भरलेले उचलत होतो !

ससा, वाईस्वाईन, बिटाची कोशिंबीर, श्वार्त्सब्रोट– सर्व पाहुणेमंडळी क्रमाक्रमानं ह्या पदार्थांचा यथेच्छ समाचार घेण्यात दंग होती. बऱ्याच वेळानं प्लेटमधल्या काट्या चमच्यांना निवांतपणा मिळाला नि दोघं शेजारीशेजारी येऊन स्थिरावले.

टेबलं पुन्हा स्वच्छ झाली. प्लेटच्या डावीकडे एक काटा, उजवीकडे एक सुरी नि समोर दोन चमचे अजून शिल्लक होते.

आता केक आला. छोट्या बशीच्या आकाराचा पण एकदम चपटा–धिरड्यासारखाच. गरमगरम– त्यावर सायीचा गोळा ! काटासुरी घेऊन सर्व सरसावले. केकची चव मुख्यत: आंबट होती. रुचीपालट म्हणून छान लागत होता. वाइस्वाईन ह्या केकबरोबर पण छान लागत होती.

आता प्लेटसमोर फक्त दोन चमचेच शिल्लक होते. मंडळी अजून जागेवरच बसून होती. पण गप्पांचा आवाज मात्र वाढला होता, थोडासा गलका वाटण्याइतपत. आम्हालाही त्यामुळे जरा मोठ्यानं बोलावं लागत होतं. पलिकडच्या रेनाट्ऽबाईही आता आमच्या गप्पात सामील झाल्या होत्या. त्या मूळच्या म्युअॅन्शेन्च्या. आता स्टेट्स्मध्ये स्थायिक झालेल्या. ज्यूंवर झालेले अमानुष अत्याचार त्यांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले होते— पाहवे लागले होते. न्युअॅर्न्बेर्क् महायुद्धानंतर गाजलेला तो खटला. युद्ध हा अप्रिय विषय बोलण्याच्या ओघात चुकून निघाला पण रेनाटऽबाईंच्या डोळ्यांसमोर तो भूतकाळ अक्षरशः भुतासारखा नाचू लागला ! एकाएकी त्या अतिशय अस्वस्थ झाल्या.

"तो काळ विस्मृतीत कुठे तरी खोल-खोल गाडून टाकावा असं वाटतं. त्या काळातली. एक जर्मन नागरिक, त्या काळची एक साक्षीदार ह्या नात्यानं माझ्या मनात नेहमीच अपराधी भावना असते !" रेनाट्ऽच्या बोलण्यानं थोडा वेळ आमच्या टेबलावर एकदम शांतता पसरली.

एवढ्यात विशालकाय नगराध्यक्ष उभे राहिले. सर्वच टेबलांवरच्या गप्पा एकदम थांबल्या. आम्हा सर्वांचं पुनः एकदा हार्दिक स्वागत करून नगराध्यक्षांनी बोलायला सुरवात केली—न्युअॅर्न्बेर्क् शहराशी त्यांचं फार जवळचं नातं होतं. त्यांच्या गेल्या कित्येक पिढ्या ह्या शहरात केवळ राहिल्या असं नाही तर त्यांच्या वडिलांनी, आजोबांनी, पणजोबांनी, खापरपणजोबांनीही नगराध्यक्षपद भूषवलं होतं ! बापरे !— केवढी ही प्रदीर्घ परंपरा ! आम्हाला मॉडर्न-मॉडर्न वाटणारी ही माणसं परंपरांना केवढं महत्त्व देतात !...युद्धातल्या संहारानंतर बऱ्याच गोष्टी बदलल्या; पण जुन्या शहरातली घरं त्यांनी जशीच्या तशी पुनः बांधून काढली—प्रसिद्ध चित्रकार आल्ब्रेश्ट् ड्यूररचं घर पुनः पहिल्यासारखं केलं. जुन्या काळच्या तटबंदीची पडझड झाली होती. ती दुरुस्त करून पुनः पहिल्यासारखी नवी केली. आज काही त्या तटबंदीची गरज राहिलेली नाही पण तिचं ऐतिहासिक मोल अमोल आहे. तटाजवळची घरं, दुकानं फार काय दुकानांवरच्या शेकडो वर्षांपूर्वीच्या पाट्यासुद्धा इथे जपल्या जातात !...हे सर्व सांगत असताना नगराध्यक्षांची छाती अभिमानानं फुगली होती !...वस्ती वाढल्यामुळे गावाचा विस्तारही वाढला, त्यासाठी नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब केला—बंगले बांधले, फ्लॅटच्या मोठमोठ्या इमारती उभारल्या पण हे सर्व करताना जुन्या गावात वेडेवाकडे बदल केले नाहीत. जुन्या घरातून आधुनिक सोयी आणल्या. घराघरातून सेंट्रल हीटिंग सिस्टिम आली पण त्यासाठी जुनी घरं पाडून तिथे न शोभणाऱ्या आधुनिक इमारती नाही उभारल्या. घडीव दगडांचे जुने रस्ते, गल्ल्या, बोळ सारं सारं काळजीपूर्वक, अभिमानानं जपलं...आपल्याला नाही ह्यापासून काही शिकता येणार ?

आम्ही सर्वच परदेशी होतो नी नगराध्यक्षांचे खास पाहुणे. त्यांच्याकडे सांगण्यासारखं खूप खूप होतं तरीही भाषणबाजी न करता त्यांनी पाचच मिनिटात आटोपतं घेतलं.

आमचे डायरेक्टर डॉ शटेट्लर् ह्यांनी आम्हा सर्वांच्या वतीनं नगराध्यक्षांचे आभार मानले.

आईस्क्रिमचे पेले आले. उन्हाचा त्रास आता बराच कमी झाला होता. साडेनऊ वाजायला आले होते, सूर्यास्ताची वेळ जवळ आली होती. सोळाव्या मजल्यावरून क्षितिजापलिकडे चाललेल्या लाल भगव्या गोळ्याकडे बघत बघत आम्ही आईस्क्रिम संपवलं नि वाईनचे पेले घेऊन सूर्यास्ताची शोभा पाहत होतो–यथावकाश सूर्यास्त झाला. गावातले दिवे लागायला लागले होते. उत्तरेकडच्या टेकडीवरच्या किल्ल्याच्या तटावर प्रकाशझोत टाकलेले होते. अंधारलेल्या पार्श्वभूमीवर किल्ला उठून दिसत होता.

टेबलावर अजून एक चमचा शिल्लक होताच ! आता सगळ्यांसमोर सोनेरी रंगाच्या अतिशय नाजुक नक्षीकाम केलेल्या कपबश्या मांडल्या गेल्या. त्या थाटाला साजेशाच पसरट वाडग्यातून साखरेचे क्यूब आले, त्यापाठोपाठ दुधाची भांडी नि शेवटी आल्या किटल्या. उभट आकाराच्या किटल्या अत्यंत आदबीनं टेबलावर उभ्या होत्या–कॉफी आली तर !

कितीतरी वेळ बसून राहिलेली मंडळी आता पाय मोकळे करायला उठत होती–हातात कॉफीचा कप घेऊन. काहींनी आता कॉफीपान सुरू केलं होतं पण बहुतेकांनी कॉफीचा कप संपवून पुन: वाईनलाच जवळ केलं होतं

मीही माझा पेला घेऊन नगराध्यक्षांजवळ गेलो. दोन मिनिटं औपचारिक गप्पा झाल्या. एक भारतीय माणूस जर्मन बोलतो ह्याचं त्यांना फारच कौतुक वाटत होतं. ते त्यांनी बोलूनही दाखवलं. "आमच्या गावात मजेत रहा ! आनंदात रहा ! तुमचा परतीचा प्रवास सुखाचा होवो !" अशा प्रकारे त्यांनी आपल्या शुभेच्छा व्यक्त केल्या. नगराध्यक्षांशी पुन: एकदा हस्तांदोलन करून मी बाजूला झालो–नगराध्यक्षांशी बोलायची इच्छा आणखी बऱ्याच जणांना होती.

आता त्या काळ्या फ्रॉकमधल्या मुली आमच्या समोर येऊन आमच्या हातातले पेले भरत होत्या. सात वाजता सुरू झालेली पार्टी आता दहा वाजून गेले होते, पण त्या मुलींच्या चेहऱ्यावरचं स्मित किंचितही कमी झालेलं नव्हतं, तत्परता कमी झालेली नव्हती, धावाधाव करून तत्परतेनं त्या पेले भरत होत्या, काठोकाठ.

वाईन संपत नव्हती नि आमच्या गप्पांनाही शेवट नव्हता–काठोकाठ भरलेल्या पेल्यासारख्या त्याही धुंदीत होत्या.

साडेदहाच्या सुमारास नगराध्यक्षांनी सर्वांचा निरोप घेतला. त्यांच्या पाठोपाठ बरेचजण उठू लागले. साडेअकराच्या सुमारास डॉ. शटेट्लर्, डॉ. फ्राऊ सुझानऽ, एर्न्ट, फ्राऊ-श्टाम्बाडर, ऑटो नी मी एवढेच राहिलो होतो. एक(च) पेला संपवून निघू या असं सर्वानुमतानं ठरलं–

गच्चीच्या चारही बाजूंनी फिरून न्युअॅर्न्बेर्क् शहराचं दर्शन घेतलं–रिकामा पेला टेबलावर ठेवला नी आम्ही खाली यायला निघालो.

ग रू डां च्या दे शा त / ५९

# बेर्लीनची भिंत

न्युअॅर्न्बेर्क्च्या धावपट्टीवरून आमच्या पॅन अॅम कंपनीच्या विमानानं उड्डाण केलं नी बघताबघता न्युअॅर्न्बेर्क्मधली लहान होत गेलेली घरं दिसेनाशी झाली. आमचं विमान बेर्लिनला जाणार होतं. बेर्लीन आहे न्युअॅर्न्बेर्क्च्या साधारण ईशान्येला पण आमचं विमान अगोदर गेलं वायव्येला नी मग ईशान्येला !

युरोपात धुमाकूळ घालणारं दुसरं महायुद्ध १९४५ मध्ये संपलं. मध्य युरोपात अभूतपूर्व विध्वंस झाला होता. फॅसिस्ट शक्ती विरुद्ध इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका ह्यांची दोस्ती झाली होती—अर्थात राजकारणाला साजेशीच. युद्धानंतरच्या काही महिन्यात पराजित जर्मनीचे एक-दोन नव्हे तर चार तुकडे करण्यात आले !—ओस्टप्रॉइसेन नी आसपासचा प्रदेश स्टालिननं आपल्या रशियाला जोडून टाकला ! श्लेसिएन प्रांत दोस्तांनी मिळून पोलंडला देऊन टाकला ! उरलेल्या प्रदेशाचे दोन भाग केले—एक म्हणजे पूर्व-जर्मनी आणि दुसरा म्हणजे पश्चिम-जर्मनी.

ह्या साऱ्या विभाजनात खरी अडचण होती ती राजधानीची—बेर्लीनची. जर्मनीच्या राजधानीचं हे शहर. युद्धातल्या शेवटच्या दिवसात रशियाच्या मार्शल झुकोफ्च्या सेनेनं जर्मन सेनेचा पराभव करून शहर काबिज केलं. त्यानंतर अमेरिकेच्या नि इंग्लंडच्या सेनाही तिकडे येऊन पोहोचल्या. शत्रूची राजधानीही ताब्यात आल्यावर दोस्तांनी आपापसात

तिची वाटणी करून टाकली ! बिच्चाऱ्या फ्रान्सची सेना पोहोचायला जरा उशीर झाला—पण त्यांना वाईट वाटू नये म्हणून त्याच्या समंजस दोस्तांनी त्यांनाही एक छोटासा वाटा दिला—म्हणजे जर्मनीच्या राजधानीचे पण चार तुकडे झाले !

पुढच्या काही दिवसातच पूर्व नी पश्चिम भागात आपापली सरकारं आली पण राजधानीचा प्रश्न मात्र साधा, सरळ नव्हता.

आपल्याकडे सामान्यतः असा समज आहे की पूर्व नी पश्चिम जर्मनीची जी सीमारेषा आहे तीवरच बेर्लीन शहर आहे नी त्यामुळे त्या शहराचे दोन भाग झालेले आहेत. पण वस्तुस्थिती तशी नाही. बेर्लीन् हे शहर पूर्वजर्मनीच्या मध्यात आहे. त्याच्या चारही बाजूंना, दूर दूरपर्यंत पूर्व जर्मनी हा देश पसरलेला आहे. पूर्व—पश्चिम जर्मनीच्या सीमेपासून बेर्लीन हे शहर शेकडो किलोमीटर दूर आहे.

ह्या गुंता झालेल्या शहराच्या चार विभागांसाठी चार वेगवेगळी प्रशासनं आली. प्रत्येक प्रशासनाच्या अडचणी वेगळ्या होत्या. प्रत्येक प्रशासन त्यासाठी वेगवेगळे उपाय योजत होतं. नि अगदी अचानकपणे एक दिवस म्हणजे १३ ऑगस्ट १९६१ ला बेर्लीन शहराच्या जवळजवळ मध्यात एक भली मोठी भिंत उभारायला सुरुवात झाली. इंग्लिश, फ्रेंच नि अमेरिकन विभागांना रशियन सेक्टरपासून तोडणारी भिंत पूर्वजर्मनीच्या सरकारनं आपल्या राजधानीत उभारायला सुरुवात केली ! युद्धातून जगल्यावाचल्या व्यक्तीवर पुनः एक प्रचंड आघात—पुनः अनेक कुटुंबं विभागली गेली, माणसं एकमेकांना दुरावली !

राजकारण त्यापलिकडचं असतं !

बेर्लीन् शहराचा रशियन सेक्टर म्हणजे पूर्व बेर्लीन म्हणजे पूर्व जर्मनीची राजधानी—'' हाउप्ट्श्टाट् बेर्लीन्.'' उरलेला भाग म्हणजे पश्चिम—बेर्लीन. चारही बाजूंनी पूर्व जर्मन भूमीनं वेढलेल्या ह्या शहराशी इतर जगाला—विशेषतः पश्चिम युरोपातल्या राष्ट्रांना नि अमेरिकेला संपर्क ठेवता यावा म्हणून पूर्वजर्मन सरकारनं काही भागातून विमानांची जा—ये करायला अनुमती दिलेली आहे. पश्चिम जर्मनी नि पश्चिम बेर्लिन् ह्यांच्या दरम्यान असे तीन कॉरिडॉर आहेत—ह्या हवाई पट्ट्यातून जायला पश्चिम जर्मनीच्या '' लुफ्टहांझा '' कंपनीच्या विमानांना परवानगी नाही. म्हणून आम्ही पॅनअॅमच्या विमानातून बेर्लीनला चाललो होतो.

' एअरबस ' शब्द आता अनेकांच्या परिचयाचा झालेला आहे. पण पॅनअॅमच्या विमानात बसल्यावर मला तर वाटलं की ही ' एअर एस्टीच ' आहे. तीही हायवेवरून जाणारी नव्हे तर कोकणासारख्या मागास भागातल्या कुठल्याशा आडगावी जाणाऱ्या एस्. टी. सारखी ! सीमा ओलांडून आमचं विमान पूर्व जर्मनीच्या सरहद्दीत शिरलं नी मला वाटलं की आता बहुतेक आमचं विमान कोसळणारच ! विमान एकदम खाली आलं. अधूनमधून गपकन खाली जात होतं. जणू एस्.टी.ची बस खड्ड्यातून चालली आहे. भरीस भर म्हणून

विमान डावीकडे आणि उजवीकडेही कलत होतं! शेवटी मी चौकशी केली तेव्हा कळलं की पूर्व जर्मनीतल्या कॉरिडॉरमधून जात असताना कमी उंचीवरून उडावं लागतं. माझ्या जिवात जीव आला नी आता मला त्या हवाई एस्.टी.त खूपच मजा वाटायला लागली.

कमी उंचीवरून उडत असल्यामुळे खालची दृश्यं फारच स्पष्ट दिसत होती. रस्त्यातून चालणारी माणसंसुद्धा साध्या डोळ्यांनी टिपता येत होती आणि मला खूप आवडलेली गोष्ट म्हणजे प्रवासाच्या मार्गाचं धावतं, नव्हे उडतं वर्णन! "आता आपण अमुक प्रदेशा-वरून जात आहोत. डावीकडे अमुक आहे, उजवीकडे तमुक आहे..." अशा वर्णनामुळे मजा येत होती. वैमानिकाचं विशेष उल्लेखनीय कौशल्य म्हणजे डावीकडे काही बघण्यासारखं असलं तर विमान डावीकडे चक्क तिरकं व्हायचं. इतकं की थेट उजवीकडच्या खिडकीत बस-लेल्या प्रवाशालाही डावीकडच्या खिडकीतून खालचा प्रदेश दिसावा!

फिइटेल्गेबिर्गऽ ह्या डोंगराळ प्रदेशावरून उडताना तीव्रतेनं आठवण झाली ती बेर्टोल्ट ब्रेश्ट्च्या "मुटर कुराज्झची" बिचारी आना! बेर्लीनच्या अगदी जवळ आलो असताना पोट्स्डाम्चा भाग खूपच छान वाटला. पण...कॉरिडॉरमधून उड्डाण करताना एकंदरीत जे जाणवलं ते अगदी प्रामाणिकपणे सांगायचं तर फारसं रम्य वाटलं नाही. खूप मोठा सपाट, वैराण प्रदेश, अधूनमधून तुरळक वस्ती, पुनः पुनः असंच. बस्!

एक भारतीय म्हणून मला बेर्लीनच्या विमानतळावर काही तांत्रिक अडचणींना तोंड द्यावं लागलं. त्यातून सुटल्यावर कॉम्प्यूटरच्या अचाट शक्तीचं कौतुक करत करत बाहेर आलो.

वेगवेगळ्या देशात जर्मन शिकवणारे जे शिक्षक आम्ही एका सत्रासाठी न्यूअॅर्न्बेर्क्ला रेजमलो होतो. त्यातले बहुतेक सगळेच आम्ही पुढे बेर्लीनला आलो होतो. आमच्या ह्या गटात मी एकटाच भारतीय, आशियायी होतो. बाकी सर्व युरोपातले नी अमेरिकेतलेच होते. त्यामुळे ते सारे फटाफट पुढं गेले. अर्थात मी येईपर्यंत थांबले होते.

आमची व्यवस्था पाहण्यासाठी फ्राऊ श्टाम्बाउर आमच्याबरोबर आल्या होत्या. थोड्याच वेळात त्यांनी आमच्या हातात एक तिकिट आणून दिलं. हे तिकिट बेर्लीनमधल्या बस आणि भुयारी रेल्वेसाठी चालणारं होतं. म्हणजे आता चार दिवस बसमधून किंवा भुयारी ल्वेतून प्रवास करताना प्रत्येक वेळी तिकीट काढण्याची आवश्यकता नव्हती. आम्ही सारे बसनं बेर्लीन शहराच्या मध्यात आलो. "होटेल बेर्लीन्" ह्या पंचतारांकित हॉटेलात पोहोचलो.

बेर्लीनमध्ये आज चांगलाच उन्हाळा होता. आता खोलीत जाऊन प्रथम अंघोळ करावी असं ठरवतच चौथ्या मजल्यावरच्या माझ्या खोलीत पोहोचलो नि प्रथम स्नान उरकलं. नंतर खोलीच्या सज्जात येऊन उभा राहिलो. कडक उन्हाळा असला तरी सज्जातून जिकडे-तिकडे सुखद हिरवा रंगच दिसत होता. ज्या ज्या बाजूला बघत होतो त्या त्या

बाजूला गच्च हिरवीगार झाडीच दिसत होती.

त्या गर्द हिरव्या झाडीकडे बघत असताना मला सहजच एक कविता आठवली. बेर्टोल्ट् ब्रेश्ट्ची "डी पापेल फोम् कार्लस्प्लाट्ट्स्–कार्ल चौकातला पापेल वृक्ष" (Die Pappel vom Karlsplatz). १९४५ च्या मे महिन्यात दुसरं महायुद्ध संपलं. युद्धाचा शेवटचा टप्पा वगळता जर्मनीची परिस्थिती एकंदरीत बरी होती. कारण पराभूत राष्ट्रांच्या धन-धान्याची लूट जर्मनीत येत होती! पण युद्ध संपल्यावर मात्र परिस्थिती बदलली नि जर्मनांचे हाल सुरू झाले. हिवाळा म्हणजे तर संकटच. पोटात ढकलायला अन्नाचा गोळा दुर्मिळ झाला होता. शरीराला बाहेरून ऊब मिळावी म्हणून मिळेल ते लाकूड जाळून लोक शेकोटचा पेटवत होते. पुढे तीही संपली नी मग पाळी आली झाडांवर!

"उध्वस्त झालेल्या कार्ल चौकात एक पापेलवृक्ष मात्र जिवंत होता. त्याची हिरवी पालवी बघून प्रत्येकाला बरं वाटत असे. त्याच्या हिरव्या पालवीत लोक नवजीवनाची स्वप्नं पाहत होते. पुढे कडक हिवाळ्यात लोकांना लाकडाची चणचण भासू लागली. अनेक वृक्षांची शंभरी भरली! पण कार्ल चौकातल्या रहिवाश्यांनी नवजीवनाचं चिन्ह असलेल्या आपल्या पापेलवृक्षाचं मात्र प्राणपणानं जतन केलं. आजही तो पापेल वृक्ष डौलानं उभा आहे."

कपडे करून तळमजल्यावरच्या एका प्रशस्त दिवाणखान्यात आलो. बेर्लीन शहरात काय बघावं, कसं बघावं ह्याबद्दल एक भाषण खास आमच्यासाठी आयोजित केलेलं होतं.

अतिप्राचीन काळापासून बेर्लीन शहराचा इतिहास, भूगोल ह्याबद्दल भाषण चालू होतं. भाषण ऐकताना हळूहळू मी अस्वस्थ होत होतो. संध्याकाळ होत होती नि खुद्द बेर्लीनमध्ये येऊनही हॉटेलात बसून त्या नगरीची माहिती ऐकत बसण्यापेक्षा प्रत्यक्ष नगरीत फेरफटका मारून यायला मी अतीव उत्सुक झालो होतो. शेवटी संपलं एकदाचं भाषण.

मी दाराबाहेर पडत असताना माझ्याप्रमाणेच चपळाईनं बाहेर पडणाऱ्या ऑटो ह्या अमेरिकेतल्या पन्नाशीच्या गृहस्थांना मी म्हटलं,

"तुमचा काय कार्यक्रम आता?"

"मी एक चक्कर मारणार आहे आता. तुम्ही काय करणार?" ऑटोनं विचारलं.

"मला पण गावातून चक्कर मारायची आहे..."

"शॉपिंगसाठी?"

"मुळीच नाही! सर्वप्रथम म्हणजे मला ती भिंत बघायची आहे. बेर्लीनचा विभागणारी भिंत..."

"फांटास्टिश!!! चला तर मग! मी पण त्या बाजूलाच जाणार आहे." ऑटो म्हणाला.

"तुम्हाला माहिती आहे, रस्त्यांची?"

"होऽ!" ऑटो मिस्किलपणे हसत हसत म्हणाला, "मागच्या वर्षी ह्याच दिवसात मी इथे होतो, महिनाभर."

"अच्छा!!!" मी अत्यंत आश्चर्यानं त्या अमेरिकन माणसाकडे पाहत होतो. तसे आम्ही गेले तीन आठवडे न्यूअॅर्न्बेर्क्मध्ये बरोबर होतो. इतर अमेरिकन मंडळींबरोबर तें खास अमेरिकन अॅक्सेंटमध्ये इंग्लिश बोलत असत. पण आमचा तसा फारसा परिचय झाला नव्हता.

"मागच्या वर्षी तुम्ही कोणत्या संदर्भात आला होतात इथे?" माझं औत्सुक्य.

"नातेवाईकांना भेटायला!"

"तुमचे नातेवाईक आहेत इथे?"

"हो!"

एव्हाना आम्ही लिफ्टपर्यंत आलो होतो.

"आपण असं करू या, ह्या फाईली वगैरे वरती ठेवून मग लगेचच निघूया चक्कर मारायला, ओ के?"

"ठीक आहे." मी म्हटलं नि आम्ही चौथ्या मजल्यावर गेलो.

पाचच मिनिटात पुनः खाली आलो नि दोघं चक्कर मारायला बाहेर पडलो.

अगोदरच्या संभाषणाचा धागा पकडून मी विचारलं,

"तुमचे नातेवाईक इथे आहेत, म्हणजे तुम्ही मूळचे जर्मन का?" त्याच्याकडे पाहत मी विचारलं

"हो," आपल्या फिक्कट निळ्या डोळ्यांनी हेर ऑटो माझ्याकडे टक लावून पाहत होते. जर्मन म्हटल्यावर इतर युरोपियनांना जे क्रौर्य जाणवतं, ज्या भयानक परिस्थितीची आठवण होते, त्यातलं काहीसुद्धा मला जाणवलं नाही. किंबहुना अत्यंत साधे निष्पाप डोळे वाटत होते. ह्या माणसानं फार सोसलं असावं असं मला त्या डोळ्यातून, नजरेतून जाणवलं.

"तुम्ही मूळचे कुठल्या भागातले? प्रॉइसेन पोमेर्न?"

"हो!" आश्चर्यचकित होऊन ऑटो माझ्याकडे रोखून पाहत होता, "असं का वाटलं तुम्हाला?"

"अंऽ तसं नाही सांगता येणार मला. पण जर्मन भाषिक प्रदेशांबद्दल, तिथल्या लोकांबद्दल मी जे काय वाचलं, ऐकलं त्यावरून आपलं वाटलं की तुम्ही पूर्व भागातले–प्राइसेन किंवा पोमेर्न भागातले असणार!"

"लहानपणी आम्ही श्टेटिन्ला राहत होतो–"

"अच्छा! युद्ध सुरू झालं तेव्हा कुठे होतात तुम्ही?"

"तिथेच–श्टेटिन्लाच. अर्थात् युद्ध सुरू झाल्याचं मला साधारणच आठवतंय, तेव्हा मी

आठ-नऊ वर्षांचाच होतो...आमचे वडील युद्धात मारले गेले पण आम्हाला युद्ध खऱ्या अर्थानं जाणवलं, ते शेवटच्या टप्प्यातच...पराभव सुरू झाल्यावर..."

सुमारे चाळीस वर्षांपूर्वीच्या आठवणींनी-ऑटो एकाएकी अस्वस्थ झाला.

"आख्ख्या पूर्व युरोपातून जर्मनांची हकालपट्टी सुरू झाली होती. जिथे जर्मनांनी वसाहती केल्या, राज्यं केली, शाळा काढल्या, विद्यापीठं स्थापिली, तिथून त्यांची हकालपट्टी होत होती-"

"हं !"

"निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे येत होते नि हळूहळू पश्चिमेकडे सरकत होते. आम्ही आपले श्टेटिन्मध्ये दिवस ढकलत होतो नि तेवढ्यात रशियन फौजा येत असल्याचं कळल नी नाइलाजानं आम्ही आमचं श्टेटिन् सोडले-"

मी ऑटोकडे बघितलं.

"वाटेत आमची आई गेली..."

ऐकूनही मी अतिशय अस्वस्थ झालो.

"मी आणि माझा धाकटा भाऊ-तो तर नऊ दहा वर्षांचाच होता. आम्ही आपले चालत होतो. कधीतरी एखाद्या घोडागाडीत जरा वेळ बसायला मिळायचं. कधी कुठे एखादा तुकडा मिळाला तर खायचा. भणंग भिकारीच बनलो होतो आम्ही ! बहुतेक साऱ्या निर्वासितांची परिस्थिती आमच्यासारखीच होती..."

"मग कुठे गेलात तुम्ही ?" प्रत्येक हकीगत ऐकताना दुःख होत होतं, पण सारं जाणून घ्यायचं होतं; त्याशिवाय चैन पडलं नसतं ! किती चित्रविचित्र जिज्ञासा असतात आपल्या !

"आम्ही बेर्लीनच्या जवळ पोहोचलो तेव्हा कळलं की बेर्लीन अगोदरच पडलं होतं..."

"अरेरे !"

"संध्याकाळच्या वेळी आम्ही एकाच्या घरापाशी पोहोचलो. खूप दमलो होतो, भुकेनं कासावीस झालो होतो. त्या माणसाला आमची दया आली. त्यानं आम्हाला घरात घेतलं. त्याच्याकडे जे थोडंसं होतं, त्यातलाच अर्धा घास आम्हाला दिला !..."

मी अवाक् झालो होतो. दोघा भावांना आसरा मिळाला हे ऐकूनसुद्धा मी सुटकेचा निःश्वास टाकला होता. खरंच, त्या दोघा भावांना काय वाटलं असेल तेव्हा !

"आम्ही त्यांना सांगितलं की आमचे काका बेर्लीनमध्ये राहतात, नंतर आम्ही त्यांच्याकडे जाऊ. तेव्हा तो म्हणाला की 'तुमचे काका सापडले की तुम्ही त्यांच्याकडे जरूर जा पण ते सापडेपर्यंत इथेच रहा ! जे मिळेल ते आपण मिळून खाऊया !...' आम्हाला काकांचा पत्ता ठाऊक होता पण इथे तर बेर्लीनचाच पत्ता हरवला होता ! ते पहा !"

समोरच्या एका पडझड झालेल्या उंच इमारतीकडे बोट दाखवीत ऑटो म्हणाला-एव्हाना आम्ही चालत चालत गेडेश्ट्निस् किर्शऽ पर्यंत आलो होतो.

महायुद्धाच्या शेवटच्या दिवसात बेर्लीन शहरावर अक्षरशः चोवीस तास बॉम्ब वर्षाव होत होता. इथली एकही इमारत धडपणे उभी नव्हती. आज सारं बेर्लीन शहर नवं कोरं आहे पण त्या भयानक काळाची स्मृती म्हणून बॉम्बहल्ल्यात उध्वस्त झालेलं शहराच्या मध्यातलं हे चर्च मात्र त्याच पडक्या अवस्थेत जतन केलं आहे ! त्या भयानक काळाची स्मृती म्हणून. तशी परिस्थिती जर्मनीवरच नव्हे तर जगात कुठेही येऊ नये हे अखिल मानवजातीला कळावं म्हणून जपलेली जखम !

" ...साऱ्या शहराची अवस्था ह्या चर्चसारखीच झालेली होती. पडकी घरं, दगड-विटांचे ढिगारे, मनं उद्ध्वस्त झालेली माणसं–"

" मग काका सापडले तुमचे ?"

" आम्ही रोज पायपीट करत होतो, शोध घेत होतो नी शेवटी एकदाचे सापडले काका आमचे–"

" वा ऽ !" काका सापडल्याचा आनंद मलासुद्धा झाला होता नी अगदी नकळत माझ्या तोंडून तो व्यक्त झाला, " कधी सापडले ?"

" जवळ जवळ चार महिन्यांनंतर !"

" बापरे !"

" बरं आपण कुणीकडे जाऊया ?" ऑटोनं विचारलं

" मला ती भिंत बघायची आहे !"

" बरं, आपण जरा शॉर्टकटनं जाऊया !" ऑटो म्हणाला.

आम्ही शॉर्टकटनं निघालो, थोड्याच वेळात अक्षरशः गर्द झाडीत शिरलो ! पाच-दहा मिनिटांपूर्वी आपण बेर्लीनसारख्या महानगरीच्या अत्यंत गजबजलेल्या रस्त्यावरून चालत होतो हे खरंही वाटेना !

" हं, मग काका सापडल्यावर तुम्ही त्यांच्याकडे राहायला गेला असाल ना ?" लहान मुलाप्रमाणे गोष्टीचं सूत्र पकडून मी ऑटोला पुढचा भाग सांगण्याची घाई करत होतो.

" हं, मग आम्ही काकांकडे आलो. अगदीच पोरके झालो होतो आम्ही. काका मिळाल्या-मुळे आमचं दुःख जरा हलकं झालं होतं पण देशावर आलेल्या संकटांमुळे सारेच भरडले जात होते. पुढची चार-पाच वर्षं फार कष्टात गेली. नंतर मी नी भाऊ अमेरिकेत गेलो–" किंचित थांबून एकदम वेगळ्या पद्धतीनं ऑटो म्हणाला – " पण बेर्लीन म्हणजे एकदम फॅन्टॅस्टिक हं !!!"

एवढ्यात त्या वनातल्या वळणदार रस्त्यावरून आम्ही पुढे आलो नी अगदी समोरच एक अती उत्तुंग मनोरा दृष्टीस पडला नी त्याच ऑटोच्या तोंडून बेर्लीनबद्दलचे प्रेमळ उद्गार बाहेर पडले होते– " बेर्लीन् इस्ट् फॉन्टास्टिग् !"

त्या उत्तुंग मनोऱ्यावर पंख पसरून उडण्याच्या पवित्र्यात असलेला विशाल, रुबाबदार

गरुडपक्षी ! कशाचं प्रतिक असेल हा ? मी विचार करू लागलो–जर्मन राष्ट्राचं ?

तिथून आणखी पुढे आल्यावर एकदम परिचित अशी भव्य वास्तू दिसली. ब्रान्डेन्बुर्गर टोर– ब्रान्डेन्बुर्गची वेस !

अभिजात–क्लासिक पद्धतीची ही वास्तू. ग्रीसमधल्या प्राचीन मंदिरांच्या दर्शनी भागा-प्रमाणे ह्याची रचना असते. खूप दूरवरून दिसलेल्या ह्या वेशीकडे आम्ही झपाझप चालत होतो. त्या अतिशय रुंद, सुंदर रस्त्यावर वाहतूक अजिबात नव्हती ! आता समोर भिंतपण दिसू लागली होती.

१३ ऑगस्ट १९६१ ला जी भिंत बांधली गेली, तिच्यामुळे ब्रान्डेन्बुर्गची वेस भिंतीच्या पूर्वेला राहिली, पूर्व बेर्लीनमध्ये गेली. त्यामुळे थेट त्या वेशीपर्यंत जाण्याचं भाग्य आम्हाला लाभणार नव्हतं. भिंतीमुळे रस्ताच बंद झालेला होता. त्यामुळेच तिथे रस्त्यावर वाहतूक नव्हती.

डोळे भरून मी ती ब्रान्डेन्बुर्गची वेस पाहत होतो.

" चल, आता तिकडे पुढे जाऊया. तिथून आपल्याला भिंतीपलिकडच्या शहरात किंचित डोकावतापण येईल." ऑटो म्हणाला, आम्ही पुढे निघालो.

काही मिनिटातच आम्ही सीमेवरच्या अशा एका ठिकाणी येऊन पोहोचलो की, जिथून आम्हाला भिंत तर व्यवस्थित दिसत होतीच, पण भिंतीला लागून उंचावर एक चौथरा बांधला होता, त्यावरून पलीकडचं शहर न्याहाळायचीही सोय होती. वर जायला पक्की शिडी बांधलेली होती.

भिंतीवर ठिकठिकाणी महासत्तांच्या विरुद्धच्या मुख्यतः रशियाविरुद्धच्या घोषणा लिहि-लेल्या होत्या. गावाला विभागणारी, कुटुंबांना, माणसांना माणसांपासून तोडणारी ही भिंत नष्ट केली जावी म्हणून वेगवेगळ्या मागण्या त्यावर चितारल्या होत्या, व्यंगचित्रं रेखा-टली होती.

भारताच्या पूर्वेला आणि पश्चिमेला असलेल्या सीमाही अशाच खोटया आहेत, कृत्रिम आहेत, कोणीतरी लादलेल्या आहेत ! मोठं दुःखद दृश्य असतं अशा कृत्रिम सीमांचं...का ही ताटातूट ?

शिडीवरून चढून जाऊन आम्ही वरच्या चौथऱ्यावर जाऊन उभे राहिलो. बेर्लीनच्या पूर्व भागात सर्वत्र सामसूम दिसत होतो. घडीव दगडांच्या अतिभव्य, सुंदर, रेखीव इमारती दूरदूरपर्यंत दिसत होत्या, पण उजाड नि उदास वाटत होत्या. प्रचंड इमारतींचं आखीव-रेखीव शहर जिवंत माणसांच्या साहचर्याच्या अभावी भकास वाटत होतं.

भिंतीपलीकडच्या बेर्लीनकडे मी एकटक पाहत होतो, ऑटोचीही तंद्री लागली होती. सारा इतिहास जणू त्याच्यापुढे जिवंत होऊन दिसत असावा. तिथल्या राजकारणाशी माझा काडीचा संबंध नव्हता, तरीही मी अतिशय व्यथित झालो होतो.

सूर्यास्त नुकताच झाला होता. पूर्व बेर्लीनमधल्या मोठमोठ्या दगडी इमारती आता अधिकच काळवंडल्यासारख्या वाटत होत्या. तिकडच्या रस्त्यांवर आता तुरळक दिवे लागत होते.

शिडीवरून खाली येऊन आम्ही बेर्लीनच्या पश्चिम भागाकडे निघालो. तिकडे सर्वत्र दिव्यांचा झगमगाट होता.

# भिंतीच्या पलिकडले

युरोपातल्या उन्हाळयातले दिवस भलतेच फसवे. केव्हाच उजाडतं ! सूर्य चांगला वर आलेला असतो नि आपल्याकडच्या सरावामुळे वाटत राहतं की, आपलं घडयाळ मागं पडलं आहे. उठून सारं आवरलं तरीसुद्धा सहा वाजलेले नव्हते. सात वाजल्याशिवाय ब्रेकफास्ट मिळणार नव्हता. भिंतीच्या पलिकडच्या राजधानीच्या शहरात जायला मी अधीर झालो होतो. (पश्चिम बेर्लीन हे नुसतं शहर आहे, पण पूर्व बेर्लीन ही पूर्व जर्मनीची राजधानी आहे. साधंसुधं शहर नाही ! म्हणूनच पूर्वेकडचे लोक बेर्लीनचा उल्लेख करताना "हाउप्ट्-श्टाट् बेर्लीन" असा करतात.)

ब्रेकफास्टच्या वेळेलाच ब्रेकफास्ट मिळाला. हळुहळू सारे तयार झाले नी ठरलेल्या वेळी आम्ही हॉटेल बेर्लीनमधून निघालो. जवळच्याच भुयारी रेल्वेच्या स्थानकावर जाऊन पूर्व बेर्लीनला जाणारी गाडी पकडली नी काही मिनिटातच पूर्व बेर्लीनमध्ये येऊन पोहोचलो.

गाडीतून बाहेर पडलेले असंख्य प्रवासी रांगा करून उभे होते. आम्हीही त्या लांबलचक रांगेच्या टोकाला जाऊन उभे राहिलो. तिथे आम्हाला एक फॉर्म मिळाला, आमच्याजवळ असलेल्या सर्व प्रकारच्या पैशांचा हिशेब त्यावर लिहायचा होता. मी माझं पाकिट काढलं नि विलक्षण गोंधळून गेलो ! वैतागलो, स्वतःवरच चिडलो. कारण माझ्या पाकिटात डॉइच्ऽ मार्क होते, युरोपातल्या लोकांना दाखवता यावीत म्हणून बरोबर घेतलेली भारता-

तली सर्व प्रकारची नाणी नि नोटा त्यातच होत्या. मुंबईहून निघताना घेतलेले डॉलरचे चेकही त्यातच ! पूर्व जर्मनीतले अधिकारी विलक्षण कडक, त्रासदायकच ह्याची कल्पना श्टाम्बाडर बाईंनी आम्हाला अगोदरच देऊन ठेवलेली होती. त्यामुळे मी जाम वैतागलो होतो. शेवटी एका रिकाम्या टेबलापाशी गेलो. माझं पाकिट उलटं केलं नि डॉलर, डॉइचऽ मार्क, रुपये अशा साऱ्या रकमांचे हिशेब त्या फॉर्मवर लिहून काढले. तोपर्यंत बाकीचे सारे पुढे सटकले होते. आमच्या व्यवस्थापकबाई फ्राऊ श्टाम्बाडर मात्र माझ्यासाठी थांबल्या होत्या. फॉर्म भरून झाल्यावर त्या म्हणाल्या–

" तुम्ही बेर्लीनला पहिल्यांदाच आलात का ?"

" बेर्लीनला ? युरोपातच पहिल्यांदा आलोय मी !" मी किंचितश्या वैतागानं म्हटलं.

" मीच खरं म्हणजे तुम्हाला काल सांगायला हवं होतं की, फक्त वीस-पंचवीस मार्क घेऊनच चला म्हणून !" श्टाम्बाडरबाई दिलगिरीच्या सुरात म्हणाल्या. मला माझ्या उद्गारांबद्दल वाईट वाटलं. मग बोलण्याच्या ओघात कळलं की, माझ्याखेरीज बाकीचे जे युरोप-अमेरिकेतले जर्मन भाषेचे शिक्षक होते, ते सारेजण ह्यापूर्वी किमान एकदा तरी जर्मनीत येऊन गेलेले होते नी पूर्व बेर्लीनलाही भेट देऊन आलेले होते !

" हेर बिनीवालऽ, इतकी वर्षं तुम्ही जर्मन शिकवता, मग तुमच्या कॉलेजनं तुम्हाला एकदाही जर्मनीला पाठवलं नाही !" श्टाम्बाडरबाई मला आश्चर्यानं विचारत होत्या. त्यांच्या ह्या प्रश्नाला माझ्याजवळ उत्तर नव्हतं.

पैशाच्या डिक्लरेशन फॉर्मवर शिक्का मिळवून पुढे गेल्यावर व्हिसा. रात्री १२ वाजेपर्यंत पूर्व बेर्लीनमध्ये राहण्याचा व्हिसा मिळाला. व्हिसा देताना पासपोर्ट इतक्यांदा उलटे-पालटे करून बघितले जात होते की, ते बघणारासुद्धा चक्रावून जावा ! नंतरच्या काळात युरोपातले जवळजवळ सर्व देश पालथे घातले, पण असला विक्षिप्तपणा कुठेही बघितला नाही ! हिथ्रो विमानतळावर ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जी सभ्यता दाखवली, त्यांचा जो सुसंस्कृतपणा जाणवला तो तर विशेष उल्लेखनीय होता. पश्चिम जर्मनीच्या नागरिकांवर तर पूर्व जर्मनीच्या अधिकाऱ्यांची विशष करडी नजर होती. पासपोर्टवरचा फोटो बघून त्यातलीच व्यक्ति समोर उभी आहे की, नाही, हे बघण्यासाठी प्रत्येकाला एकदा डावीकडे वळायला सांगत, एकदा उजवीकडे. समोरून, दोन्ही बाजूंनी; असं त्यांचं कडक निरीक्षण झाल्यावरच त्याला पुढे जाऊ दिलं जात असे.

व्हिसा झाल्यावर एक्स्चेंज. पूर्व बेर्लीनमध्ये जाणाऱ्या टूरिस्टनं पंधरा डॉइचऽ मार्क देऊन पूर्व जर्मनीचे पंधरा मार्क घेतलेच पाहिजेत आणि खर्च केले पाहिजेत हा दंडक ! संध्याकाळी परत जायच्या वेळी काही मार्क उरले तर बदलून त्याचे पुन्हा डॉइचऽ मार्क किंवा डॉलर मिळत नाहीत.

ह्या साऱ्या सव्यापसव्यातून बाहेर पडपर्यंत मी पुरा त्रासलो होतो. आपण भारतीय किती सुखी ! गेली अनेक वर्षं आसेतुहिमाचल प्रचंड भ्रमंती केली, पण आजपर्यंत मला

कोणी हटकलेलं नाही. माझं नाव अविनाश बिनीवाले, हे सिद्ध करण्यासाठी कागदपत्रं दाखवण्याची वेळ आजपर्यंत तरी आलेली नाही. इथे मात्र प्रत्येक गोष्ट कागदपत्रांच्या आधारानंच सिद्ध करावी लागते. बेर्टोल्ट ब्रेश्टच्या " मुटर कुराज्झऽ " ह्या नाटकातल्या पहिल्या प्रवेशात एक प्रसंग आहे. नाटकाच्या नायिकेचा– आनाचा– प्रवेश होतो नी एक अधिकारी तिच्याकडे कागदपत्रांची– डॉक्युमेंटस्‌ची– मागणी करतो. मी ह्या नाटकाचं भाषांतर केलं. (" माता धीराई " ह्या नावानं ते कॉन्टिनेन्टल प्रकाशननं प्रसिद्धही केलं,) परंतु जर्मनांच्या जीवनात कागदपत्रांचं काय महत्त्व आहे, हे खऱ्या अर्थानं मला जर्मनीला गेल्यावरच कळलं !

" वैतागलात का ?" माझ्या चेहऱ्याकडे पाहत श्टाम्बाडरबाईंनी स्मित करत विचारलं.

" नाही तर काय ! जाम वैतागलोय !" मी.

" विसरून जा सारं. अहो आता तर खूप सोपं झालं आहे ! पूर्वीतर असा वैताग यायचा की नको ते बेर्लीन असं वाटायचं..."

स्टेशनातून बाहेर पडून आम्ही मुख्य रस्त्याला लागलो होतो. आमच्यातल्या चार-पाच मंडळींनी आमचा निरोप घेतला.

" हे काय ! ही मंडळी कुणीकडे गेली ?" मी आश्चर्यानं नि कुतूहलानं विचारलं.

" ते सगळे त्यांच्या नातेवाईकांना भेटायला चालले आहेत. त्यांना इथली स्मारकं वगैरे बघण्यात तसं औत्सुक्यच नाही." श्टाम्बाडरबाई म्हणाल्या.

" अस्सं !"

" सो..." माझ्याकडे बघत आटो म्हणाला, " मी पण निघतो. मी संध्याकाळी परस्पर हॉटेलवरच येईन, फ्राऊ श्टाम्बाडर !" असं म्हणून ऑटोनं आमचा निरोप घेतला.

" तुम्ही तुमच्या काकांना भेटायला चाललात ?" मी ऑटोला विचारलं.

" अं...नाही, म्हणजे– आमचे काका आता नाहीत. मागच्या वर्षीच गेले ते..."

" अरेरे !"

"...पण त्या भागात आमचे काही जुने मित्र आहेत, त्यांना भेटून येतो." ऑटो निघाला नि बघता बघता दिसेनासा झाला.

" उन्टेर डेन् लिंडेन् " ह्या प्रसिद्ध रस्त्यावर आम्ही उभे होतो. उजव्या हाताला ब्रांडेन्-बुर्गची वेस तिच्या भव्यतेमुळे दृष्टीस पडत होती. दोन दिवसांपूर्वी तिची पश्चिम बाजू बघितली होती. आज तिची पूर्वेकडची बाजू बघायला मिळणार होती.

" आपण ब्रांडेन्बुर्गर वेशीकडे जाऊया का ?" मी मोठ्या उत्साहानं श्टाम्बाडरबाइंना विचारलं. इतर मंडळींच्या चेहऱ्यावर उत्साह दिसत नव्हता. त्यामुळे श्टाम्बाडरबाई म्हणाल्या,

" आपण असं करूया का ?"



७०३
२५६३८
कल्याण

"कसं?" मी.

"आम्ही पुढे होतो. कार्ल मार्क्स चौकाच्या दिशेनं जायला लागतो...तिथली घड्याळं माहीत आहेत तुम्हाला?"

"हो! फोटोत पाहिली आहेत. येईल लक्षात." जगातल्या सर्व प्रमुख देशांच्या वेळा दर्शवणारी घड्याळं एका मनोऱ्याभोवती ओळीनं लावलेली आहेत असा फोटोत बघितलेला टॉवर मला आठवला.

तिथे आपण बारा वाजता भेटू या, आम्ही येतोच तिथे, चालेल?" श्टाम्बाडर.

"ठीक आहे, येतो मी तिथे."

फ्राऊ श्टाम्बाडर आणि इतर मंडळी मधल्या एका रस्त्यावर वळली, मी ब्रान्डेन्बुर्गर वेशीकडे निघालो.

१७८८ ते ९१ ह्या काळात शोभेसाठी बांधलेली ही ब्रान्डेन्बुर्गर वेस आज मात्र दुर्दैवानं सरहद्द बनली आहे—तीही बंद सरहद्द! पूर्व जर्मनीतून असंतुष्ट मंडळी—मुख्यत: तरुण—तरुणी—पूर्व बेर्लीनमध्ये येत असत. पूर्व बेर्लीनमधून सहजपणे पश्चिम बेर्लीनमध्ये निघून जायचं आणि तिथून रीतसरपणे निर्वासित म्हणून पश्चिम जर्मनीत किंवा अमेरिकेत निसटून जायचं! वर्षानुवर्षं चाललेली ही गळती—श्रम करू शकणाऱ्या तरुण पिढीची गळती—थोपविण्यासाठी ह्या सरहद्दीवर भिंत बांधली गेली.

अशा महत्त्वाच्या सीमाप्रदेशातून नुसती भिंत बांधली म्हणजे काम झालं असं नव्हे. तिच्यावर कडक पहारा असावा लागतो...कृत्रिम सीमांची दु:खं वेगळीच असतात! गेल्या अनेक वर्षांत आक्रमकांनी भारताचे अनेक तुकडे केले. १९४७ च्या विभाजनानंतर भारताचे दोन्ही बाहूच जणू लुळे करून टाकले! त्या जखमा अजूनही वाहत्याच आहेत...आमच्यावर लादलेल्या कृत्रिम सीमांच्या समस्या आम्हाला कधी जाणवल्याच नाहीत, दुर्दैवानं, उलट ज्या असमियांना त्या जाणवल्या त्यांच्याचकडे आम्ही पद्धतशीर दुर्लक्ष केलं!... आपल्या देशाच्या कृत्रिम सीमांवरच्या प्रदेशात खूप भटकलो, स्वैर. प्रत्येक वेळी तीव्रतेनं जाणवलं ते हेच की आपल्या आजच्या अनंत समस्यांचं मूळ ह्या कृत्रिम सीमांमध्येच आहे...ह्या समस्या आम्ही कधी संपवणार की नाही?

वेशीकडे जाणाऱ्या रस्त्यावर कडक पहारा होता. अक्षरश: दर दहाबारा फुटांवर रायफलधारी रक्षक उभे होते. आता ह्या रस्त्यावर गर्दी होती ती माझ्यासारख्या हौशी प्रवाशांचीच. स्थानिक लोकांना ह्या भागात फिरकायलाही बंदी असल्याचं नंतर कळलं. करड्या नजरांचे शेकडो शिपाई जणू आपल्यावर पाळत ठेवून आहेत असं वाटत होतं—मी अस्वस्थ झालो होतो.

बघता-बघता मी वेशीच्या जवळ-जवळ जात होतो. वेशीपासून पन्नास-एक मीटरवर शस्त्रसज्ज रक्षकांची जणू भिंतच उभी होती! वेशीत बरेच जिज्ञासू दिसत होते. मलाही

अगदी जवळ जाऊन ती ऐतिहासिक वेस बघायची होती, तिच्यावरची शिल्पकला न्याहाळायची होती, तिच्या मध्यावरच्या प्रवेशद्वारात काही काळ उभं राहून इतिहासात डोकावून बघायचं होतं...चित्रातून बघितलेली मोठ-मोठी संचलनं मनानं का होईना; अनुभवायची होती.

वेशीकडे जाणाऱ्या मंडळींच्या रांगेत जाऊन मी उभा राहिलो. हळू-हळू माझा क्रमांक आला.

" डॉक्युमेंट ?" करड्या नजरेनं माझ्याकडे रोखून बघत त्या शस्त्रधारी शिपायानं मला विचारलं.

त्याच्या डोळ्याला डोळा देत मी माझ्या खिशातून पासपोर्ट नि व्हिसा काढून त्याच्यासमोर धरला.

" ह्याचा काही उपयोग नाही !" कागदपत्रं माझ्याकडे परत देत तो म्हणाला, " ह्याची कागदपत्रं वेगळी असतात."

" कुठे मिळतात ती ?"

" माहीत नाही !" तो बेफिकिरीनं म्हणाला.

" मी भारतातून आलोय..." मी काही सांगण्याचा प्रयत्न करत होतो, पण माझ्याकड पूर्ण दुर्लक्ष करून तो रांगेतल्या मागच्या लोकांना त्याच्या खास अनुमतीचे कागद बघून आत सोडत होता.

खूप निराश होऊन मी पुनः रक्षकांच्या भिंतीपाशी येऊन वेशीकडे पाहत पाहत पीछेमुड करून निघालो. आता मला गाठायचा होता तो कार्ल मार्क्स चौक !

प्रशस्त रस्त्याच्या दोन्ही बाजूंना बसण्यासाठी बाक ठेवलेले होते पण त्यावर फारसं कुणी बसलेलं दिसत नव्हतं. एका बाकड्यावर एक म्हातारा गृहस्थ ऊन खात बसला होता. म्हाताऱ्या व्यक्तींना पश्चिम जगतात " सिनियर सिटिझन " म्हणतात. त्याच्याकडे पाहत, स्मित करत मी बाकड्यावर त्याच्या शेजारी टेकलो. त्यानंही स्मित केलं. रिकाम्या बाकावर बसून मला विश्रांती घ्यायचीच नव्हती तर कोणाशी तरी बोलायची, गप्पा मारायची इच्छा होती म्हणून तर मी त्या वृद्ध गृहस्थांशेजारी बसलो होतो.

" कुणीकडून आलात तुम्ही ?" मी विचारलं.

" कुणीकडूनच नाही !" म्हातारा दिलखुलासपणे हसत म्हणाला, " मी इथलाच !"

" अस्सं !" ते खुद्द बेर्लीनमधलेच आहेत हे ऐकून मला खूप आनंद झाला. ते सिनियर सिटिझन असल्यामुळे त्यांच्याशी गप्पा मारण्यात अडचणही येणार नव्हती.

पहिल्या दिवशी आमच्यासाठी हॉटेलवर जे भाषण आयोजित केलेलं होतं त्यात त्यांनी आम्हाला सांगितलेलं होतं की पूर्व बेर्लीनमधल्या लोकांशी फार बोलण्याचा प्रयत्न करू नका नि राजकारणावरची चर्चा तर मुळीच करू नका इत्यादि. त्याचं कारण असं की

तिथला कोण खबऱ्या आहे हे आपल्याला कळणार नाही, त्यामुळ आपण अडचणीत येण्याची शक्यता खूप. आपण ज्याच्याशी चर्चा करू तो जर साधा, सरळ सज्जन माणूस असेल तर त्याच्यावर एखाद्या खबऱ्याची नजर असणार नि नंतर त्या गरीब बिचाऱ्या सज्जन माणसाला त्रास व्हायचा ! मात्र सिनियर सिटिझन्सकडे इथले पोलीस किंवा खबरे फारसं लक्ष देत नाहीत—ज्या उद्देशानं मी त्या गृहस्थांच्या शेजारी बसलो होतो तो हेतू सफल होण्याची लक्षणं दिसत होती.

त्या गृहस्थांनी तुम्ही कुठून आलात, काय करता, वगरे चौकशा माझ्याकडे केल्या. त्यांनाही बहुतेक निवांतपणे बोलणारं माणूस बऱ्याच वेळात, दिवसात भेटलेलं नसावं !

" कसं वाटतं तुम्हाला इथे ?—म्हणजे मला म्हणायचं आहे की ही भिंत बांधल्या-नंतर ?" माझं औत्सुक्य बोलून दाखवून मी त्यांना बोलायला उद्युक्त करायचा प्रयत्न करत होतो.

" छान वाटतं की !" ते तात्काळ म्हणाले, " पहिल्या-पहिल्यांदा जरा अडकून पडल्या-सारखं वाटायचं पण आता सवय झाली."

" इथे आसपास हे सगळे सैनिक, गार्ड, भिंत...ह्या सगळ्यांच्या गराड्यात, विलक्षण तणावात राहण्यापेक्षा एखाद्या छोट्याशा गावात जाऊन शांतपणानं रहावं, असं नाही वाटत तुम्हाला ?" माझी आगाऊ जिज्ञासा.

" ने ने ने !" म्हाताऱ्यानं मोठ्या तत्परतेनं त्रिवार नकार दर्शवला, " बर्लीन सोडून जायचं ? शक्य नाही ! अरे बाबा, काय सांगू तुला—बेर्लीन हा तर जगाचा मध्य आहे मध्य !"

" काय ?" विलक्षण आश्चर्यामुळे आवाज किंचित चढवतच मी पुनः म्हटलं, " काय म्हणालात तुम्ही ?"

" तुमचा कदाचित विश्वास नाही बसणार माझ्यावर, पण बेर्लीन हा खरोखरच जगाचा मध्य आहे..." म्हातारा गंभीर होऊन बोलत होता, " बेर्लीनवर ज्याची सत्ता असते तोच ह्या जगात शक्तीशाली ठरतो, जगावर सत्ता गाजवतो..."

" मग आत्ता जगावर कोणाची सत्ता आहे बरं ?" म्हाताऱ्याला मध्येच टोकत मी विचारलं.

" एस् इस्ट् गान्त्स क्लार ! उघडच आहे की ते !" मिश्किलपण हसत म्हातारा उद्गारला.

" म्हणजे ?" त्यांच्याकडे रोखून पाहत मी विचारलं.

" रशियाची !" हे म्हणताना त्या गृहस्थांचा चेहरा उतरला होता.

मी माझ्या पिशवीतून मोठं चॉकोलेट काढलं, त्याचे दोन तुकडे केले नि त्यांच्यासमोर धरले.

" डांकऽ डांकऽ !" धन्यवाद ! म्हणत आजोबांनी चॉकोलेटचा एक तुकडा घेतला.

" आज खूप दिवसांनी पश्चिमेकडचं चॉकोलेट खातोय !" असं म्हणत आजोबा मिटक्या मारत चॉकोलेट खाऊ लागले.

आजोबांचा निरोप घेऊन मी उठलो. जाणारी-येणारी माणसं माझ्याकड टक लावून बघत आहेत, असं वाटत होतं. खरं तर माझ्याकडे कोण कशाला बघेल आणि इथे बर्लीन-मध्ये ? मी आपला चाललो होतो.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना काळ्या दगडाच्या अतिभव्य– अवाढव्य इमारती. क्लासिक, गोथिक, बारोक असे किती तरी प्रकारचे नमुने. दुसऱ्या महायुद्धातल्या तुफानी बाँब-वर्षावातूनही टिकून राहिल्या होत्या. किती दणकट बांधकाम केलं होतं कारागिरांनी ! बाँबहल्ल्यात जी काय पडझड झाली होती ती नंतरच्या काळात दुरुस्त केली गेली. वारस-दारांनी आपल्या राष्ट्राचं वैभव जपलं होतं, वाढवलं होतं ! प्रत्येक इमारत निरखत, मनोमन तिचं कौतुक करत मी हळूहळू पुढे जात होतो. रस्त्यांवर वाहनांची गर्दी अशी मुळीच नव्हती. त्यामुळे छान वाटत होतं – शांत शांत !

वाटेत एक भली मोठी रांग दिसली, म्हणून तिच्याजवळ जाऊन रांगेतल्याच एकाला बोलका करण्याचा प्रयत्न केला.

" गुटेन् टाक् !" मी म्हटलं.

" टाक् !" मला आपादमस्तक न्याहाळत त्या गृहस्थानं माझ्या नमस्काराचा स्वीकार केला.

" कशासाठी रांग लावली आहे तुम्ही ही ?"

" स्पेअरपार्टसाठी."

" कशाचे ?"

" मोटारीचे."

" दुकानात नाही मिळत ते ?"

" दुकानातच की !" समोरच्या इमारतीकडे बोट दाखवित तो म्हणाला– " सरकारी दुकानातच मिळतात." त्या भल्या-मोठ्या इमारतीच्या खालच्या मजल्यावरचं एक छोटसं दार उघडं होतं नि दारावरचा एक गणवेशधारी, हत्यारी रखवालदार एकेकाला क्रमानं आत सोडत होता.

" तुम्ही किती वाजता ह्या रांगेत येऊन उभे राहिलात ?" रांगेची संथ गती पाहून मी विचारलं.

" सकाळी सहा वाजता."

" बाप रे !" नकळतपणे मी उद्‌गारलो. मी मराठीतच बाप रे म्हटल्यामुळे तो माझ्या-कडे आ वासून बघतच राहिला ! त्या बिचाऱ्याला नंतर उगाच त्रास व्हायला नको म्हणून मी त्याला अच्छा म्हणून पुढे झालो. त्यानंही सुटकेचा निःश्वास टाकला. " नसती परदेशी

पीडा ! कटली एकदाची !" असच वाटल असणार त्याला बहुतेक !

जरा पुढे गेलो तेव्हा मला जाणवलं की, माझ्याच वयाचा एक तरुण माझ्याबरोबरीनं चालला आहे. मनात किंचित शंका येताच मी जरा भरभर चालू लागलो. त्यानंही आपली गती वाढवली. मग मी एकदम सावकाश, इकडे-तिकडे बघत, जाणीवपूर्वक रेंगाळत चालू लागलो. तोही आता रेंगाळला होता, माझ्याप्रमाणेच. चालता-चालता एकदा तो माझ्या अगदी जवळ आला नी मी झटकन् वळून त्याच्याकडे रोखून बघितलं– तो किंचित चपापला. तेव्हा मीच झटकन स्मित करत म्हटलं,

"हालो !!!"

"हालो ! ज्द्रावस्तुइचे !" तो तरुण रशियनमध्ये म्हणाला.

"ज्द्राव्स्तुइचे !" मीही लगेचच त्याला रशियनमध्ये नमस्कार केला.

हसून आनंद व्यक्त करत तो माझ्याजवळ आला. त्याच्या चेहऱ्यावरून तो तुर्कमेनी वगैरे कोणी असावा असं वाटत होतं. रंगानं गोरा, रूपानं बरा. मानेपर्यंत आलेले नसले तरी मोठ्यातच जमा होतील, असे अस्ताव्यस्त भुरे केस. ओठांवर भरदार पिंगट मिशा नि तसेच पिंगट डोळे.

"वी गवरीत्मे पा रू स्किई ? तुम्हाला रशियन येतं ?" त्यानं विचारलं.

"दा !–हो, थोडं थोडं !" मी म्हटलं. आता त्या तरुणाचा चेहरा खूपच खुलला होता.

"तुमचं नाव ?" मी विचारलं.

"पेत्रो !" आपल्या लाल-पिवळ्या चौकटीच्या कोटाची कॉलर दोन्ही हातांनी वर करत पेत्रो उत्तरला नी एकदम मुद्द्यावर येत म्हणाला, "उवास येस्त... दोलार ?– तुमच्याजवळ...डॉलर आहेत ?"

चलनाच्या विनिमयाचे व्यवहार परस्पर करणं बकायदेशीर असतं, नव्हे– तो गंभीर गुन्हा असतो. त्यामुळे मला त्यात रस नव्हताच, पण माझी जिज्ञासा, फाजील कुतूहल मला स्वस्थ बसू देत नव्हतं. म्हणून मी त्याला विचारलं,

"किती मार्क देणार एका डॉलरचे ?"

"पाच !"

"पाचच ?" तो किती वरती जातो हे बघण्यासाठी मी म्हटलं–एका डॉलरला ऑफिशिअल रेटप्रमाणे दोन मार्कसुद्धा येत नव्हते नि हा पाच मार्क द्यायला तयार होता. माझं कुतूहल वाढत होतं.

"सहा देईन मी– तुम्हाला म्हणून !" पेत्रो माझ्या अगदी जवळ यऊन म्हणाला.

मी काहीच बोललो नाही. चेहरा गंभीर ठेवून मी पुढे पुढे जात होतो. पेत्रो माझ्या बरोबरीनं शेजारूनच येत होता.

"शर्ट किती छान आहे हा !" माझ्या अंगात नेहरू शर्ट होता. त्याच्या पुढच्या बाजूला

बटणपट्टीभोवती सुंदर भरतकाम केलेलं होतं, त्यावरून हात फिरवीत पेत्रो म्हणाला. मी आश्चर्यानं त्याच्याकडे, त्याच्या रसिकतेकडे बघत होतो. तेवढ्यात त्यानं माझ्या खांद्यावर हात ठेवला. त्याच्या कोटावर त्यानं गुलाबाचं छोटसं पांढरं फूल लावलेलं होतं, हे मला विशेषत्वानं जाणवलं. आम्ही दोघं पुढे पुढे जात होतो.

"पहा, एका डॉलरला दहा मार्क देईन मी तुम्हाला !– किती डॉलर आहेत तुमच्याजवळ ?"

"पण डॉलरचं करणार काय तुम्ही ?" पेत्रोच्या खांद्यावर हात ठेवत मी विचारलं.

"टेपरेकॉर्डर घ्यायचाय मला."

"मग तो मार्क देऊन मिळत नाही ?"

"झटकन् नाही मिळत !"

"डॉलर दिले तर ?"

"लगेच मिळतो ! तुमच्याकडे किती डॉलर आहेत ?" आपल्या मूळ मुद्द्याकडे यत पेत्रो म्हणाला.

"माझ्याकडे ? माझ्याकडे कुठले आलेत डॉलर !" चेहऱ्यावर जास्तीत जास्त भावडेपणा आणत मी म्हटलं.

"डॉलर नाहीत ?" माझ्या खांद्यावरचा हात झटकन् काढून घेत पेत्रो माझ्याकडे आश्चर्यानं, संशयानं पाहत होता. मीही पेत्रोच्या खांद्यावरचा हात काढला. "देणार नाही तुम्ही डॉलर ?" पेत्रो निर्वाणीच्या सुरात विचारत होता.

"पण माझ्याजवळ द्यायला डॉलरच नाहीत रे !" असं मी म्हणताक्षणीच तो दूर झाला नि तोंड फिरवून चालू लागला.

"पेत्रो ऽ शुक् शुक् !" पेत्रोचं लक्ष वेधून घेऊन मी त्याला जवळ येण्यासाठी खूण केली.

"श्तो ?– काय ?" पेत्रोनं फक्त मान वळवली. भिवया उंचावत पेत्रोनं माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं बघितलं.

मी पुन्हा एकदा छान स्मित हास्य केलं. पेत्रो जवळ आला. मी मोठ्या प्रेमानं हात पुढे केला. तो आणखी पुढे झाला. त्याच्या चेहऱ्यावरही स्मितरेषा उमटल्या. पुन्हा एकदा उत्साहानं (कदाचित मोठ्या अपेक्षेनं) त्यानं आपला हात पुढे केला.

"दस्विदानिया !!!– फिर मिलेंगे !!!" त्याचा हात हातात घेऊन प्रेमानं दाबत मी म्हटलं. तो बिचारा तर पुरा गोंधळून गेला. काय चाललं आहे, हे त्याच्या एकदम लक्षातच येईना– मी पुन्हा म्हटलं, "दस्विदानिया !!!"

"दस्विदानिया !" त्याच्या तोंडून कसेबसे दोन शब्द बाहेर पडले.

पेत्रो दूर दूर जात होता, त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे मी पाहत होतो...

अकरा वाजून गेले होते. बारा वाजेपर्यंत कार्ल मार्क्स चौकात पोहोचायला हवं होतं

कारण श्टाम्बाडर बाई नी इतर माझ्यासाठी तिथे थांबणार होते.

ह्यातातल्या नकाशावर अधूनमधून नजर फिरवत मी चाललो होतो. मी जात असलेल्या ह्या रस्त्यांवरून ह्यापूर्वी– गेल्या शे-दोनशे वर्षांत कोण कोण गेले असतील ? मनात कल्पनांचे खेळ चालू होते. अशा कल्पनाही खूपदा रम्य वाटतात ! दिल्लीतल्या पुराना किल्ल्याच्या आसपास हिंडताना नेहमी वाटायचं की ह्याच भागात कौरव-पांडव हिंडत असणार...त्यांची विट्टी कुठल्या विहिरीत पडली असेल ? असेल का ती विहीर अजून ? ...वेरावळजवळच्या भालका भागात फिरताना फार उदास वाटतं– इथल्याच एका झाडा-खाली श्रीकृष्ण बसला होता नी सहज चाळा म्हणून पाय हलवत होता नी नेमका त्याच पायाला विषारी बाण लागला, त्यातच कृष्णाचा अंत झाला ! काय झालं असेल त्या वेळी, ह्या ठिकाणी ? जुन्या, ऐतिहासिक ठिकाणी गेल्यावर नेहमीच असे विचार डोक्यात येतात. बेर्लीनमधल्या रस्त्यावरून चालताना असेच विचार डोक्यात येत होते. जुन्या जुन्या घट-नांचं स्मरण होत होतं. अचानकपणे १९४५ च्या एप्रिल महिन्यातले शेवटचे काही दिवस आठवले...अमेरिकन सेनेनं एल्बऽ नदी ओलांडून बेर्लीनच्या दिशेनं आगेकूच सुरू केली होती; तर इकडे पूर्वेकडून मार्शल झुकोफ खुद्द बेर्लीनच्या उपनगरात येऊन पोहोचला होता ! रायफलीच्या उंचीची लहान-लहान मुलं आपल्या गावाच्या, राजधानीच्या, देशाच्या रक्षणा-साठी न पेलणारी शस्त्रं घेऊन रस्त्यावर आली होती. विमानांची घरघर, बॉम्बच्या स्फोटांचे धडाक्याचे आवाज, मरणाऱ्यांच्या किंकाळ्या, रस्त्यातून पडलेली प्रेतं... आणि त्याच रस्त्यावरून आज मी चाललो होतो, माझ्या अंगावर एकदम शहारे आले ! अवती-भोवती तेच रस्ते, त्याच इमारती पण सर्व स्वच्छ, सुंदर ! एव्हाना मी कार्ल मार्क्स चौका-पाशी आलो होतो.

चौकाच्या कडेच्या विस्तीर्ण भागात शेकडो कारंजी डौलानं उडत होती. उंचच उंच ! माझे पाय आपोआप तिकडे वळले. पाणी म्हणजे जीवन. नवजीवन. आणि हे तर उसळतं पाणी ! बेर्लीनच्या नवजीवनाची साक्ष देणारी ती सहस्र कारंजी. ह्या नगरीचं नवजीवन सुरू झालं होतं, त्यांना नवं तत्त्वज्ञान मिळालं होतं. म्हणूनच त्या कारंज्यांच्या चौकाचं नाव कार्ल मार्क्स चौक असं ठेवलं होतं का ?

कारंज्यातून उसळणाऱ्या धारांच्या तुषारात बसायला मस्त वाटत होतं. नंतर ठीक बारा वाजता घड्याळाजवळ गेलो, तिथे श्टाम्बाडरबाई माझी वाटच पाहत होत्या.

"इथला भाजी-बाजार बघायचा आहे का तुम्हाला ?" श्टाम्बाडरबाईंनी आम्हांला विचारलं.

"जाऊ या की ! चला !!!" मी मोठ्या उत्साहानं म्हटलं, पण इतरांच्या चेहऱ्यावर फारसा उत्साह दिसेना.

"ओ के, पण अगोदर आपण जरा कुठे तरी काही खाऊ या, बिअरतरी पिऊ या. मग

जाऊ कुठे ते ! काय ?" क्वचितच तोंड उघडणाऱ्या पिएरनं सुचवलं. विरोध कोणाचाच नव्हता. आम्ही जवळच्याच एका सहकारी रेस्तराँमध्ये शिरलो.

बिअरचा मोठा ग्लास घेऊन मी छानशी जागा शोधत होतो. मध्यभागी एका टेबला-भोवती चार गणवेशधारी बसले होते, त्यांच्या शेजारचं टेबल रिकामं होतं. मी तिकडे जाऊन बसलो, ते वर्दीधारी कोण आहेत हे जाणून घ्यायची इच्छा होती.

त्या चौघांच्यासमोर ट्रेमध्ये दोन-चार वाडगे दिसत होते आणि प्रत्येकासमोर बिअरचा मोठा ग्लास. कुतूहलानं माझी दृष्टी हॉलमध्ये सर्वत्र फिरत होती पण माझे कान मात्र शेजारच्या टेबलाकडे लागले होते. ते चौघं रशियनसारख्याच कुठल्यातरी भाषेत बोलत होते. बायलोरशियन किंवा युक्रेनियन अशी कोणती तरी असावी ती. पण नक्की कोणती ते कळलं नाही.

त्या सहकारी रेस्तराँमध्ये स्वयंसेवा होती पण पांढरेशुभ्र एप्रन घातलेल्या एक-दोन (स्त्री)सेविका अधून-मधून येऊन त्या वर्दीधारी पाहुण्यांना वाडग्यातून काही पदार्थ आणून वाढत होत्या. ते पाहुणे कदाचित " मोअर इक्वल्स् " पैकी असावेत !

आमची इतर सहकारी मंडळी उठलेली दिसताच मी बिअरचा ग्लास रिकामा केला नी झटकन उठलो. आता आम्ही सारे भाजी-बाजाराकडे चाललो होतो.

एका विस्तीर्ण मैदानात भाजीबाजार भरलेला होता. उंच चौथऱ्यांवर भाज्यांच्या टोपल्या मांडलेल्या होत्या. अनेक टोपल्यातून भाज्यांच्या जुड्या नुसत्या कोंबून ठेवलेल्या होत्या. आसपास अस्वच्छता, घाण कुठेही नव्हती पण आकर्षकतेचा अभाव तीव्रतेनं जाणवत होता, नी मुख्य म्हणजे रसरशीत अशा भाज्या, फळं कुठेच दृष्टीस पडत नव्हती. कोबीच्या मोठ-मोठ्या गड्ड्यांचे ढीग जमिनीवरच रचून ठेवलेले होते. एकाच गाडीवर असलेला फ्लॉवरचा पिकुटलेला ढीग बघवत नव्हता. खुरटे तांबडे मुळे नि सुकट भगवी गाजरं. कोथिंबीर तर पार कोमेजून गेलेली. एका ठिकाणी छोटी-छोटी सफरचंदं दिसली. फारशी खतं न वापर-लेल्या झाडांची सफरचंदं अशी लहान असतात, पण ती चवीला मात्र छान असतात. म्हणून मी पुढे होऊन चौकशी केली.

" कोणत्या भागातली ही सफरचंदं ?"

" माहीत नाही !" आपला जणू ह्याच्याशी काही संबंध नाही अशा थाटात पांढरा एप्रन घातलेली ती विक्रेती उत्तरली.

मी पाचशे ग्रॅम सफरचंदं घेतली नी आमच्या सहकाऱ्यांसमोर धरली. श्टाम्बाडरबाईंनी त्यातलं एक घेतलं पण इतरांनी नाकं मुरडली, सबबी सांगितल्या. मी एक ठेवून उरलेली चार माझ्या शबनममध्ये टाकली. सफरचंदं छान होती. आंबट-गोड.

" आमच्या देशातली सफरचंदं एकेक केवढाली असतात !" कॅनडातली कॅथी मोठमोठे हात करत म्हणाली, " ही म्हणजे अगदीच गोटचा आहेत !" पलिकडच्या सफरचंदांच्या

स्टॉलकडे कटाक्ष टाकत कॅथी कुत्सितपणे म्हणाली.

कॅथीच्या ह्या उद्‌गारांची प्रतिक्रिया श्टाम्बाडरबाईंच्या चेहऱ्यावर मला तात्काळ दिसली. श्टाम्बाडरबाईंच्या चेहऱ्यावर तीव्र नापसंती जाणवत होती. का ? "आज पूर्व नि पश्चिम असे तुकडे झालेले असले, केले गेलेले असले तरी ती काही काळया दगडावरची रेष नव्हे. हा देश एकच आहे ! पूर्वी तो एकच होता, पुढेही तो एक होणार आहे ! एकच राहणार आहे !" असे काहीसे विचार श्टाम्बाडरबाईंच्या डोक्यात आलेले असतील का त्या क्षणी ?

शिस्त नी व्यवस्थितपणाची विलक्षण आवड आहे जर्मनांना. ह्या वेडाचाच एक आवडता भाग म्हणजे गणवेश. जर्मनांना गणवेशाची आवडच आहे असं नाही, तर वेड आहे. त्याबद्दल अतिशय आदर आहे. त्यांच्या ह्या वृत्तीतून एकदा एक गंमत झाली. एका चांभारानं क्लृप्ती करून कॅप्टनचा गणवेश अंगावर चढवला ! त्याच्या गणवेशाला भुलून सैनिक त्याच्या आज्ञा मानू लागले ! मग ह्या तोतया कॅप्टननं नगरपालिकेच्या अध्यक्षालाच अटक केली नी मोठी रक्कम घेऊन पसार झाला ! ही सत्यकथा घडली "क्यॉपनिक्" ह्या बेर्लीनच्या उपनगरात. कार्ल त्सुक्माइअर् ह्या नाटककारानं ह्या घटनेवर "डेअर् हाउप्टमान् फोन् क्यॉपनिक्" हे सुंदर नाटक लिहिलं आहे (१९३१). ! "ते" क्यॉपनिक् गाव बघायची इच्छा होती कारण ते पूर्व-बेर्लीन भागातच आहे. पण ते बरंच दूरच असल्यामुळे ती कल्पना मला सोडून द्यावी लागली. तिथे जाऊन संध्याकाळपर्यंत परत येणं शक्य नव्हतं.

श्टाम्बाडरबाई आमच्याबरोबर आल्या होत्या, आमच्या सोयीसाठी, मदतीसाठी. आपलं कर्तव्य त्या व्यवस्थित बजावत होत्या पण त्यांच्या एकूण वागण्यात तसा उत्साह वाटत नव्हता. परदेशी शिक्षकांबरोबर बेर्लीनला जायची वेळ त्यांच्यावर दर वर्षीच येत असल्यामुळे त्यांचा उत्साह कमी झाला होता की शहराचा हा भाग दुरावल्याचं दुःख होतं त्यांना ?

"बेर्लीनला तुम्ही नेहमीच येत असाल, नाही ?" मी विचारलं.

"वर्षांतून दोनदा तरी यावंच लागतं." श्टाम्बाडर.

"कंटाळा नाही येत ?"

"अं ऽ" श्टाम्बाडरबाईंनी खांदे उडवून फ्रेंच पद्धतीनं हात जरासे उंचावले, मान तिरकी केली !

"दर वेळी काय बघता तुम्ही इथे ?" मी विचारलं.

"हे असंच की !" जरासं थांबून श्टाम्बाडरबाई म्हणाल्या, "आणि हो, प्रत्येक वेळी इथल्या म्युझियममध्ये एखादी चक्कर तरी मारतेच मी."

एव्हाना आम्ही भाजी-बाजारातला फेरफटका पूर्ण करून मुख्य रस्त्यावर आलो होतो. "मी आता म्युझियम बघायला जाणार आहे, तुम्ही कोणी येणार असाल तर चला

माझ्याबरोबर !" श्टाम्बाडरबाईंनी आपली इच्छा बोलून दाखवली. आम्ही सर्वच त्यांच्या मागे निघालो.

मुख्य रस्त्यापासून जरा आत येऊन आम्ही एका अवाढव्य इमारतीत शिरलो. सुंदर पण जुनाट वाटणाऱ्या त्या वास्तूत शिरल्यावर तिकिट-विक्रीचे जुनाट कौंटर बघून कसंसंच वाटलं. मनात आलं की ह्या श्टाम्बाडरबाई प्रत्येक वेळी इथे येऊन काय डोंबल बघतात, देव जाणे ! थोडयाशा अनिच्छेनं, अनुत्साहानंच तिकीट काढून संग्रहालयाच्या पहिल्या दालनात शिरलो.

–आणि माझा भ्रमनिरास झाला ! आतलं एक एक दालन इतकं मोठं होतं की आपण सामान्यत: भव्य, अतिभव्य म्हणतो ते वर्णनही कमी पडावं !

इजिप्तमधली एक भव्य वेस आणि आसपासची तटबंदी चक्क तिथून उचलून आणून ह्या संग्रहालयात पुन: जशीच्या तशी बांधून काढली आहे ! त्या वेशीचं नी तटाचं बांधकाम इतकं अप्रतिम की समोर उभं राहिल्यावर वाटत की आपण इजिप्तमध्येच कुठेतरी आहोत ! (अशा प्रकारचं बांधकाम पुण्यातल्या राजा केळकर संग्रहालयात आहे. मस्तानीचा महाल.)

ग्रीसमधल्या अशाच एका शिल्पसमृद्ध वास्तूची पुनर्बांधणी केलेली आहे. ही सारी कामं इतकी प्रचंड आहेत की नीटपणे बघायची झाली तर कित्येक तास हवेत नी त्यांचं कौतुक करायला कितीतरी पानं !

सर्वच दालनांमधून ठिकठिकाणी बसण्यासाठी बाक ठेवलेले आहेत–फिरून फिरून पाय दुखायला लागले म्हणजे जरा बसून विश्रांती घ्यायची नी पुन: उठून पुढे निघायचं– बघायला.

ह्या संग्रहालयातला मुगल-विभाग पाहून डोळे दिपले–ही तर फक्त झलक आहे त्या काळच्या वैभवाची ! कोण्या एके काळी भारतात खरोखरीचं सुवर्णयुग असलं पाहिजे ह्यात काही शंकाच नाही !

संग्रहालयाचा कोपरासुद्धा नीटपणे बघून झाला नव्हता पण वेळ मात्र संपली होती ! वेळ संपल्याची सूचना देऊन आम्हाला बाहेर जायला सांगेपर्यंत आम्ही जमेल तेवढं बघून घेत होतो.

"कसं वाटलं म्युझियम ?" बाहेर पडताना श्टम्बाडरबाईंनी मला विचारलं.

"एक्सलंट ! फँटॅस्टिक !" मी अजून आश्चर्यवाचक उद्‌गारातून बाहेर पडलो नव्हतो.

"पण तुला कसं वाटलं ?" आंगेला माझ्याकडे बघत म्हणाली.

"मला ?" मी हसून आंगेलाकडे बघितलं. तिचा उत्साह, तिचा खटयाळपणा मला चांगला ठाऊक होता. तिच्या प्रश्नाला उत्तर द्यायला हवं होतं, तिच्या पद्धतीनं पण माझ्या मनातलं. "मला काय वाटलं ते सांगू ?"

"सांग ना ! तेच तर विचारत्येय मी !"

"दुसऱ्याकडची एखादी वस्तू आपल्याला आवडली, हवीहवीशी वाटली नी धीर करून आपण ती हस्तगत केली तर त्याला काय म्हणतात ? चोरी. आणि असा चोरीचा माल नेहमी लपवून ठेवतात, गुपचूप...

"हे काय माझ्या प्रश्नाचं उत्तर ?" आंगेला अधीर होऊन म्हणाली.

"अग, ऐकून तर घे पूर्ण ! –एखाद्या राष्ट्राला दुसऱ्या राष्ट्रात जर काही विशेष, आकर्षक असं आढळलं नी त्यांना त्याची आसक्ती वाटली की ते राष्ट्र साम, दाम, दंड, भेद अशा नाना प्रकारांनी ती वस्तु हस्तगत करण्याचा प्रयत्न करतं–ती वस्तू मिळेपर्यंत. वलृप्ती यशस्वी झाली की ती वस्तू गुपचूप लपवून ठेवत नाहीत बरं का–तर तिचं प्रदर्शन मांडतात ! अशा खूप वस्तू झाल्या की म्युझियम तयार करतात ! –आपण आत्ता बघितलेलं म्युझियम अतिशय सुंदर होतं–अत्यंत समृद्ध !"

माझ्या बोलण्यानं श्टाम्‌बाडर बाई किंचित गंभीर झालेल्या दिसल्या. आंगला सेकंदभर गोंधळली नी मग एकदम म्हणाली,

"फॅन्टॅस्टिक !"

"काय ! –म्युझियमच ना ?" मी.

"हो, म्युझियम–नी तुझं उत्तरही !"

दुकानं केव्हाच बंद झालेली होती. बेर्लिनेर आँसॉम्ब्लऽ हे नाटचगृह म्हणजे बेर्टोल्ट् ब्रेश्ट्‌ची कर्मभूमी. पण त्याच्या डागडुजीचं काम चालू होतं, त्यामुळे आतून बघता येत नव्हतं–आता बघण्यासारखं काही राहिलं नव्हतं–खरं तर खूपखूप राहिलं होतं पण वेळ नव्हता–आम्ही परतीच्या वाटेला लागलो.

आमच्याजवळ पूर्व जर्मनीचे थोडेफार मार्क / प्फेनिश शिल्लक होते, ते खर्चायलाच हवे होते म्हणून आम्ही एका रेस्तराँमध्ये शिरलो.

बाहेरच्याच एका टेबलाभोवती आसपासच्या आणखी काही खुर्च्या ओढून घेऊन आम्ही ५।६ जण बसलो. प्रत्येकानं आपापल्या खिशातून / पर्समधून उरले–सुरले मार्क, प्फेनिश बाहेर काढून टेबलावर ठेवले. आंगेलानं त्या पैशांची मोजदाद केली. तोपर्यंत एक स्त्री-वेटर दोन वेळा आमच्या टेबलापाशी येऊन गेली.

आंगेलानं पदार्थांची चौकशी केली. मुख्य म्हणजे त्यांच्या किमती विचारल्या. राजधानी बेर्लिनमध्ये आम्ही चक्क गावंढळ माणसांप्रमाणे टेबलावर चिल्लर ठेवून चौकशा करत होतो.

"आपल्याला फक्त कपकप कॉफी पिता येईल ह्या पैशातून !" टेबलावरचा खुर्दा हातानं झाकत आंगेला म्हणाली.

"ओ के !" सर्वांनी एका सुरात संमती दर्शवली.

प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर कोंब्रट कॉफी आली. सावकाश पिऊन आम्ही उठण्याच्या तयारीत

होतो. आंगेलानं टाळ्या वाजवून वेटरबाईला बोलावून टेबलावरची चिल्लर तिच्या हातात ठेवली–तिनं ती सारी मोजून घेतली.

" हे जादा आहेत–" असं म्हणत वेटरबाईनं काही नाणी आंगेलासमोर ठेवली.

" असू देत ! ठवा तुमच्याचजवळ !" आंगेला कर्णाच्या थाटात म्हणाली.

त्या वेटरबाईनं चिल्लर आपल्या एप्रनच्या खिशात टाकली नि " डांकऽ " म्हणत मख्ख चेहऱ्यानं निघून गेली.

बेर्लिन्च्या पश्चिम भागात जाण्यासाठी आम्ही पुन्हा स्टेशनवर आलो–तिथे पुन्हा रांग–पैशांचे हिशेब, डॉक्युमेंटस्, पासपोर्टातल्या फोटोवरून त्याच्या धारकाच्या चेहऱ्याची कडक तपासणी...

आम्ही रांगेत उभे होतो...आपली पाळी येण्याची वाट पाहत हळूहळू पुढे सरकत होतो...

पश्चिमेकडे जाणाऱ्या आपल्या नातेवाईकांना, मित्रांना निरोप द्यायला आलेली पूर्वेकडची मंडळी खूपच दुःखात दिसत होती...प्रेमानं एकमेकांना मिठ्या मारून पाणावलेल्या डोळ्यांनी दूर होत होती...विरहाच्या कल्पनेनं तरुणांनाही हुंदका येत होता...ती दृश्यं बघून मनात कालवाकालव होत होती...

ते बघवेना म्हणून मी आकाशाकडे बघू लागलो...अनेक पक्षी आकाशात विहार करत होते–स्वैर !...किती स्वतंत्र आहेत हे पक्षी ! मी विचार करत होतो. मनात आलं–सीमासरहद्दींच्या पलिकडे ह्यांचा संचार असतो...आम्ही मानव स्वतःला अधिक सुधारलेले, विकसित मानतो पण आम्ही तर सीमासरहद्दी, राष्ट्र अशा आम्हीच निर्माण केलेल्या खोड्यात अडकून पडलो आहोत ! राष्ट्रवादानं आम्ही काय साधलं ?–आमच्या भोवतालच्या भिंती अधिक उंच केल्या, पक्क्या केल्या !...कोणी आणले हे नसते वाद ? आम्हीच ना ? मग आम्हीच दूर केले पाहिजेत ते !... पक्ष्यांचा एक थवा पूर्व बेर्लिनमध्ये येत होता नी त्याच वेळी एक थवा पश्चिमेकडे झेपावत होता...

"पासपोर्ट !" हळू-हळू सरकत मी सीमेवरच्या गेटपाशी आलो होतो नी तिथल्या अधिकाऱ्याच्या कर्कश आवाजानं माझी तंद्री भंगली. मी झटकन माझा पासपोर्ट त्याच्या हातात ठेवला. त्यानं त्यावर नजर फिरवली, माझ्याकडे एक कटाक्ष टाकून पासपोर्ट माझ्या हातात परत दिला नी पुढे होण्याची खूण केली...

मी झटकन त्या गेटमधून बाहेर सटकलो...एक सीमा पार केल्याच्या आनंदात !

□

# परिक्रमा

ग्यॉटिङेन् (Gottingen) ह्या गावाबद्दल मला पहिल्यापासूनच विलक्षण आदर होता. गाउससारख्या महान गणितज्ज्ञाचं गाव ते. इथल्या "गे ओर्ग आउगुस्ट् उनिव्हेर्झिटेट्" ह्या विद्यापीठाची स्थापना १७३७ मधली.

जर्मनीत तशी मी खूपच गावं बघितली. प्रत्येक ठिकाण वेगळं, सुंदर, आपल्या परीनं अत्यंत वैशिष्टयपूर्ण. पण पहिल्याच दर्शनात मी प्रेमात पडलो ते मात्र ह्या ग्यॉटिङेन् नगरीच्या!

स्टेशनातून बाहेर पडल्यावर अक्षरश: दोनच मिनिटात जंगलात–सुरक्षित जंगलात जाऊन पोहोचण्याची सोय असणारं ग्यॉटिङेन् रस्त्यातून धावत-पळत जाणारी छोटी छोटी आनंदी मुलं नी त्या वागडणाऱ्या मुलांच्या पाठोपाठ आपलं प्रौढपण विसरून धावणारे त्यांचे उत्साही आई-बाबा!–असं आनंदी दृश्य मला पहिल्या काही मिनिटातच दिसलं होतं. नंतरही दिसत राहिलं. हसत खिदळत संध्याकाळपासून मध्यरात्रीपर्यंत भटकणारी उत्साही तरुण मंडळी...आहाहा! ग्यॉटिङेन्मध्ये इतकं छान वाटायचं! आणि वाटायचं की इथले दिवस संपूच नाहीत!

"नान्सेन्–हाउस्" हा अठराव्या शतकात एका उमरावानं आपल्यासाठी बांधलेला वाडा. ह्या भल्यामोठ्या वाड्यात तो, त्याची पत्नी नी दोन मुलं अशी चारच माणसं

राहत. आज ह्या वाड्यात "ग्यॉअठऽ इन्स्टिटूट्" ची शाखा आहे.

वाड्याला लागूनच अलीकडे काही भाग वाढवला आहे. त्या विस्तारित भवनात खालती कार्यालय नी वरच्या दोन मजल्यांवर वसतीगृह. पहिल्या मजल्यावरच्या टोकाला तीन स्वतंत्र, प्रशस्त सिंगल रुम्स. त्यातली शेवटची खोली बाहेरून येणाऱ्या शिक्षकांसाठी राखून ठेवलेली. अर्थातच मी त्या खोलीत होतो.

आत शिरल्यावर लगेचच उजव्या हाताला मोठं बेसिन. त्याला गार गरम पाण्याचे नळ. डाव्या हाताला भव्य कपाट, मग बैठकीसाठी प्रशस्त जागा, मध्ये छोटासा गालीचा, त्यावर एक टीपॉय, दोन आरामखुर्च्या, बैठकीपलीकडे डाव्या बाजूला दिवाण, त्यावर जाडजूड गादी, उशी नी पिसांची गुबगुबीत रजई. उजव्या हाताचा कोपरा सर्वात महत्त्वाचा— मोठं प्रशस्त लाकडी टेबल, खुर्ची, टेबलावर अत्यंत उपयुक्त, हवा तसा वळणारा टेबल-लॅम्प. पलीकडची भिंत म्हणजे अतिभव्य खिडक्या, सुंदर पारदर्शक काचेच्या. त्यातून पलीकडे दिसे ते नान्सेन् हाऊस्चं विस्तीर्ण परसू. उंचच उंच वृक्षांचं उपवनच. माझ्या या खोलीच्या भव्य खिडक्या बंद करण्यासाठी सुंदर पडदे होते, पण माझ्या वास्तव्यात मी एकदाही ते वापरले नाहीत. बाहेरचं हिरवंगार दृश्य मी कधीही दृष्टीआड होऊ दिलं नाही.

टर्रर्रर्र...गजर झाला. जर्मनीत आल्यापासून पाचला उठायला लागलो होतो. माझ्यासारख्या सूर्यवंशी माणसाला फारच जड जात होतं, पण इलाज नसे. एकदा दिवस सुरू झाला की, सतत काही ना काही चालूच असायचं. प्रत्येक कार्यक्रम म्हणजे वेगळा अनुभव. त्यामुळे सक्ती नसली तरी मी प्रत्येक कार्यक्रमात भाग घेत होतो. अनुभव घेण्याची एकही संधी सोडायची नाही असं मी ठरवलं होतं.

पाचला उठून तोंड धुणं वगैरे वैयक्तिक कामं उरकून, एखादं पत्र लिहून लेक्चरची जी तयारी केलेली असायची त्यावर पुन्हा एकदा नजर टाकायची. तोपर्यंत खूप भूक लागलेली असायची. आदल्या दिवशीचा रात्रीपासून उपास असायचा ना ! न्याहरीला "ब्रेकफास्ट" का म्हणतात ते मला जर्मनीत गेल्यावरच कळायला लागलं होतं.

नान्सेन्हाऊस्च्या अतिविशाल तळघरात आमचं जेवणघर होतं. साडेसहाला जेवण घराचं दार उघडायच्या अगोदरच काही मंडळी बाहेर उभी असायची. त्यात हमखास असणाऱ्यांपैकी मी एक होतो. शांघायच्या डॉ. ली शिआङ, दिल्लीचा डॉ. वर्मा, कोयंबत्तूरचा फ्रान्सिस् नी बरेचसे अमेरिकन विद्यार्थी. ली, वर्मा, फ्रान्सिस ह्यांना उच्च शिक्षणासाठी फोन् हुंबोल्ट् शिष्यवृत्ती मिळाली होती. अशा विद्यार्थ्यांना प्रथम सहा महिने जर्मन भाषेचं शिक्षण घ्यावं लागतं.

जेवणघरात स्वयंसेवा होती. टेबलावर कपबशा, प्लेटी, काटेचमचे इत्यादि मांडलेले असायचे. परड्यांतून वेगवेगळ्या प्रकारचे पाव. कौंटरपाशी जाऊन आपल्याला हव्या त्या गरम पेयाची किटली नी लोणी, जाम, चीज वगैरे पदार्थ ट्रेमधून घेऊन यायचे. उत्तम

स्वादाचा लंकेतला चहा किंवा दक्षिण अमेरिकेतली कॉफी, आफ्रिकेतला स्वादिष्ट, खमंग कोको किंवा दूध; हवे ते पेय मिळत असे.

बहुतेक अमेरिकन विद्यार्थी अमेरिकन थाटातच न्याहरीला बसत. येताना फ्रूट, ज्यूसचे खोके घेऊन येत असत नी जेवणवजा त्यांची न्याहरी बराच वेळ चालायची, पण इतर मंडळी मात्र थोडयाच वेळात न्याहरी उरकून बाहेर पडत असत.

न्याहरी उरकून पुन्हा वरती जाऊन वह्या, पुस्तकं, किल्ल्या वगैरे घेऊन खाली यायचो.

इथल्या वास्तव्यात सर्वत्रच मला मानसिक दृष्टया त्रासदायक वाटलेली गोष्ट म्हणज सतत जवळ बाळगाव्या लागणाऱ्या किल्ल्या. खोलीची किल्ली, रेफ्रिजिरेटरची किल्ली, टीचर्सरूमची किल्ली, वर्गाची किल्ली, ग्रंथालयाची किल्ली, नान्सेन्हाऊसच्या प्रवेशद्वाराची किल्ली...

हो, इथला एक प्रकार विस्तारानं सांगायलाच हवा. नान्सेनहाऊसचाच नव्हे तर प्रत्यक ठिकाणी एक मुख्य दरवाजा नेहमीच बंद असतो, परंतु तिथे काम करणारे कर्मचारी, विद्यार्थी ह्यांच्याजवळ त्या मुख्य दरवाजाची एक एक किल्ली दिलेली असते. त्यामुळे संबंधिताची गैरसोय होत नाही नी अनाहूत व्यक्ती आत येऊ शकत नाहीत. व्यवस्थेचं काम सोपं होतं ! टीचर्सरूम नेहेमीच बंद असते, प्रत्येक शिक्षकाकडे त्याची किल्ली असते, त्यामुळे ते केव्हाही कुलूप उघडून आत जाऊ शकतात. प्रत्येक शिक्षकाचा वर्ग ठरलेला. शिक्षकानं स्वत: तो उघडायचा. त्यामुळे शिक्षकाच्या अनुपस्थितित तिथे कोणीतरी जाऊन तिथल्या मूल्यवान वस्तूंची चोरी, मोडतोड करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्या वर्गातील वस्तूंची नी व्यवस्थेची जबाबदारी त्या त्या शिक्षकावर असते. ग्रंथालयाला कायम कुलूप असते, पण प्रत्येक शिक्षकाकडे त्याची किल्ली असते. त्यामुळे शिक्षक केव्हाही, रात्रीही आपल्या इच्छेप्रमाणे गरजेप्रमाणे ग्रंथालयात जाऊ शकतात. (विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालय ठराविक वेळी उघडे असते. त्या वेळी तिथे ग्रंथपाल उपस्थित असतात.) ह्या पद्धतीमुळे एकूण व्यवस्था सोपी होते, पण त्यातली सर्वात महत्त्वाची गोष्ट मला नेहमी जाणवते, आवडते ती म्हणजे तुमच्यावर दाखवला जाणारा विश्वास. अनेक घरातून नवराबायको नोकरी करणारे असतात तिथे अशी आईवडिलांच्या, मुलांच्या गळयात त्यांच्या घराची, फ्लॅटची किल्ली अडकवलेली असते. ती पाच/सात वर्षांची मुलं घराची किल्ली सांभाळून असतात नि बिनधोकपणे सर्वत्र हिंडत असतात. केवढी सामाजिक सुरक्षितता नांदते आहे तिथे !

माझे तास आठला सुरू व्हायचे. त्यापूर्वी मी काही वेळ शिक्षकांच्या खोलीत जात असे— शिक्षकांची खोली म्हणजे एक मोठा हॉल होता. जमिनीवर वॉल टु वॉल हिरवागार जाडजूड गालिचा पसरलेला. दहा/बारा प्रशस्त खुर्च्या गोलाकार मांडलेल्या. मध्यावरच्या काचेच्या फुलदाणीत रोज टवटवीत फुलं दिसायची. कोण कधी आणून ठेवायचे ते कधीच

दिसलं नाही. एका कोपऱ्यात मोठं टेबल, त्याभोवती लाकडी खुर्च्या नि टेबलाच्या एका कोपऱ्यात टंकयंत्र. टेबलासमोरच्या कोपऱ्यात "प्लेन पेपर कॉपिअर" (ह्याला आपल्याकडे ऑटोमॅटिक झेरॉक्स म्हणतात.) टंकयंत्र आणि प्लेन पेपर कॉपिअर ही शिक्षकांच्या वापरासाठीच बसवलेली यंत्रं. आपल्याला हवा असलेला मजकूर व्यवस्थित टाईप करायचा नी कॉपिअरवर त्याच्या हव्या तेवढ्या प्रती काढायच्या. दोन कागदांमध्ये कार्बन घालून कॉपीज् काढायची पद्धत जर्मनीत तरी इतिहासजमा झालेली आहे, कधीच.

आठ ते साडेदहापर्यंत तास झाल्यावर साडेदहा ते पावणेअकरापर्यंत मधली सुट्टी असायची. ह्या वेळात आम्ही शिक्षकमंडळी कॉफीपानासाठी तळघरातल्या जेवणघरात जमायचो. शिक्षक सगळेच जर्मन होते. जर्मन नसलेला मी एकमेव. ऽगॉअठऽ इन्स्टिटूट्च्या ह्या ग्यॉटिंङेन शाखेचे प्रभारी डिरेक्टोर होते हेर डेस्टलर. डेस्टलर ह्यांच्याप्रमाणेच फ्राऊ रोगाला आणि हेर रोगाला ह्या शिक्षक सहकाऱ्यांशी माझी चांगलीच गट्टी जमली होती. कॉफी पिताना आमच्या थोड्याफार गप्पा चालायच्या. घंटा होताच सर्वजण तत्परतेनं वर्ग गाठायचे.

कॉफीपानानंतर चपळाईनं वर्गाकडे जात असताना आज हेर डेस्टलर माझ्याजवळ आले.

"हेर विनीवालऽ!"

"बिटऽ! बोला, काय विशेष?" मी म्हटलं.

"आज तुमचे तास आटोपले ना एक वाजता की, तुम्ही जेवायला खालच्या जेवणघरात जाऊ नका!"

"बरं!"

"आज आपण बाहेर जाऊ या!"

"ओ के! आणखी कोण येणार आहे?"

"फ्राऊ रोगाला नी हेर रोगाला!"

"ओ के! च्युस!"

"च्युस!"¶

एक वाजता तास संपवून मी सरळ माझ्या खोलीत गेलो. दप्तर ठेवून तोंडबिड धुवून शिक्षकांच्या खोलीत आलो. हेर रोगाला कसल्याशा कॉपीज काढत होते. फ्राऊ रोगाला सिग्रेट शिलगावून त्याच्या वलयांकडे पाहत धूम्रपान करत होत्या. मी त्यांच्याशी गप्पा करत बसलो. थोड्याच वेळात हेर डेस्टलर त्यांची कार्यालयीन कामं आटपून आले नी आम्ही सगळेच निघालो.

रोगालांची लाल फोल्क्स वागेन निघाली. हेर रोगाला मागे बसले. डावीकडे फ्राऊ रोगाला चक्रधर, नव्हे चक्रधारिणी नी त्यांच्या उजवीकडे मी. इथल्या आउटोबानवरून मोटारी वगैरे स्वचालित वाहनं तुफान वेगानं धावतात. आउटोबान हे युरोपचं वैशिष्ट्य

¶ च्युस म्हणजे अच्छा! बरोबरीच्या नात्यातील मंडळी थोड्या वेळासाठी एकमेकांपासून दूर जाताना च्यूस म्हणून निरोप घेतात.

आहे तर जर्मनीचं वैभव ! किमान चार-चार धावपट्टयांचे सरळसोट रस्ते. ह्या रस्त्यांवर कुठेही क्रॉसिंग नसतं, वेडीवाकडी वळणं नसतात. जगातला पहिला आउटोबान् १९३२ मध्ये कॉल्न-बोन ह्या शहरांच्या दरम्यान बांधला गेला. जलद वाहतुकीच्या सोयीच्या अशा रस्त्यांचं जाळंच हिटलरच्या काळात बांधलं गेलं. पुढेमागे युद्ध करण्याच्या अचाट कल्पना त्याच्या डोक्यात मुळातच होत्या नी युद्ध सुरू झाल्यावर त्याला अशा आउटोबानचा खूप उपयोग झालाही. मोटारीत पुढच्या बाजूला बसणाऱ्यांनी एक पट्टा खांद्यातून अडकवून स्वतःला सीटला बांधून घेतलंच पाहिजे असा नियम आहे. नियमांचं कडक पालन इथले नागरिक कटाक्षानं करतात !

वाटेत डेस्टलर त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या पत्नीला बरोबर घऊन आम्ही पुढे निघालो. आमच्या मोटारी हानोफरच्या दिशेनं जाणाऱ्या ऑटोबानवरून जणू उडत होत्या.

मध्य जर्मनीच्या ह्या भागात रम्य वनश्रीनं नटलेला जो डोंगराळ भाग आहे त्याला हार्त्स प्रदेश म्हणतात. हार्त्स भाग जर्मन वाङ्मयातही अतिशय गाजला होता एकेकाळी. आता त्याचा बराचसा भाग पूर्व जर्मनीत येतो. हार्त्सच्या पश्चिमेकडे असलेल्या " रोडऽ· टाल् " ह्या रम्य घळीकडे आता आम्ही चाललो होतो. पन्नास-साठ किलोमीटर दूर असलेल्या रोडऽटाल्ला पोहोचायला आम्हाला अर्धा तासही लागला नाही.

उंच टेकड्यांमध्ये एका छोट्याशा ओढ्याजवळ वसलेल्या चार उंबरठ्याच्या वाडीत आमच्या मोटारी येऊन पोहोचल्या.

उंच नी उतरत्या छपराच्या एका रेस्टॉरंटच्या आवारात येऊन आम्ही थांबलो.

छोटेखानी पण अत्यंत स्वच्छ नी सुंदर रेस्टॉरंटच्या मुख्य हॉलमध्ये खिडकीजवळच्या टेबलापाशी आम्ही स्थानापन्न झालो.

मी पाहुणा असल्यामुळे मेन्युकार्ड आल्यावर डेस्टलर महाशयांनी ते माझ्या हातात दिले. मी ते उचलून फ्राऊ डेस्टलर ह्यांच्यासमोर ठेवलं. इथली माणसं जे खातात तेच आपण खायचं हे तत्त्व मी पहिल्या दिवसापासूनच ठेवलं होतं. डेस्टलरबाईंनी त्यांच्या आवडीनुसार सर्वांसाठी पदार्थांची फर्माइश केली.

" वास ट्रिंकेन झी ? काय पिणार ?"

ह्या प्रश्नाला मात्र मी तावडतोब उत्तर दिलं, " वाइस वाईन !" ह्या भागातली पांढरी पारदर्शक वाईन प्रसिद्ध असल्यामुळे मी तिचंच नाव घेतलं. सगळ्यांची आवड तीच होती.

चिनी मातीच्या छोट्या छोट्या नक्षीदार सुरया टेबलावर आल्या. त्यांना साजसे पेले. आम्ही वाईन पेल्यात ओतून घेतली.

" प्रोस्ट ! प्रोस्ट !"

" प्रोस्ट ! प्रोस्ट !"

सर्वांनी आपापले ग्लास उंचावले. आहा ! वाईनचा स्वाद अप्रतिम नी तिची चव तर

काय वर्णावी !!!

( ड्रिंक्स घेण्यापूर्वी आपापले भरलेले ग्लास उंचावण्याची पद्धत जर्मनीत आहे पण ते एकमेकांवर आपटण्याची नाही. आपापल्या जागेवर बसून ही मंडळी ग्लास उंचावून एक-मेकांकडे बघतात नि ग्लास ओठाला लावतात. उंचावलेला ग्लास ओठाशी नेऊन मगच खाली ठेवायचा ! )

सूप, मटण, किवी आइस्क्रिम असा लांबलचक, पद्धतशीर खाना. कोल्हापुरी पद्धतीनं सांगायचं तर शिस्तीत चालू होता. कसलीही घाई नव्हती.

डेस्टलरबाई एका माध्यमिक शाळेत शिक्षिका होत्या. त्यामुळे आमच्या गप्पा स्वाभा-विकच शिक्षणक्षेत्राशी संबंधित अशाच होत्या. अभिजात वाङ्मयाचा उपयोग परकीय भाषा शिकवताना कसा करून घेता येईल हा आमच्या गप्पांमधला एक मुख्य विषय होता.

हेर रोगाला काही काळ इंग्लंडमध्ये होते. त्यामुळे थोडीफार इंग्लिश, जर्मन ह्यांची काही विशिष्ट संदर्भातली तुलना पण झाली. परकीयांसाठी इंग्लिश वाङ्मयातल्या विशेष कलाकृतींच्या जशा अनेक प्रकारच्या आवृत्त्या असतात, अनेक स्तरांवर त्या कलाकृती सांग-ण्याचा प्रयत्न होतो तसा जर्मन वाङ्मयाबाबत झालेला नाही. उदाहरणार्थ; इंग्लिशमध्ये शेक्सपिअर मूळ स्वरूपात उपलब्ध आहे. उदा. हॅम्लेट. हॅम्लेट हेच नाटक आधुनिक इंग्लिश भाषेत उपलब्ध आहे. हॅम्लेट या नाटकाची कथा (Story retold) उपलब्ध आहे. मुलां-साठी अतिशय सोपी करून सांगितलेली हॅम्लेटची कथा उपलब्ध आहे. इंग्लिश शिकवणाऱ्या परभाषिकांसाठी सोप्या भाषेत सांगितलेली हॅम्लेटची कथा उपलब्ध आहे; एवढंच नव्हे तर कॉमिक्स सिरिजमध्येही हॅम्लेट आहेच ! योहान वोल्फगाङ्. फोन्ग्योअठऽचा " वेर्टेर " जगात इतका गाजला पण त्यावर अशा प्रक्रिया झाल्या नाहीत. आमची ही चर्चा इतरांना अर्थातच नवीन होती. जर्मनांनी इंग्रजांप्रमाणे वसाहती केल्या नाहीत, करता आल्या नाहीत त्यामुळे. इंग्रजांना इंग्लिशबाबत जे अनेक प्रयोग करावे लागले/करायची संधी मिळाली तशी संधी जर्मनांना पूर्वी लाभलीच नाही. (नशीब !! ) त्यामुळे जर्मन भाषेच्या विस्तारा-बाबत वेगवेगळे प्रयोग करायची संधीच त्यांना लाभली नव्हती. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र जर्मन भाषेच्या प्रसाराचे पद्धतशीर प्रयत्न सुरू झाले आहेत.

किवी आइस्क्रिमनंतर पाचच्या सुमारास आम्ही उठलो. आमच्या मोटारी ग्यॉटिङनच्या दिशेनं सुसाट पळत होत्या. सूर्य पश्चिमेकडे कलला होता. सूर्यास्ताला अजून जवळजवळ सव्वातीन साडेतीन तास अवकाश होता.

आज संध्याकाळी आठ वाजता माझं एक व्याख्यान होणार होतं. शिक्षक, विद्यार्थी सर्वां-साठीच खुलं होतं. " भारतीय भाषा आणि लिप्या " ह्यावर मी बोलणार होतो आता मला त्या व्याख्यानाचे वेध लागले होते.

हेर डेस्टलर वाटेत वळून आपल्या घरी गेले. रोगाला पतीपत्नींबरोबर मी गावाच्या

मध्यभागी उतरलो. ते शॉपिंगला गेले. मी पाय मोकळे करण्याच्या उद्देशानं चालत चालत नान्सेन हाऊसवर आलो. संध्याकाळ होत होती. वातावरण हळूहळू धुंद होत होतं.

जरासा फ्रेश होऊन मी व्याख्यानाच्या तयारीला लागलो. व्याख्यानाच्या वेळी ओव्हरहेड प्रोजेक्टरवर दाखवता येतील असे माहितीचे अनेक तक्ते आदल्या रात्री तयार केले होते. त्यावरून पुन: एकदा नजर टाकली. सर्व ठीकठाक होते.

व्याख्यानाच्या पंधरा मिनिटं अगोदर मी स्लाइडस् वगैरे घेऊन निघालो.

दोनच मिनिटात मुख्य इमारतीच्या तळमजल्यावरच्या ज्या वर्गात माझं भाषण होणार होतं तिथं आलो. वर्ग कोणीतरी नुकताच उघडून ठेवलेला होता. बाहेर एका फळ्यावर भाषणाचा विषय, वेळ इत्यादि माहिती व्यवस्थितपणे लिहून ठेवलेली होती.

वर्गात शिरून मी ओव्हरहेडप्रोजेक्टर चालू करून बघितला. व्यवस्थित काम देत होता, पण मी मात्र आता थोडासा अस्वस्थ झालो होतो. व्याख्यान सुरू व्हायला आता अवघी दहा मिनिटंच राहिली होती नि वर्ग चक्क रिकामा होता ! असं का व्हावं ? हे मला समजेना. माझं ते पहिलंच जाहीर व्याख्यान होतं. " प्रथमग्रासे..." मी अगदी बेचैन झालो. अशी काय ही माणसं ? आता किमान हेर डेस्टलरनं तरी यायला नको होतं का ? संस्थेचे निर्देशक नि तेसुद्धा व्याख्यानाला नाहीत ? बरं, दुपारीच आम्ही इतके तास बरोबर होतो. गप्पागोष्टी केल्या होत्या. बरोबर जेवलो. बरं, रोडऽटालूहून निघताना मी संध्याकाळच्या व्याख्यानाचं स्मरण दिलं होतं. नी त्यांनीही लक्षात असल्याचं म्हटलं होतं. मग अजून कसे आले नाहीत ? रोगाला पतीपत्नीही अजून आलेले नव्हते. त्या पाच-सात मिनिटात मी कमालीचा अस्वस्थ झालो.

आठ वाजायला तीन-चार मिनिटंच कमी होती. पाच-सात विद्यार्थी तेवढे येऊन बसले होते, पण शिक्षकांपैकी कोणाचाच अजून पत्ता नव्हता ! श्रोत्यांच्या अभावी आजचं व्याख्यान रद्द करावं लागणार ह्याबद्दल माझी खात्री झाली नी स्लाइड्स वगैरे साहित्य मी पुन: पिशवीत कोंबण्याच्या तयारीत होतो, एवढ्यात–

" गुटेन् आबेन्ट हेर बिनीवालऽ !" म्हणत हेर डेस्टलर आत आले. आठ वाजायला दोन मिनिटं कमी होती.

" मग, सगळी तयारी झाली की नाही ?" त्यांनी आस्थेनं चोकशी केली.

" हो ! तशी तयारी झाली सगळी पण अजून श्रोत्यांचा मात्र पत्ता नाहीये !" मी निराशेनं म्हटलं.

" तसा अजून अवकाश आहे." आपल्या घड्याळाकड नजर टाकत डस्टलर म्हणाले– " अजून दोन मिनिटं आहेत. वरती येतील." असं म्हणून हेर डेस्टलर समोरच्या खुर्चीवर जाऊन आरामात बसले !

–नी त्या दोन मिनिटात माझा पूर्ण अपेक्षाभंग झाला ! त्या अपेक्षाभंगानं मी अत्यंत

आनंदित झालो–शेवटच्या दोन मिनिटात अक्षरश: गर्दी करून अनेक श्रोते बघता बघता जमा झाले. घड्याळाकडे बघत बघत रोगाला पतीपत्नीही आत शिरले.

"अगदी वेळेवर आलो की नाही ?" फ्राऊ रोगाला म्हणाल्या.

"एकदम वेळेवर !" मी ओढून ताणून हसू आणत म्हटलं. मनात म्हटलं, गेल्या पाच मिनिटात माझ्या तोंडचं पाणीच पळालं होतं ! केवढा विलक्षण वक्तशीरपणा हा ! !

साठसत्तर श्रोत्यांसमोर भाषण केले. त्यानंतरचा प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम फारच छान झाला. बहुतेक श्रोत्यांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरं देता आली. काहींच्या प्रश्नांवर मात्र मला पुरेशी माहिती देता आली नाही. थाप मारायची नाही. येत नसेल, माहीत नसेल तर तसं स्पष्ट सांगायचं हे मी सुरूवातीपासूनच ठरवलेलं होतं. माझ्या या धोरणाची तारीफ नंतर हेर डेस्टलरनं बरीच केली. भाषण नी प्रश्नोत्तरांचा सव्वा तासाचा कार्यक्रम झाला.

ग्योटिंडेनमधल्या दोघा भारतीय मित्रांची अनुपस्थिती मात्र मला तीव्रतेनं जाणवली. "आम्हाला भाषण कळण्याइतकं जर्मन येत नाही." हे कारण त्यांनी सांगितलं. ते तसं खरंही होतं. पण माझ्या प्रेमाखातर ते तिथे नुसते येऊन बसले असते तर ?

भाषण सुरू व्हायला दोनच मिनिटं असताना श्रोते मंडळी भराभर आली. वक्तशीरपणा ! भाषण संपल्यावरही त्याचप्रमाणे–नव्हे, त्याहीपेक्षा कमी वेळात ही मंडळी पांगली ! दोन मिनिटांपूर्वी इथे साठसत्तर श्रोते बसले होते हे कुणाला खरंही वाटलं नसतं !

ह्या पहिल्या जाहीर व्याख्यानानंतर माझा आत्मविश्वास खूपच दृढावला. रात्रीचं जेवण मी, डॉ. वर्मा नि डॉ. फ्रान्सिस तिघे मिळून करायचो. आज मी भाषणात गुंतलो होतो त्यामुळे त्या दोघांनीच स्वयपाक उरकला होता नी व्याख्यान आटपून मी वरती गेलो तेव्हा अक्षरश: माझं पान वाढून तयार ठेवलं होतं !

स्वयंपाकाला सुरुवात केल्यापासून जेवण करून भांडी घासून धुवून पुसून होईपर्यंत जर्मन, जर्मनी अशा कुठल्याही विषयावर बोलायचं नाही, असा जणू आमचा संकेत होता. आमच्याकडे लता मंगेशकरच्या अल्बर्ट हॉलमधल्या कार्यक्रमाची एक कॅसेट होती. ती एकमेव कॅसेट आम्ही आमचा जेवणाचा कार्यक्रम होईपर्यंत आलटून पालटून पुन:पुन: लावायचो नी भारतीय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न करायचो.

सारी आवराआवर झाली की आम्ही फिरायला बाहेर पडायचो. रोजच फिरून आल्यावर पुढच्या दिवसाची तयारी. त्या वेळी अनेक विद्यार्थी व्याकरणातल्या शंका विचारायला येत असत. दुपारीही यायचे. त्यांना मदत करणं हे मोठंच काम होतं. पण अतिशय आनंद देणारं. आज दुपारी मात्र रोडऽटालला गेल्यामुळे मार्गदर्शनाचं काम राहिलं होतं. गप्पा मारत, गाणी ऐकत जेवणं झाली. आवराआवर झाली.

"तो अब घूमने जाएँगे ना ? या आज आप थक गए है ?" वर्मा म्हणाला.

"नहीं जी, बिलकुल नहीं ! चलिए भाई, ग्योटिंडेन में चक्कर लगानेका मौका जिंदगी

में बार बार आए न आए, पता नहीं. लेकिन जो मौका मिला है उसे तो हाथसे जाने नहीं देंगे, क्यो ?" मी म्हटलं. आम्ही तिघेही निघालो.

शतपावलीच्या संथ गतीनं आम्ही गावाच्या मध्यभागी–पादचारी मार्गावर आलो.

रस्त्यातून तरुणतरुणींचे घोळके फिरत होते, गात होते, आईस्क्रिम खात होते. गप्पागोष्टी करत, हसत, खिदळत, मजा करत होते. कुठेही वाह्यातपणा नव्हता.

राट्हाऊस् समोरच्या जगप्रसिद्ध कारंज्याच्या कट्टयावर आम्ही तिघे बसलो होतो. नक्षीदार कोरीव दगडी चबुतऱ्यावर छोटंसंच पण अत्यंत देखणं कारंजं अत्यंत गुंतागुंतीच्या पण विलक्षण कलात्मक अशा चार नाजुक खांबांवर एक तशाच प्रकारचा जाळीदार घुमट आणि त्या आगळचावेगळचा जाळीच्या छत्रीखाली "गेन्स ऽ ह्चुट्रिन" नावानं प्रसिद्ध असलेला एका सुंदरीचा तितकाच देखणा रेखीव पुतळा !

बसल्यामुळे थंडी वाजायला लागली होती. आम्ही तिथून उठलो.

गेन्स ऽ ह्चुटरिनच्या पुतळचासमोरच मुख्य रस्त्याला लागून एका भला मोठा पितळी गोळा होतो नी तो चक्रासारखा गरागरा फिरत असे.

आम्ही संध्याकाळी जेव्हा फिरायला यायचो तेव्हा त्या गोळचावर हमखास मुलांची गर्दी असायची. सुमारे मीटरभर उंचीच्या त्या गोळचावर दोन तीन मुलं बसलेली असायची आणि दोन–तीन मुलं खाली उभी राहून तो गोळा गरगर फिरवत असायची.

"हे कशाचं प्रतिक असेल बरं ?" फ्रान्सिसची शंका.

"हा गोल आहे. वरून किंचित चपटा नी आपल्याभोवती फिरतो त्या अर्थी हे पृथ्वीचंच प्रतिक आहे !" असे म्हणत मी कौतुकानं त्या गोळचाजवळ जाऊन त्यावर प्रेमानं हात ठेवून उभा राहिलो. त्या पृथ्वीच्या ध्रुव प्रदेशावरून प्रेमानं हात फिरवला. भ्रमंतिबद्दलच्या माझ्या साऱ्या कल्पना जणू उचंबळून वर येत होत्या. खरीखुरी पृथ्वी, तिच्यावरचे विविध अनुभव, येतील का कधी आपल्या हातात ?...मी विचारात, कल्पनांच्या राज्यात हरवलो होतो.

"क्या सोच रहे है जी ?" वर्मा.

"पृथ्वी की परिक्रमाके बारेमें सोच रहा हूँ !" मी हसत हसत म्हटलं.

"तो बैठ जाइए न, पृथ्वीपर !" वर्मांनी सुचवलं. मी झटकन उडी मारून त्या गोळचावर बसलो, लहान मुलांसारखा. वर्मा नी फ्रान्सिस किती तरी वेळ कडेला उभे राहून तो गोळा फिरवित होते. मी परिक्रमा करत होतो !

☐

# डाखाउ

काही शब्द इतके बदनाम झालेले असतात की त्यांचा उच्चारही नकोसा वाटतो! तसला एखादा शब्द जरी कानांवर पडला तरी अंगावर शहारे येण्याची शक्यता असते. "आउश्वात्इस" नी "डाखाऊ" हे तसलेच दोन शब्द. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात मानवतेलाच कलंक फासणाऱ्या भयानक घटना इथे घडल्या. ज्यूंचं शिरकाण करणारी यातनागृहं, नात्सीमधल्या विकृत मेंदूच्या, उलट्या काळजाच्या नराधमांनी चालविली होती. आउश्वाइत्स आहे पोलंडमध्ये, नी डाखाऊ जर्मनीत-पश्चिम जर्मनीत.

ज्यूंवर केलेले अत्याचार वाचून माहीत होते ते हीन अत्याचार नी यातनागृहांमधले पाशवी वातावरण अनेक युद्धपटांतून पाहिलेलं होतं त्यामुळेच असेल; पण डाखाऊ हे ठिकाण बघण्याची मुळीच इच्छा नव्हती...भालकात श्रीकृष्णाला बाण लागला नी पुढे जवळच्याच प्रभासपाटण गावी श्रीकृष्णानं देहत्याग केला. ती ठिकाणं बघताना मी अस्वस्थ होतो. डाखाऊ ही तर अगदी कालपरवाची गोष्ट. आपल्याला ते बघवणार नाही असं वाटायचं नी त्यासाठी मी डाखाऊला जायचं टाळत होतो.

युरोपची सफर करण्यासाठी मामा आला होता. त्याच्या एका स्नेह्यांना भेटण्यासाठी आम्ही म्युअॅन्शेनला गेलो होतो. म्युअॅन्शेनमध्ये मनसोक्त भटकलो पण एक इच्छा राहून गेली. नी ती पूर्ण करण्यासाठी आम्ही आणखी अर्धा दिवस म्युअॅन्शेनमधला मुक्काम वाढ-

वला. ती इच्छा होती तशी छोटीशीच. १९७२ मध्ये म्युअॅन्शेनला ऑलिम्पिक स्पर्धा झाल्या. ते ऑलिंपिकनगर आम्ही बघितलं तेव्हा लक्षात आलं की त्या वेळच्या ऑलिम्पिक तलावात पोहण्याची सोय अजूनही आहे.

ऑलिम्पिक स्पर्धांत भाग घेण्याचं वयसुद्धा गेलं. स्पर्धेत नाही तरी निदान त्या तलावात पोहावं अशी जबरदस्त इच्छा होती. पण बरोबर कपडे नेले नव्हते. म्हणून ती इच्छा राहून गेली. घरी आल्यावर असं ठरलं की रविवारी सकाळी पुन: एकदा ऑलिम्पिक-नगरीत जाऊन पोहण्याचा आनंद लुटावा ! पोहण्याची माझी इच्छा पूर्ण झाली. त्यामुळे आता मामालाही आपला हट्ट पुरवून घ्यावा असं वाटलं नी आम्ही डाखाऊला जायचं निश्चित केलं.

म्युअॅन्शेनच्या उत्तरेला जेमतेम १५।१६ किलोमीटर अंतरावर डाखाऊ वसलेलं आहे. छोटंसं तीस–पस्तीस हजार वस्तीचं टुमदार गाव. गाडीनं काही मिनिटातच आम्ही डाखा-ऊच्या रेल्वेस्टेशनवर उत्तरलो.

जेव्हा आपण एखाद्या गावात बघायला, अनुभवायला जातो तेव्हा टॅक्सीनं किंवा बसनं जाणं टाळणंच योग्य असतं. पायी भटकून आपल्याला जे उदंड बघायला मिळतं, अनु-भवायला मिळतं त्याला खरोखरच पर्याय नाही ! माझ्या भटकंतीत हा नियम मी पाळत आलो आहे. त्यामुळे मी स्टेशनवर उतरल्यावर प्रथम गावाचा नकाशा मिळवायचा प्रयत्न केला. पण दुर्दैवानं तिथलं माहिती केन्द्र बंद होतं. (रविवार होता ना ! )

"कोन्त्सेन्ट्रात्सिओन्स्लागरकडे– यातना गृहाकडे जाणारा–रस्ता कोणता हो ?" स्टेशनबाहेर येऊन मी एका वृद्ध गृहस्थांना विचारलं.

"ती पहा, समोर बस उभी आहे ना ती थेट यातनागृहापाशी नेऊन सोडेल तुम्हाला !" त्या गृहस्थांनी सुचवलं.

"ते ठीक आहे, पण चालत जायचं झालं तर ?" माझा चालण्याचा आग्रह कायम ठेवत मी विचारलं.

"चालत ?" माझ्याकडे कटाक्ष टाकत ते म्हणाले, "इथून असे सरळ चालत जा, पुढच्या चौकात गेलात म्हणजे कोणाला तरी विचारा..."

"धन्यवाद !"

"...बसचं तिकिट फक्त १ मार्क २० प्फेनिशच आहे. यातनागृह तसं दूर आहे..."

"असू दे ! जाऊ आम्ही !" त्या वृद्ध गृहस्थांचे पुन्हा एकदा आभार मानून आम्ही चालू लागलो.

कॉन्सेन्ट्रेशन कॅम्पकडे जाणारी बस खच्चून भरली होती. काही उतारू तर चक्क उभे होते ! त्यात खूपसे अमेरिकेतले हौशी प्रवासी होते हे त्यांच्या बोलण्यावरून लगेच लक्षात आलं. गळ्यात कॅमेरे अडकवलेली काही वृद्ध जोडपी मजेत उभी होती. हसत खिदळत, न

कुरकुरता. सेकंदभर बसची गंमत बघून आम्ही पुढे निघालो.

खूप वेळ सरळ सरळ चालत गेल्यावर एक नवयुवती दृष्टीस पडली.

"यातनागृहाकडे जायचा रस्ता कोणता हो ?" नमस्कार-चमत्काराचे सारे सोपस्कार करून मी तिला विचारलं.

"यातनागृह ?" लांबडा चेहेरा करत तिनं आमच्याकडे अत्यंत विचित्र नजरेनं बघितलं, नी खूप विचार केल्यासारखं दाखवून सेकंदभरातच म्हणाली, "मला नाही माहीत !"

"माहीत नाही ?"

"नाही !" ती युवती निघून गली.

"कमाल आहे ! इतकं कुप्रसिद्ध यातनागृह नी ह्या मुलीला ठाऊक नाही ? कसं शक्य आहे ?" आम्ही दोघं गोंधळलो होतो. एवढ्यात एक चाळिशीचे गृहस्थ भेटले. त्यांनी आम्हाला रस्ता सांगितला. आम्हाला स्वतंत्रपणे आलेल्या अनुभवांच्या संदर्भात आम्ही बोलत चाललो होतो.

"ती मुलगी तर ह्याच गावातली दिसत होती. इथला कॅम्प तर जगप्रसिद्ध नी हिला कसा माहित नाही ?" मामाची शंका.

"डाखाऊ तसं जुनं गाव आहे, इथं किल्ला आहे, राट्हाऊस आहे. अशी चांगली ठिकाणं सोडून आपण चाललो यातनागृह बघायला ! युद्धकाळातल्याच नव्हे तर १९३२–३३ पासूनच्या दुःखद आठवणी पुसून टाकण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे ह्या नव्या पिढीला ते यातनागृह माहित नसेल..."

"मला नाही ते खरं वाटत." मामा म्हणाला, "ते तर ऐतिहासिक सत्य आहे. इतिहास असा पुसता येत नाही..."

आमची जोरदार चर्चा रंगात येत होती. तोच पुनः एकदा एका चौकापाशी आलो नी आता कोणत्या रस्त्यानं जावं असा प्रश्न पडला. युरोपात ही अडचण तीव्रतेनं जाणवते. आपल्याकडे रस्त्यावरून शेकडो माणसं जात असतात, त्यामुळे अडचण पडत नाही. इथे म्हणजे मोटारी शेकडो जातील पण पादचारी क्वचित्–

एवढ्यात एक सज्जन आमच्या बाजूलाच येताना दिसला.

"गुटेन् टाक् !"

"गुटेन् टाक् !"

"यातनागृहाकडे जाणारा रस्ता कोणता ?"

"चला, मी त्या बाजूलाच चाललो आहे..." आम्ही त्या गृहस्थाबरोबर चालू लागलो.

"मघाशी आम्ही एका मुलीला विचारलं तर तिनं चक्क माहीत नाही म्हणून सांगितलं." मामा तक्रारीच्या सुरात म्हणाला.

"त्याचं असं आहे–" तो सज्जन गृहस्थ जरासा थांबला. आवंढा गिळून पुढे बोलू

लागला, " डाखाऊचं यातनागृह म्हणजे अखिल मानवजातीवरचाच कलंक आहे. आमच्या गावात असल्यामुळं आमचं दुःख तर अपार आहे ! ...१९३३ ते १९४५ ही आमच्या देशाच्या इतिहासातील काळी वर्षं."

" नात्सी लोक अजून आहेत ?" मामाचं कुतूहल.

" हंऽ !" तो सज्जन विचित्रपणे हसला.

" हिटलर मेला की अजून जिवंत आहे ?" मामांचे औत्सुक्य.

" कोण जाणे ! जिवंत असेल किंवा आत्महत्या करून मेला असेल. पण जर्मन राष्ट्राची मात्र त्यानं निर्घृण हत्या केली. आमच्या देशाचे तुकडे तुकडे झाले !" त्या गृहस्थाचं दुःख शब्दाशब्दातून जाणवत होतं, " आमच्या देशाचा इतिहास म्हणजे विभाजनाचाच इतिहास आहे..." ४५।५० वयाचा तो सज्जन भावनाविवश झाल्यासारखा वाटत होता. खरं तर असं क्वचित घडतं.

" हिटलरचं एखादं स्मारक आहे का हो जर्मनीत कुठे ?" मामाची जिज्ञासा.

" स्मारक ? आहे ! त्याच्या दुष्कृत्यांचं स्मारक आहे ! इथेच आहे की ! बघालच तुम्ही थोड्या वेळात ! आता तुम्ही ह्या रस्त्यानं सरळ जा. पाचच मिनिटात पोहोचाल तुम्ही तिथे !" एका रस्त्याकडे बोट दाखवत त्यानं सांगितलं.

" धन्यवाद ! आउफ वीडरझेएन !"

" वीडरझेएन !" संथ पावलं टाकत तो सज्जन गृहस्थ दुसऱ्या रस्त्यानं चालू लागला.

इतका अस्वस्थ का झाला असेल तो गृहस्थ ? मी स्वतःशीच विचार करत होतो. तिथले पाशवी अत्याचार त्यानं स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले असतील का ? त्याचा कोणी सगा सोयरा किंवा एखादा जिवलग मित्र तर इथल्या अत्याचारात भरडला गेला नव्हता ना ? त्यानं नक्कीच प्रत्यक्ष बघितलेलं असणार नाहीतर ४०/४५ वर्षांपूर्वीच्या घटनांच्या नुसत्या आठवणींनी अशी कालवाकालव झाली नसती !

" आपले बाबुराव कराचीतला हलकल्लोळ सांगताना असेच अस्वस्थ होतात, नाही ?" मी मामाला म्हटलं.

" हो ना ! त्यांनी प्रत्यक्ष अनुभवलं आहे, भोगलं आहे !" मामा.

इस्लामच्या हाकाटीनं देशाच्या अनेक कानाकोपऱ्यातले मुसलमान मोठमोठ्या आशा-आकांक्षा बाळगून लोभानं कराचीत आले होते. तिथे तर त्यांना अंग टाकायलाही जागा नव्हती. ज्या सुंदर कराचीतले रस्ते दिवसातून दोन दोनदा धुवून पुसून स्वच्छ केले जात तिथे आता रस्त्यावर लोकांनी ठाण मांडलं होतं. नरक थाटला होता. नी अचानकपणे पावसानं हाहाःकार केला. निर्वासित म्हणून रस्त्यावर रहाणारे मुसलमान घरातून घुसले नी घरातून रहाणारे हिन्दु निर्वासित झाले. पळापळ-मारामाऱ्या-दंगे-रक्तपात...हे सारं वर्णन करताना बाबुरावांचा हात अजूनही थरथरतो, आवाज चढतो. दुःखावेगानं पुन्हा

खाली येतो. जणू त्या घटना आत्ताच त्यांच्यासमोर घडत आहेत...

खरोखरच पाच मिनिटात आम्ही यातनागृहापाशी येऊन पोहोचलो. बाहेरच्या मोकळ्या जागेत बऱ्याच टूरिस्ट बसेस थांबलेल्या होत्या. ज्याच्या अस्तित्वाचीही स्थानिक जर्मनांना लाज वाटते तेच ठिकाण बघण्यासाठी बाहेरच्या देशातून लोक गर्दी करून आलेले होते ! वेळ नी पैसा खर्च करून यातनागृह बघायला, नी नंतर हळहळ व्यक्त करायला. काय गंमत आहे !

यातनागृहाचं आवार खूपच प्रचंड. त्याच्या मुख्य इमारतीत आता वस्तुसंग्रहालय आहे. त्यासमोर विस्तीर्ण मैदान नी पलिकडे बराकी.

मैदान ओलांडून आम्ही बराकींपाशी आलो. आतल्या बाजूला कुजबूज चालू होती. बघायला आलेले प्रवासी आपापसात बोलत होते. मला भास झाला, कोणी रडतंय, कोणी किंचाळतंय...

" चल ना, आतून बघूया ! " मामा म्हणाला.

" अं, हो ! " मी भानावर आलो, धीर करून आत शिरलो. आत खूप माणसं होती. लाकडी पट्ट्यापट्ट्यांचे पिंजरेवजा पलंग एकावर एक असे तीन-चार. गुराढोरांप्रमाणे माणसांना डांबून ठेवण्यासाठी माणसांनीच बनवलेले पिंजरे. मृत्यूचे सापळेच होते ते. त्याच काळात घेतलेली काही छायाचित्रं आसपास लावलेली होती. त्या पिंजऱ्यातून अडकवून ठेवलेली माणसं. त्यांचे ते भकास चेहरे. बघवत नव्हते ते फोटो ! काय झालं असेल ह्या फोटोतल्या माणसांचं ? त्यातले कोणी जिवंत असतील का ?

बराकीच्या एका टोकापासून निघून घाईघाईनं मी दुसऱ्या बाजूनं बाहेर पडलो. ती पाच सात मिनिटंही मला भयंकर वाटली.

का हे सगळं असं झालं ? ज्यूंना का मारायचं ? ज्यू म्हणून ? वेगळे म्हणून ? वेगळेपण नष्ट करायचा काय अधिकार आहे एखाद्याला ? जगण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, बारक्यासारक्या जीवजंतूंनाही आहे. त्यांना नष्ट करण्याचाच काय पण त्यांच्यात ढवळाढवळ करण्याचा अधिकारही नाही कोणाला ! अखिल विश्वात जीवन असणारा पृथ्वी हा आपला एकमात्र ग्रह. विविधता हेच इतक्या समृद्ध जीवसृष्टीचं रहस्य असू शकेल ! ते आपण सहिष्णुतेनं जपलंच पाहिजे !

बराकींना लागूनच गॅस-चेम्बर्स होती, अजूनही तशाच काळवंडलेल्या स्थितीत. विषारी वायू सोडून एका वेळी अनेकांना ठार मारण्याची क्रूर कल्पना ! ते दृश्य बघूनही मला गुदमरल्यासारखं झालं.

" नाही नाही नाही !!! असं होता कामा नाही ! जातो मी ! " अत्यंत अस्वस्थ होऊन मी तिथून दूर झालो.

मधल्या मैदानाच्या कडेला एक स्मारक होतं, साधंसंच. मधल्या स्तंभावर लिहिलेले

शब्द बघून आश्चर्य वाटलं. त्यावर कोरलेलं होतं. "नी वीडर् !"

"NIE WIEDER!"

"पुन्हा कधीही नाही !" असा प्रकार यापुढे कधीही, कुठेही होता कामा नय ! त्यासाठी प्रयत्नशील राहणं हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे !

अमृतसरच्या जालियाँवाला बागेत मनावर असंच दडपण येतं. तिथे असंच हत्याकांड झालं. फरक एवढाच की ते परकीय सत्तेनं घडवलं होतं तर डाखाउमध्ये तिथल्या स्वकीयांनीच केलं ! पण शेवटी त्यात मेली ती माणसंच होती की !

"नी वीडर!"चा जप करतच आम्ही बाहेर पडलो. गप्पच होतो. यातनागृहाचा ताण अजून कमी झाला नव्हता. मुख्य रस्त्याला लागलो.

मुख्य रस्त्याच्या पादचारी मार्गावरून आम्ही चाललो होतो. आमच्या पुढून एक तरुण पति-पत्नी आपल्या तीन-साडेतीन वर्षांच्या अवखळ मुलीला घेऊन सावकाश चालले होते. त्या गोंडस मुलीला मध्ये घालून दोघे चालले होते, आणि ती आपल्या आईबाबांचा हात सोडून पळायला पाहत होती. आम्ही त्यांच्या जवळ आलो तेव्हा लक्षात आलं की ती खटयाळ मुलगी लौकरच ताई होणार आहे ! म्हणूनच ते सावकाश चालत असावेत. एवढ्यात ती अवखळ मुलगी आई-बाबांचा हात सोडून धावत सुटली. उजवीकडे. यातनागृहाच्या बाजूला नि तिचे आई-बाबा एकदम ओरडले,

"ने मारिआ नेऽ! दिअर्हेर् ! नाही, मारिआ नाही ! इकडे ये बरं !"

मारिआकडे पाहत पाहत आम्हीं पुढे गेलो. पुनः एकदा मागे वळून बघितलं.

स्वच्छ, सुंदर पदपथाच्या दोन्ही बाजूंना उंचउंच वृक्ष दाटीवाटीनं उभे होते, हिरवेगार. मारिआ आपल्या आई-बाबांचा हात धरून बडबडगीत म्हणत शाहण्यासारखी चालली होती.

❑

# आम्ही जातो आमुच्या गावा

मुक्काम शहर ग्यॉटिङेन्, हानोफरच्या दक्षिणेस ११० किलोमीटरवर.
हेमंत ऋतूच्या सुरवातीची एक सकाळ.

ब्रेकफास्ट उरकून निघालो तेव्हा वर्मांनी हटकलं, " तो आप जा रहे हैं ?"

" जी, जा रहा हूँ. डूडर्श्टाट् ! आप भी चलिए न !" मी म्हटलं.

" नहीं जी ! हमने तो लंदन, पॅरिस सब देख लिया है। डूडर्श्टाट् में होगा भी क्या !" वर्मा निराशपणे म्हणाले.

" जो कुछ भी होगा, देख लेंगे ! खैर, मैं तो चला."

मी निघालो. इन्स्टिटय़ूटच्या नान्सेन हाऊसमधून बाहेर पडून शॉर्टकटनं चालू लागलो. व्हॅक्युम्क्लीनरनं, रस्ते स्वच्छ करणाऱ्या गाडय़ा फिरत होत्या. पळायला नि जॉगिंगला बाहेर पडलेले सर्व वयातील स्त्रीपुरुष परतताना दिसत होते.

...डूडर्श्टाट् ! ग्यॉटिङेनला आल्यापासून डुडरश्टाट्ला जायचं घोकत होतो पण दर रविवारी काही ना काही कामं निघत होती, नि डूडर्श्टाट्ला जायचा कार्यक्रम लांबणीवर पडत होता. ग्यॉटिङेनच्या जेमतेम वीस पंचवीस किलोमीटर पूर्वेला असलेलं,जेमतेम पंचवीस

हजार वस्तीचं छोटसं शहर, पण तिथे जायचं जबरदस्त आकर्षण होतं मला. मध्य जर्मनीत हानोफर् आणि ड्रेस्डेन् शहरांच्या मधल्या भागात जो डोंगराळ प्रदेश आहे, त्याला हार्त्स म्हणतात. जर्मन तरुणांना ह्या प्रदेशाचं जबरदस्त आकर्षण आहे, तिथले डोंगर, जंगलं, ओहोळ, धाडसी तरुणांना साद घालत असतात. त्या हार्त्स प्रदेशाच्या किंचित दक्षिणेलाच डूडर्श्टाट् वसलेलं आहे. पूर्व जर्मनी आणि पश्चिम जर्मनी ह्या देशांना विभागणारी सीमा ह्या डुडर्श्टाट्जवळ आहे. तेच होतं माझं मुख्य आकर्षण.

ताशी दीडशे किलोमीटर वेगानं जर्मनीतल्या आउटोबानवरून बऱ्याचदा हिंडलो होतो, पण त्याच आउटोबानच्या देशातल्या ग्रामीण भागातल्या रस्त्यावरून फिरून यायची इच्छा पूर्ण करायची होती. डुडर्श्टाट्ला जाताना तो अनुभवही मिळणार होता...

श्टाट्हालऽ पार करून पादचारी विभागातल्या रस्त्यावर आलो. डावीकडच्या आकाडेमीच्या आवारातली फुलं महिन्या दीड महिन्यापूर्वी किती आकर्षक दिसत होती ! आज मात्र पार निस्तेज दिसत होती, त्यांचे रंग विटले होते.

राट्हाउसच्या प्रशस्त चौकात झोंबरं वारं सुसाट वाहत होतं. ढगाळलेल्या आकाशामुळे प्रचंड काळ्या दगडांची राट्हाउसची इमारत अधिकच गंभीर वाटत होती. तिच्या उतरत्या विशाल छपराच्या लालचुटूक कौलांच्या पार्श्वभूमीवर योहान्स चर्चच्या मनोऱ्यांची टोकं दिसत होती. चर्चमध्ये घंटानाद चालू होता, त्या कर्णमधुर नादाच्या तालावर मी चालत होतो.

राट्हाउससमोरच्या हंससुंदरीच्या कारंज्यासमोर आपोआप थांबलो ! ह्या कारंज्यासमोर आम्ही रोजच बसत होतो. रात्री बारा-साडेबारालासुद्धा ह्या हंससुंदरीच्या भोवती गराडा पडलेला असतो ! आत्ता मात्र मी एकटाच उभा होतो तिच्यासमोर ! छोटयाच पण नक्षीदार दगडी चौथऱ्यावर चार जाळीदार खांब, त्यावर तशाच प्रकारची सुंदर छत्री नी मधोमध उभी असलेली, नतमस्तक हंससुंदरी ! तास न् तास पाहत रहावं असं रेखीव शिल्प !

मला डूडर्श्टाटला जाणारी बस गाठायची होती.

बसस्टॅन्डवर आलो तेव्हा कळलं की डूडर्श्टाटला जाणाऱ्या बसेस दोन वेगवेगळया मार्गांनी जातात. बरंच वाटलं. एका मार्गानं जावं नी दुसऱ्या मार्गानं परत यावं. अधिक बघायला मिळेल अशा विचारानं झेवुर्कमार्गे जाणाऱ्या बसमध्ये चढलो. कंडक्टर-कम-ड्रायव्हरकडून तिकिट घेऊन त्याच्याच मागच्या सीटवर जाऊन बसलो. पन्नास-साठ सीटच्या लांबलचक बसमध्ये पाच-सात प्रवासीच दिसत होते. बस सुटायला अजून अवकाश होता.

वेळ झाली. सूं फटक् असा आवाज करत दार आपोआप बंद झालं. बस निघाली.

सर्व खिडक्या बंद होत्या तरी गारवा चांगलाच जाणवत होता. आपल्याकडच्या खेडयापाडयातून जाणाऱ्या बसेस जशा ठिकठिकाणी थांबत थांबत जातात तशीच ही बसपण

चालली होती ! गेओर्ग आउगुस्ट विद्यापीठाचा परिसर मागे टाकून आमची बस आता खऱ्याखुऱ्या ग्रामीण भागात शिरली होती.

तिकडच्या मानानं रस्ते अरुंदच. वळणं वेडीवाकडी पण ड्रायव्हर मात्र प्रत्येक वळणापूर्वी सावधपणे हॉर्न वाजवत होता. प्रत्येक ब्लाइन्ड कर्व्हवरच्या ठिकाणी रस्त्यावर मोठे-मोठे आरसे लावलेले होते. त्यामुळे विरुद्ध दिशांनी येणाऱ्या वाहनांच्या ड्रायव्हरांची चक्क दृष्टादृष्ट होत असे ! ह्या तंत्रामुळे अपघाताची शक्यता खूपच कमी होते. ह्या देशात माणसं कमी त्यामुळे अशा क्लृप्त्या निघत असणार.

हेमंताची सुरवात झालेलीच होती. थंडगार वाऱ्याची झुळूकही झाडांच्या पिकल्या पानांना हलवत, झुलवत, गरागरा फिरवत जमिनीवर आणत होती ! काळचाशार रस्त्याच्या कडेला पिवळसर रंगाची वाळूसारखी माती होती. त्यावर आता हिरव्या, फिक्कट पिवळ्या-पिवळ्या, गुलाबी, लालचुटूक अशा विविध रंगांच्या पानांचा सडा अखंडपणे पडत होता ! झाडांचे खराटे व्हायला सुरवात झाली होती. मोठमोठे सूचिपर्णी वृक्ष मात्र " छप्पन्न हिवाळे पचवलेत, ह्या वावटळीचं काय !" असं म्हणत निश्चल उभे होते !

वाटेत छोट्या-मोठ्या वाड्या लागत होत्या. त्यात टुमदार घरं, पुढे अंगण, मागे परसू. आसपास एखादी मोटार. माणसांची वर्दळ फारशी दिसत नव्हती. रविवार असल्यामुळे मंडळी चर्चमध्ये गेली असावीत. प्रत्येक घराच्या अंगणात, परड्यात सफरचंदाची चार-दोन झाडंतरी होतीच, फळांनी लगडलेली. खाली उतरून चार सफरचंदं तोडून घेण्याचा मोह होत होता !

"क्लाइन् लेंङ्डेन्" पाशी बस थांबली. ४/२ उतारूंची चढ-उतार होऊन बस निघाली. पाच मिनिटंही झाली नाहीत तो बस पुन्हा थांबली. "ग्रोस लेंङ्डेन्" पाशी ! ग्रोस म्हणजे मोठं नि क्लाइन म्हणजे लहान. लेंङ्डेन् गावाचे दोन प्रकार दिसत होते. आपल्याकडच्या खुर्द आणि बुद्रुकसारखे.

जंगलांखालची जमीन खूपच होती. लहानमोठ्या वाड्यांच्या भोवती असलेली शेतं आपल्याकडच्यासारखीच छोटी-मोठी होती पण वेडीवाकडी मात्र नव्हती ! सर्वांच्या सर्व शेतांच्या चतु:सीमा अगदी सरळ आखीव रेखीव. शेतातली पिकं कापून झाल्याच्या खुणा शिल्लक होत्या. कापणी झालेल्या बार्लीच्या पिकांचे एकाच उंचीतले बुडखे काही शेतात शिल्लक होते. इतरत्र पुन: नांगरणी झाली होती. स्वच्छ, मोकळी शेतं आता बर्फ पडण्याची वाट पाहत होती.

झेबुर्कच्या स्टॅन्डवर बरीच चढउतार झाली. चढलेल्या उतारूंमध्ये म्हाताऱ्यांचाच भरणा होता. मोठमोठ्या, न पेलणाऱ्या बॅगा घेऊन मंडळी आत चढत होती. म्हातारी जोडपी एकमेकांच्या मदतीनं सामानाची हलवाहलव करत होती. आमची बस आता चक्क भरल्यासारखी वाटत होती ! पण माझं लक्ष बाहेर उभ्या असलेल्या मोटारींकडे होतं.

लाल, पिवळ्या, भगव्या रंगाच्या छोट्या-छोट्या नावा त्या मोटारींवर बांधलेल्या होत्या. झेबुर्कला छोटासा तलाव आहे, त्या तलावात नौकाविहार करण्यासाठी तरुण मंडळी आपापल्या नावा घेऊन निघाली होती. जीवनातला प्रत्येक आनंद लुटण्यासाठी इथली मंडळी धडपडतात. शनिवार रविवार मजेत घालवण्यासाठी आठवडाभर कठोर परिश्रम करतात !

झबुर्कनंतर उतरणारे कोणी नव्हते नि हात दाखवून बस थांबवणारेही कोणी भेटले नाहीत. त्यामुळे वाटत कुठेही न थांबता आमची बस डूडर्श्टाट्‌लाच येऊन उभी राहिली.

गावातल्या चर्चच्या घंटांचा गंभीर नाद आलेल्यांचं स्वागत करत होता. माझ्याजवळ काहीच सामान नसल्यामुळे मी झटकन खाली उतरलो नी गावाच्या दिशेनं चालू लागलो.

गाव छोटंच, त्यातून आज रविवार असल्यामुळे बाजार बंदच होता. काही तरी गरम प्यावं अशी इच्छा होती. जवळच एक रेस्तराँ दिसलं.

" गुटेन् मोर्गेन् !" गुड मॉर्निंग म्हणत मी आत शिरलो.

" गुटेन् मोर्गेन् !" दुकानदार आजींनी स्वागत करत म्हटलं.

मी एका टेबलापाशी बसलो. आजीबाईंनी एक मोठं मेन्युकार्ड माझ्यासमोर आणून ठेवलं.

" मला गरम कॉफी पाहिजे, दूध साखरेसह !" मेन्युकार्ड न बघताच मी म्हटलं.

दहा मिनिटांनी आजीबाई ट्रे घेऊन आल्या. कॉफीच्या किटलीबरोबर दुधाचं भांडं नी साखरेचे क्यूब आणायला त्या विसरल्या नव्हत्या. मी त्यांच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करत होतो. हवा पाण्याच्या गप्पा झाल्या पण आजीबाईंचा सूर मला सापडत नव्हता. माझ्या शेजारच्या खुर्चीवर मी भगवी शबनम ठेवली होती, तिच्याकडे पाहत आजीबाईंनी एकाएकी विचारलं,

" एवढंच सामान तुमचं ?"

" हो !" त्यांच्या प्रश्नाचा रोख न समजल्यामुळे मी विचारलं, " का ?"

" तुम्ही पूर्व जर्मनीत चालला आहात ना ?"

" नाही बुवा !" मी हसत हसत म्हटलं, " तिकडे काय आहे ! मी आपला हे डूडर्श्टाट् गाव बघायलाच आलो आहे."

" मग ठीक आहे !" उसासा टाकत आजीबाई म्हणाल्या. जणू एक मोठं संकट टळलं असं वाटलं होतं त्यांना !

"...पण मी सरहद्दीवर मात्र जाणार आहे !"

" जा, पण फार जवळ जाऊ नका ! फार वाईट लोक आहेत, कोणाला केव्हा गोळी घालतील सांगता येत नाही !"

" पण मी कुठे जर्मन आहे ?"

" –आणि ते तरी कुठे जर्मन आहेत !" आजीबाई मिश्किलपणे हसत म्हणाल्या. मी मात्र कोड्यात पडलो. काय हे शत्रुत्व ! आमचं हास्य ओसरल्यावर आजी म्हणाल्या " पण तिकडे बॉर्डरवर जाणारी बस यायला अजून तासभर अवकाश आहे."

" तोपर्यंत मी गावात चक्कर मारणार आहे, आणि मला काय करायची बस ! मी चालत चालतच जाणार आहे तिकडे !" कॉफीचे पैसे देऊन मी उठलो.

" वीडर्झेएन ! अच्छा !"

" वीडर्झेएन ! अच्छा. बॉर्डरवर जपून हं !" आजींनी जाता जाता पुन्हा सूचना केली.

युरोपात बांधकामांच्या अनेक पद्धती आल्या. रेनेसांस, गोथिक, क्लासिक, बारोक– त्या त्या काळात मोठमोठी देखणी बांधकामं झाली. लाकडी बांधकामाचा खास जर्मन प्रकारही वैशिष्ट्यपूर्ण आहे, प्रेक्षणीय आहे. खालपासून वरपर्यंत मुख्यत: लाकडाचाच वापर केलेला असतो. दोन खिडक्यांच्यामध्ये गुणाकाराच्या फुलीच्या आकाराच्या खांबांची रचना असते. खिडकीला किंवा दरवाज्याला लागून समांतर खांब असतात. छप्पर खूप तिरकं, वरच्या बाजूनं घराचा आकार त्रिकोणीच दिसतो. ही घरं दिसायला तर सुंदर आहेतच पण लाकडाच्या विपुल वापरामुळे राहायलाही सुखकारक असतात. अशा प्रकारची बरीच घरं इथ आहेत, मी तिकडे निघालो.

एकाच प्रकारची पाच-पंचवीस घरं बघायला छान वाटत होतं. एका वेगळ्याच वातावरणात नव्हे– तर जुन्या काळातच कुठे तरी १५ ते १६ व्या शतकात गेल्यासारखं वाटत होतं. आसपास लोकांचे व्यवहार संथपणे चालू होते. फ्रांक्फुर्ट्, न्यूअॅर्न्बेर्क्, हानोफरसारखी मोठी शहरं नि डूडर्श्टाट् ह्यात तसा फरक होताच. इथलं ग्रामीण जीवन त्यामानानं स्वस्थ, शांत होतं. शहरातल्यासारखी धावपळ नसली तरी शहरातल्यासारखा व्यवस्थितपणा मात्र सर्वत्र जाणवत होता. सर्वांच्या वागण्यात सहज संथपणा असला तरी आळस किंवा गबाळेपणा वाटत नव्हता. ढगळ शर्ट नि घट्ट पँट, वेगवेगळ्या प्रकारच्या टोप्या घालून लोकांची जा-ये चालू होती. सारे लोक माझ्याकडे कुतूहलानं बघत होते. मीही त्यांच्याकडे हसतमुखानं बघत होतो. एक चौदा-पंधरा वर्षांचा मुलगा सुहास्यवदनानं माझ्याजवळ आला. मीही स्मित करत त्याच्या हास्याचा स्वीकार केला.

" बुओन् जिओर्नो, सिन्यिओर !" तो म्हणाला.

" गुटेन् मोर्गेन् ! मला इटालियन येत नाही !" मी जर्मनमध्ये म्हटलं. तो मुलगा मला इटालियन समजला होता बहुतेक.

" तुम्ही इटालियन नाही ? तुम्हाला जर्मन येतं ?" आश्चर्यचकित होऊन तो मुलगा भराभर विचारत होता.

" हो, मला जर्मन येतं."

" फान्टास्टिश ! फॅन्टॅस्टिक ! तुम्ही आफ्रिकन का ?"

"नाही भारतीय. भारतातला मी!"

"भारत!! भारत हो!" त्या मुलाला फारसा काही बोध झाल्याचं दिसत नव्हतं.

"तुझं नाव काय?"

"पेटेर श्मिट."

"वडिल काय करतात तुझे?"

"मेकॅनिक आहेत फार्मवर!"

"आहेत का घरी?" त्या निमित्तानं त्याच्या घरी जायची संधी मिळेल अशा सुप्त इच्छेनं मी चौकशी केली.

"नाही. कालच हानोफरला गेले आहेत."

"अच्छा!"

"तुमची भाषा कोणती—भारतीय?"

"नाही. हिंदी!" मी म्हटलं, "तू हल्ली इटालियन शिकतोस वाटतं?"

"हो, शाळेत विषय नाहीये पण आमच्या फार्मवर एक इटालियन आहे..."

थोडा वेळ गप्पा मारून मी त्या शाळकरी मुलाचा पेटेरचा निरोप घेतला. पूर्व जर्मनीतून बस यायची वेळ झाली होती, त्यावेळेपर्यंत सरहद्दीवर पोहोचायला हवं होतं.

सरहद्दीकडे जाणारा सुंदर बांधणीचा रुंद रस्ता निर्जन होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना छोटया-छोटया टेकडया. मोठमोठी कुरणं अजून हिरवी दिसत होती. दूरवरच्या एका कुरणावर काळ्या-पांढऱ्या नी तांबडया-पांढऱ्या डागांच्या गलेलठ्ठ गायी चरताना दिसत होत्या. चांगल्या शे-दीडशे गायी असतील त्या. चारही बाजूनी तारेचं भक्कम कुंपण. आसपास कुठे गुराखी मात्र दिसत नव्हता.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला उंच उंच झाडं, पानझड अव्याहत चालूच होती. मनुष्यप्राणी तर आसपास दिसत नव्हताच. पण पाखरंही कुठे दूरदेशी गेल्यासारखी वाटत होती. पानांनीच झाडांची साथ सोडायला सुरुवात केली मग पाखरं तरी कशाला रहाणार! निर्जन रस्त्यावरून निःशब्द चालला होतो. आता दूरवर उंच काटेरी कुंपण दिसायला लागलं होतं. थोडयाच वेळात मी रस्त्यालगतच्या कुंपणाजवळ येऊन ठेपलो.

रस्त्याच्या मध्यावर जणू तटबंदीच होती. पश्चिम आणि पूर्व अशा दोन्ही बाजूंना दुहेरी कुंपण होतं. चेकपोस्ट होतं. कडक गणवेशातले शस्त्रधारी अधिकारी आत बसलेले दिसत होते. मी तिकडे फिरकलोच नाही!

जवळच बसस्टॉपची शेड होती. तिथे प्रवाशांसाठी लाकडी बाक होते, मी त्यावर टेकलो. कोकाकोलाचा टिन उघडला, तहान लागली होती. बोलायला कोणीच नसल्यामुळे विचारांच्या तंद्रीत हरवलो.

...पंजाबातल्या फिरोजपूरजवळ अशीच एक कृत्रिम सीमा आहे. सतलजच्या काठी

भगतसिंग, राजगुरु, सुखदेव ह्या क्रांतिकारकांच्या समाध्या आहे. त्या वीरांच्या समाधीचं दर्शन घेऊन पश्चिमेकडे चालायला लागलो. फिरोजपूरच्या पश्चिमेकडे जाणाऱ्या जुन्या लोहमार्गावरून जात होतो... १४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री क्रूरपणे नकाशावर एक फराटा मारून इथे सीमा निर्माण केली गेली ! इथल्या भाईबंदांची ताटातूट केली – पूल मोडले, रस्ते तोडले, लोहमार्ग उखडले –ती दुःखद चित्रं कॅमेऱ्यानं टिपत मी पुढे पुढे जात होतो. एवढ्यात मला माझ्या कॅमेऱ्याच्या स्क्रीनवर दोन संगिनी दिसल्या, मी आश्चर्यानं वरती बघितलं तर आपलेच दोन जवान संगिनी लावलेल्या बंदुकी माझ्यावर रोखून उभे होते !

"हँडस् अप् !"

मी हात वर केले. पुढे चौकशीचे सारे सव्यापसव्य झाले. कॅमेऱ्यातली फिल्म काढून देण्यावर निभावलो... त्या आठवणीनं अंगावर काटा आला !

"फार लौकर आलेले दिसता तुम्ही !" मला तंद्रीतून जागं करण्यासाठी कोणीतरी मोठ्या आवाजात म्हटलं. मी मान वर करून बघितलं तर चेकपोस्टमधलाच होता कोणी-तरी, वर्दीधारी, कमरेला पिस्तुल.

"हो, लौकरच आलो जरा. मला फक्त बघायचंच आहे..."

"इथे आहे काय बघायला ?"

"सीमा ! कृत्रिम सीमा !"

"तुम्ही कुठले ?"

"भारतातला. आमच्या देशातही अशाच कृत्रिम सीमा आहेत. पूर्वेला नी पश्चिमेला..."

"दोन्ही बाजूंना ?"

"हो !"

"अशा सीमा म्हणजे प्रॉब्लेमच असतो." तो अधिकारी अनुभवाचे बोल सांगत होता.

"होय ना !"

"फार वाईट... माणसांना माणसांपासून तोडतात... अरे, बस आलेली दिसत्यय बर का..." डूडर्श्टाट्च्या बाजूनं बस येत होती तिकडे बोट दाखवत तो म्हणाला, "अच्छा जातो मी !"

"अच्छा !"

थोड्याच वेळात बस सरहद्दीजवळ येऊन थांबली, पूर्व जर्मनीतून येणारी बसही आली. त्या बसमधून उतरलेले सारे प्रवासी वयस्क होते. पूर्व जर्मनीत जायला निघालेली मंडळीही म्हातारीच होती ! म्हाताऱ्यांनी उत्साह दाखवावाच; पण इथे तरुण मंडळी का नाहीत ? आजपर्यंत जिथे जिथे हिंडलो तिथे तिथे तरुणांचा उत्साह ओसंडून वहात असलेला बघितला होता पण इथे मात्र फक्त सिनीयर सिटिझनच होते ! – आता चार-दोन

मोटारीही डूडर्श्टाट्च्या बाजूनं आल्या होत्या.

आलेली मंडळी झटकन रिकाम्या बसमध्ये चढली नी ती बस डूडर्श्टाट्कडे निघून गेली. पूर्व जर्मनीत जाणारे प्रवासी निरोप घेत होते. एका फोल्क्सवागेन्जवळ साठीची एक स्त्री उभी होती, मजेत. तिच्या बरोबरची एक तरुण स्त्री आपल्या छोटचा मुलीला कडेवर घेऊन एका वृद्ध जोडप्याबरोबर बोलत बोलत पूर्व जर्मनीत जाणाऱ्या बसच्या दरवाजापाशी जाऊन उभी राहिली. फोल्क्स्वागेन्जवळ जात मी म्हटलं,

"गुटेन् टाक्! नमस्कार!"

"गुटेन् टाक्!" त्या बाई म्हणाल्या.

"तुम्ही आलात की चाललात?"

"मी आलेही नाही नी चाललेही नाही!" बाई हसत हसत म्हणाल्या, "माझ्या मुलीचे सासूसासरे लाइप्त्सिशला असतात. त्यांना सोडायला आलोत आम्ही." बसकडे बोट दाखवत त्या म्हणाल्या, "ती माझी मुलगी!"

"अच्छा!"

"सामान बरंच होतं ना म्हणून आम्ही पोहोचवायला आलो. तिकडे जायचं म्हणज सामान खूप होतंच. तिकडे काहीच मिळत नाही, मिळालं तर परवडत नाही...!"

"अस्सं!"

"कपडे, औषधं, खाण्यापिण्याचे पदार्थ—जमेल तेवढं घेऊन जातात. आम्हीही त्यांच्यासाठी कपडे जमवून ठेवतो."

"ते कशाला?"

"असले म्हणजे आसपासच्या गरजू लोकांनाही देता येतात ना?—तिथे काय, सगळच गरजू! ह्या वेळेला चार बॅगा भरून नुसते कपडेच आहेत त्यांच्याबरोबर..."

एवढ्यात बसचा हॉर्न वाजला. माझ्याशी बोलणाऱ्या बाई आपल्या व्याह्यांना निरोप द्यायला पुढे झाल्या. मीही बसपाशी जाऊन दहा-पाच म्हातारे-म्हाताऱ्यांशी हस्तांदोलन केलं. प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी होतं. काहींच्या डोळ्यातून धारा वहात होत्या. अनेकांना आपले हुंदके आवरत नव्हते...हृदय हेलावून टाकणारं दृश्य होतं...हळूहळू सारे बसमध्ये शिरले. बस निघाली. बघता बघता कुंपणापलिकडे गेली—सीमापार—

कडेवरच्या मुलीला सावरीत तरुणीनं आपले डोळे पुसले. सासूसासऱ्यांना निरोप देताना तिचे डोळे पाणावले होते. काही काळ मीही तिच्याकडे पाहायचं टाळलं. चार पावलं चालून पुढे आल्यावर तिच्या आईनंच ओळख करून दिली.

"केटी, अगं हे..."

"बिनीवाले—" मीच म्हटलं.

"...भारतातून आले आहेत."

"नमस्ते !" केटी म्हणाली. आता ती खूपच सावरली होती, "कुणीकडे जाणार तुम्ही आता ?"

"डूडरश्टाट्ला आणि तिथून ग्यॉटिङेन्ला."

"मग आमच्याबरोबरच चला ना ! आम्ही ग्यॉटिङेन्लाच जाणार आहोत. माझी आई ग्यॉटिङेन्लाच असते–"

"आणि तुम्ही ?"

"बोनला."

नातीला घेऊन आजी मागच्या बाजूला बसल्या. मी केटीच्या शजारी, उजव्या बाजूला, पुढे बसलो.

"कुठल्या रस्त्यानं जाऊया ?" गाडी स्टार्ट करीत केटीनं विचारलं.

"येताना मी झेबुर्कवरून आलो होतो, आता दुसऱ्या मार्गानं जाऊ या !" मी सुचवलं.

"ओ के !" गाडी निघाली.

"त्या बसमध्ये सगळी म्हातारी माणसंच दिसत होती, तरुण मंडळी कशी काय नव्हती?" माझं औत्सुक्य.

"कारण पूर्व जर्मन सरकार ६५ वर्षांखालच्या आपल्या नागरिकांना पश्चिम जर्मनीत जायची परवानगीच देत नाही !" केटीनं सांगितलं.

"तुमचे सासुसासरे इकडेच येऊन का नाही राहत ?"

"हो ना ! आम्ही तेच म्हणत असतो त्यांना. पण ते ऐकतच नाहीत, त्यांना तिथेच बरं वाटतं –"

"बरोबरच आहे ग त्यांचं." आजी म्हणाल्या, "जन्मापासून इतकी वर्षं तिथेच काढली. आता आपलं गाव सोडून करमणार का आहे त्यांना !"

...ही इतकी आधुनिक, पुढारलेल्या देशातली माणसं. म्हणजे त्यांच्या देशाचं आधुनिकीकरण झालं, पण माणसं ? मोटारीतून गेली काय किंवा रॉकेटातून उडली काय, माणसं माणसंच असतात. त्यांच्या सुखदुःखाच्या भावना तशाच असतात. मी विचार करत होतो. कुठल्याही कृत्रिम सीमेवर अशीच दृश्यं दिसणार...

"ह्या कृत्रिम सीमांमुळे दुःखं वाढतात, नाही ?" मी म्हटलं.

"गेनाऊ ! अगदी बरोबर आहे तुमचं !" केटी उत्स्फूर्तपणे म्हणाली, "ह्या सीमाच नाहीशा करायला पाहिजेत !" केटी मोठ्या त्वेषानं, मनापासून विचारपूवक बोलत होती.

"आमच्या वेळी बरं होतं (बाई) !" आजी समाधानाच्या सुरात म्हणाल्या, "अगदी इकडे ब्रेस्लाऊपासून तिकडे श्रासबुर्कपर्यंत हवं तिकडं जाता येत होतं. पासपोर्ट काढावा लागत नव्हता की व्हिसा घ्यावा लागत नव्हता !!!"

"भाग्यवान होतात तुम्ही !" केटी म्हणाली.

...मुंबईहून निघून खबरखिंडीजवळच्या पिशावरपर्यंत जाणाऱ्या थेट गाडीची-फ्रॉंटियर मेलची–मला आठवण झाली. ती बघण्याचा योग येण्यापूर्वीच आपल्या देशाचे तुकडे होऊन ती गाडी बंद झाली होती, पण ती कल्पनासुद्धा किती छान वाटते ! ...

" अजून किती दिवस आहात जर्मनीत ?" केटी विचारत होती.

" संपतच आला आहे माझा मुक्काम ! मलाही आता घरी जायची ओढ लागली आहे–" मी हसत हसत म्हटलं.

गप्पा मारत, आसपासचं सृष्टिसौंदर्य न्याहाळत आम्ही ग्यॉटिंगेनला येऊन पोहोचलोही. इन्स्टिट्यूटच्या फाटकासमोर केटीनं गाडी थांबवली.

" मीही आज रात्री घरी जाणार आहे– बोनला !" केटी म्हणाली, " पण जाण्यापूर्वी तुम्ही एकदा आमच्या घरी या ना ! राहायलाच या ! नक्की !" माझ्या हातात आपल्या घराच्या पत्त्याचं कार्ड देत केटी आग्रह करत होती.

" येईन, नक्की येईन !" कार्डांची देवाण–घेवाण करत मी म्हटलं, " वीडरझेएन् !"

" वीडरझेएन !"

□

(स्थळ प्रत)
REFBK-0025668